सत्यमेव जयते

# उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळ

# लेखा परीक्षण अहवाल

# 2012-2013

सह संचालक, मनपा लेप,उपविभाग-2, स्थानिक निधी लेखापरिक्षा, नवी मुंबई

रायगड भवन, 7 वा मजला, सेक्टर 11, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई

# <u>अस्वीकृती  प्रमाणपत्र</u>

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे  उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळ  यांनी 2012-2013 या  वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफरीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

**उल्हासनगर मनपा शिक्षण मंडळ, उल्हासनगर यांचा 2012-13 वित्तीय वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल**

जा.क्र.आस्था /18/ब/ उल्हासनगर मनपा शि मं/लेप/2012-13/768

सहसंचालक,(म.न.पा.ले.प.)
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
7 वा मजला, रायगड भवन, नवी मुंबई
दिनांक - 10 /AUG 2015

प्रति,

प्रशासन अधिकारी,
उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळ,
उल्हासनगर

उल्हासनगर महानगरपालिका, शिक्षण मंडळाचे 2012-13 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण या कार्यालयाचे श्री.अभिजित पिसाळ, सहाय्यक संचालक (म.न.पा.ले.प.) स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई यांच्या पथकाने दिनांक 06/05/2015 ते 04/06/2015 या कालावधीत पूर्ण केले असून लेखापरिक्षण अहवाल तयार केला आहे. श्री.सिताराम काळे, उपसंचालक, (म.न.पा. लेप), उपविभाग 2, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई यांनी दिनांक 16/07/2015 रोजी प्रशासन अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळ, उल्हासनगर यांच्याशी अहवालाबाबत चर्चा करुन अंतिमीकरण केले आहे.

लेखापरीक्षण कालावधीत खालील प्रमाणे पदाधिकारी/अधिकारी कामकाज पाहत होते.

| अ.क्र | नाव | पद | कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | मा.श्री राजेंद्रसिंग राजपूत (हंगामी) | सभापती | दि.01/04/2012 ते दि.22/04/2012 |
| 2 | मा.श्री. विजय महादेव सावंत. | सभापती | दि.23/04/2012 ते दि.31/03/2012 |
| 3 | श्री. रामदास बिडवे. | प्रशासन अधिकारी | दि.01/04/2012 ते दि.31/03/2013 |

# अनुक्रमणिका

विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण ..... 1

**I PART I : भाग १ ..... 2**

मागील लेखा परीक्षण अहवाल ..... 2

**PART II ..... 5**

**कलम ९ अ खालील आक्षेप ..... 6**

1 उल्हासनगर महानगर पालिका शिक्षण मंडळाचे 2012-13 या आर्थिक वर्षाचे लेखे व आर्थिक स्थिती ..... 7
2 अर्थसंकल्पीय तरतूदीपेक्षा कमी /अधिक खर्च केल्याबाबत ..... 8
3 दफ्तर खरेदी प्रक्रियेतील अनियमिततेबाबत ..... 11
4 भविष्य निर्वाह निधी लेख्यातील त्रुटींबाबत ..... 15
5 विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देण्यासाठीच्या प्रक्रियेतील अनिमितताबाबत. ..... 18
6 मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना लेखन साहित्य (स्टेशनरी) पुरवठा करणे ..... 20
7 बालवाडीमधील विद्यार्थ्यांसाठी खेळणी खरेदी करणेबाबत ..... 24
8 स्कॉलरशीप पुस्तकांची खरेदी / पुरवठा करणे या कामातील अनियमितांबाबत ..... 25
9 प्रमाणके लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नसल्याबाबत व प्रमाणकांमधील उणीवांबाबत ..... 27
10 दि.1/11/2005 नंतर नियुक्त कर्मचाऱ्यांना अंशदान निवृत्ती वेतन योजनेऐवजी भविष्य निर्वाह निधी योजनेचा लाभ देण्यात येत असल्याबाबत ..... 29
11 31 मार्च अखेरच्या शिल्लक रकमेबाबत ..... 30
12 भविष्य निर्वाह निधीची बँक खाती व विनावापर गुंतून राहिलेल्या शिल्लक रकमेबाबत ..... 31

**कलम ९ ब खालील आक्षेप ..... 33**

13 मनपा शाळांमध्ये सुरक्षा रक्षक व शिपाई पुरवठा करण्याच्या कामामधील अनियमिततांबाबत ..... 34
14 मनपा शाळांमधील विदयार्थ्यांना मोफत गणवेश वाटपावरील खर्चातील अनियमितता ..... 37
15 महानगरपालिका शाळा दुरुस्तीवर शिक्षण मंडळाने केलेल्या खर्चाबाबत ..... 41
16 सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी रकमेच्या अंतिम प्रदानात जादा प्रदान करण्यात आल्याबाबत 44
17 वेतन देयकांच्या पडताळणीमध्ये आढळलेल्या त्रुटी / उणीवा ..... 46
18 रोखवहीमधील त्रुटींबाबत ..... 49
19 सर्व शिक्षा अभियान योजनेतील जमा व खर्च मधील त्रुटीबाबत ..... 51

**कलम ९ क खालील आक्षेप ..... 53**

**------------------- निरंक ------------------- ..... 54**

**कलम ९ ड खालील आक्षेप** .................................................................. **56**

20 सहाय्यक शिक्षक श्री सा. सु. पाटील यांच्या सेवानिवृत्ती प्रकरणातील अतिप्रदानाबाबत .................................................................. 57

21 स्वेच्छा सेवानिवृत्ती वेतन प्रकरणांमध्ये उपदानाचे अतिप्रदान झालेबाबत .................................................................. 58

22 चलन पडताळणीबाबत .................................................................. 60

23 शालेय पोषण आहार योजनेच्या रोखपुस्तिकेतील अनियमिततेबाबत .................................................................. 61

24 जात प्रमाणपत्र वैधता पडताळणी समितीकडून तपासून घेतल्याचे प्रमाणपत्र घेण्यात आले नसल्याबाबत ..... 62

25 एतदर्थ मंडळाची परिक्षा उत्तीर्ण नसतांना / उत्तीर्ण होण्यास सुट नसतांना वार्षीक वेतनवाढी मंजूर केल्याबाबत .................................................................. 63

26 मागील लेखा परिक्षण अहवालातील प्रलंबीत परिच्छेदांबाबत .................................................................. 64

27 सभासद मानधन व पालक प्रात्साहन भत्ता अदायगीबाबत. .................................................................. 66

28 शिक्षण मंडळाच्या कर्मचारी/ अधिकाऱ्यांकडून प्रतिभूती न घेतल्याबाबत .................................................................. 68

29 स्थावर व जंगम मालमत्तेच्या वार्षिक पडताळणी बाबत .................................................................. 69

30 उप-प्रमाणके रद्द / विरुप न करणेबाबत .................................................................. 70

लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र .................................................................. 72

**विवरणपत्रे व जोडपत्रे** .................................................................. **73**

## ***विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण***

| विभाग | ९अ | ९ब | ९क | ९ड |
|---|---|---|---|---|
| इतर | | | | |
| आयुक्तालय | | | | |
| सामान्य प्रशासन | | | | |
| नगर सचिव | | | | |
| शहर अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम | | | | |
| शहर अभियंता आणि विद्‌युत विभाग | | | | |
| लेखापरीक्षण | | | | |
| नगर रचना | | | | |
| जकात किंवा स्थानिक संस्था कर किंवा उपकर | | | | |
| कर निर्धारण व संकलन | | | | |
| भूमी व मालमत्ता विभाग | | | | |
| शिक्षण विभाग किंवा शिक्षण मंडळ, प्राथमिक शिक्षण मंडळ किंवा माध्यमिक शिक्षण | 1, 2, 3, 4, 5, 6, 7, 8, 9, 10, 11, 12 | 13, 14, 15, 16, 17, 18, 19 | | 20, 21, 22, 23, 24, 25, 26, 27, 28, 29, 30 |

# I Part I : भाग १

## *मागील लेखा परीक्षण अहवाल*

उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या लेखापरीक्षण अहवालातील प्रलंबित परिच्छेदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | लेखा परिक्षण वर्ष | परिच्छेद क्रमांक | एकूण |
|---|---|---|---|
| 1 | 1976-77 | 3,4(अ),(ब),5,6(अ),(ब),(क),7,8,9(अ),(ब),,10,11,12,13,14, 15(अ),(ब),(क),(ड)(ई),16,18 | 15 |
| 2 | 1977-78 | 3,4,5(अ),(ब),6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,19,20,21,22,23(अ) ते (ह), 24,25,26,27,28, | 25 |
| 3 | 1978-79 | 3,4,5,6,7,8,9,10(अ),(ब),11,12,13,14(अ),(ब),15(अ),(ब),16(अ),(ब), 17,18,19(अ),(ब),(क),(ड),20,21,22,24(अ),(ब),25(अ),(ब),(क), 26(अ),(ब),(क),27(अ),28(1),(2),29(अ),(ब),30,31(अ),(ब), 32,33,34 | 31 |
| 4 | 1979-80 | 5,6,7,8,9,10(अ),(ब),11,12,13,14,15,16,17,18(1),(2),(3)(6) (7),19,20,21,22,24,25, 26,27(1),(2),28,29, 30,31(अ),(ब),(क),32,33,34 | 28 |
| 5 | 1980-81 | 3,4,5,6,7,8(अ),9(ब),10,11,12,13,14(1),(2),15,16(1),(2),(3),17(1), (2),18(अ),(ब),(क),19(अ),(ब),(क),(ड)(ई)(फ,ह,ज,ल),20(ब)(क)(म),21 , 21(ब)(क)22,23,24,25,26,27,28,29,30(म)(ग)(न),31,32,33,34 | 29 |
| 6 | 1981-82 | 3(1),(2),4(अ),(ब),(क),5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19(अ), (ब),(क),20,21,23(1, 2), 25,26,27, | 23 |
| 7 | 1982- 83 | 3,4,5,6,7,8,9(अ),(ब),(क),10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22, 23,24,25,26,27,28,29,30,31,32(ब),33 | 30 |
| 8 | 1983- 84 व 1984- 85 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22,23,24,25, 26,27,28,29,30,31,34,35,36,37,41,42,43,44,45,46, 47,48,49,50,51,52,53,54,55,57,58 | 50 |
| 9 | 1985- 86 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,17,18,19,20,21,22,23, 24(अ),(ब),25,26,27,28,29,31,34,35(अ),(ब),36,37(अ),38,39,40,41, | 35 |
| 10 | 1986- 87 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,23,24, 28,30,31,32,33,34,35,36,37,38,39,40,41,42,43,44,45, 46,47,48,49,50,51,52,53, | 46 |
| 11 | 1987- 88 | 3,4,5,6,7,8,9,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22,23,24,25,26, 27,28 | 25 |
| 12 | 1988- 89 ते 1994-95 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22,23,24,25, 26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38,39,40,41, 42,43,44,45,46,47,48,49,50,51,52,53,54,55,56,57,58,59, 60,61,62,63,64,65,67,68,69,70,71,72,73,74,75,76,77,78, 79,80,81,82,83,84,85,86,87,88,89,90,91,92,93,94,95,96, | 121 |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 97,98,99,100,101,102,103,104,105,106,107,108,109,110, 111,112,113,114,115,116,117,118,119,120,121,122,123,124, | |
| 13 | 1995- 96 ते 1997- 98 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22,23,24,25, 26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38,39,40,41, 42,43,44,45,46,47,48,49,50,51,52,53,54,55,56,57,58,59 | 57 |
| 14 | 1998- 99 ते 2001- 02 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22,23,24,25, 26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38,39,40,41, 42,43,44,45,46,47,48,49,50,51,52,53,54,55,56,57,58, | 56 |
| 15 | 2002- 03 | 3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22,23,24,25, 26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38 | 36 |
| 16 | 2003-04 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22,23,24, 25,26,27,28,29,30,31 | 31 |
| 17 | 2004-05 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22,23,24, 25,26,27 | 27 |
| 18 | 2005-06 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22 | 22 |
| 19 | 2006-07 ते 2008-09 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22,23,24, 25,26,27,28,29,30 | 30 |
| 20 | 2009-10 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22,23,24, 25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38,39,40, 41,42,43,44,45,46,47,48,49,50,51,52,53,54,55,56,57,58, 59,60,61,62,63,64,65,67,68,69,70,71,72,73,74,75,76,77, 78 | 78 |
| 21 | 2010-11 | 1,2,3,4,5,6,7,8,9,10,11,12,13,14,15,16,17,18,19,20,21,22,23,24, 25,26,27,28,29,30,31,32,33,34,35,36,37,38,39, 40, 41,42,43,44 | 44 |

2011-12 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद. (चालू लेखापरीक्षणाचे मागील वित्तीय वर्ष).

| **परि.क्र.** | **शिर्षक** |
|---|---|
| 1. | महानगरपालिका शाळांचे सुरक्षा रक्षक व शिपाई यांचे मानधनावरील खर्चाबाबत अनियमितता. |
| 2. | अंदाजपत्रकापेक्षा कमी / जादा खर्च केल्याबाबत. |
| 3. | बायोमेट्रीक्स यंत्र खरेदीतील अनियमिततेबाबत. |
| 4. | गणवेश खरेदीच्या प्रदान केलेल्या देयकातील अनियमिततेबाबत. |
| 5. | शिक्षण मंडळाने एक यूपीएस, इनव्हरटर व बॅटरी खरेदीतील अनियमिततेबाबत. |
| 6. | मॅगनेटीक ग्रीन कलर बोर्डच्या खरेदीतील अनियमिततेबाबत. |
| 7. | प्रशासन अधिका-यांचे तारण न घेतलेबाबत. |
| 8. | प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका छपाईमधील अनियमिततेबाबत. |
| 9. | सभापती यांना प्रदान केलेल्या वाहन भत्यांबाबत अर्धसमास पत्राचे अभिप्राय बघणे. |
| 10. | म.न.पा. शाळांमध्ये विदयार्थांसाठी बुट व मोजे पुरवठा करणेबाबतच्या नस्तीतील, देयकातील व पुरवठयातील अनियमिततेबाबत. |
| 11. | सन 2011-12 वर्षात इयत्ता 1 ते 7 वी च्या विदयार्थांना शालेय वहया पुरवठा करणेकरीता वहया खरेदीतील अनियमिततेबाबत. (100 टक्के मनपा खर्च) |
| 12. | म.न.पा. शाळेतील विदयार्थांना सन 2011-12 मध्ये शिष्यवृत्ती परीक्षा पुस्तक पुरविणेतील अनियमिततेबाबत. (100 टक्के म.न.पा खर्च) |

| | |
|---|---|
| 13. | पूर्व प्राथमिक (बालवाडी) वर्गास बालवाडी ताईचा पुरवठा करणे. |
| 14. | शालेय पोषण आहार विषयी प्रदान केलेल्या प्रमाणकाविषयी अनियमितता. |
| 15. | भविष्य निर्वाह निधी ना परतावा अग्रिम नियमबाहयपणे देण्यात आलेबाबत. |
| 16. | शालेय पोषण आहार रोखवही बाबत अनियमितता व ताळमेळ न घेतल्याबाबत. |
| 17. | एकाच बचत गटाचे नावे धनादेश दिलेबाबत. |
| 18. | नापरतावा अग्रिम विषयी लेखे लेखापरीक्षणास सादर न केलेबाबत. |
| 19. | परीभाषित अंशदान निवृत्ति वेतनधारक कर्मचा-याचे भविष्य निर्वाह निधीचे लेखे न ठेवलेबाबत. |
| 20. | शिक्षणमंडळातील सदस्य यांना नियम बाहयपणे वाहन भत्ता दिल्याबाबत. |
| 21. | नियम बाहयपणे महाराष्ट्र दर्शनासाठी प्रवास भत्त्याचे देयक प्रदान केलेबाबत. |
| 22. | स्थायी अग्रिमाचे समायोजन न केले बाबत. |
| 23. | मुंबई शिक्षण मंडळ लेखा संहीता 1953 नुसार लेखे व इतर नोंदवहया न ठेवले बाबत. |
| 24. | खर्चाचे वर्गीकरण नोंदवही नमुन्यात न ठेवले बाबत व त्यातील नोंदी पेन्सीलने नोंदविले बाबत. |
| 25. | धनादेश नोंदवही न ठेवले बाबत. |
| 26. | जड संग्रह नोंदवही न ठेवले बाबत. |
| 27. | रोख वहीतील अनियमितते बाबत. |
| 28. | सेवानिवृत्ती प्रकरणांबाबत. |
| 29. | शालेय पोषण आहाराबाबत |
| 30. | माध्यमनिहाय शिक्षक निश्चितीतील जादा पदांबाबत |
| 31. | रोखवहीत जमा बाजूस इतर जमा शिर्षका खालील जमा रकमेच्या नोंदीबाबत. |
| 32. | सेवानिवृत्त धारकांची नियतकालिक ओळखबाबत. |

उपरोक्त नमूद केलेल्या आक्षेपांचे संदर्भात त्या त्या पुढील वर्षाचे अभिप्रायामध्ये नमूद करण्यात आलेले परिच्छेद क्रमांक अंतिम समजण्यात यावेत.

## पुनर्विलोकन अहवालामध्ये समाविष्ट परिच्छेदांचा तपशील

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्यावरील लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालामध्ये समाविष्ट परिच्छेदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| **अ. क्र.** | **ले.प.वर्ष** | **परिच्छेद क्रमांक** | **एकूण** |
|---|---|---|---|
| 1. | 2011-12 | 3,11 | 2 |

# Part II

# भाग एक

# गंभीर अनियमितता

# कलम ९ अ,ब,क खालील आक्षेप

# कलम ९ अ खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने जे प्रदान कायद्याविरुद्ध आहे असे प्रत्येक प्रदान

## *1 उल्हासनगर महानगर पालिका शिक्षण मंडळाचे 2012-13 या आर्थिक वर्षाचे लेखे व आर्थिक स्थिती*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 02**

*शिक्षण मंडळ निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

| |
|---|
| ***राष्ट्रीय महानगरपालिका लेखा संहिता मधील प्रकरण क्र.2 ते 5 मधील तरतूदीनुसार 2005-06 या आर्थिक वर्षापासून लेखे व्दिनोंद पध्दतीने, जमा-खर्च, आयव्यय पत्रक व ताळेबंद या स्वरुपात ठेवणे आवश्यक असताना त्याप्रमाणे ठेवण्यात आलेले नाहीत. त्यामुळे मंडळाच्या आरंभीच्या शिलकेची विगतवारी, मंडळास येणे व देणे लागत रक्कम आणि मंडळाची मालमत्ता (किंमतीच्या स्वरुपात) या बाबींचे स्पष्टीकरण लेखा परिक्षणास होत नाही. त्यामुळे मंडळाच्या आर्थिक परिस्थितीचे सुस्पष्ट विश्लेषण करता येत नाही.*** |

शिक्षण मंडळाने आर्थिक वर्ष 2012-13 मधील खालील तीन रोखवहया लेखा परिक्षणास उपलब्ध केल्या होत्या.

1) सर्वसाधारण नोंदवही, 2) भविष्य निर्वाह निधी 3) शालेय पोषण आहार

सदर रोखवहया व इतर लेखे तपासणीनंतर अर्धसमास पत्र क्र.02 दि.8/05/2015 अन्वये उपस्थित आक्षेपांना मंडळाने कोणतेही अनुपालन दिलेले नाही. तरी लेखा परिक्षणाचा अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1) उल्हासनगर मंडळाने जमा खर्च नोंदवहया एकेरी नोंद पध्दतीने (single entry system) लिहीलेल्या आहेत. मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम अंतर्गत नियम 161 अन्वये शाळा मंडळाने शासनाच्या निर्देशानुसार जमा / खर्च हिशेब ठेवणे आवश्यक आहे. तसेच शासन निर्णय क्र.लेखास-102004/71/प्र.क्र.8/04/नवि-36 दि.6/07/2005 अन्वये व भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र शासन नगरविकास विभागाने तयार केलेल्या राष्ट्रीय महानगरपालिका लेखा संहिता मधील प्र.क्र.2 ते 5 मधील तरतूदीनुसार सन 2005-06 पासून उपर्जित पध्दतीवर आधारित व्दिनोंद पध्दतीने लेखे व ताळेबंद ठेवणे क्रमप्राप्त आहे. तथापि, मंडळाने व्दिनोंद पध्दतीने लेखे ठेवले नाहीत.

2) जमा खर्चाच्या विवरणपत्राआधारे आय व्यय विवरण (I & E statement) व मत्ता

दायित्व विवरणपत्र तयार करणे आवश्यक होते. जेणे करुन मंडळाच्या आर्थिक स्थितीवर तपशिलवार भाष्य करता आले असते. परंतू मत्ता दायित्व विवरणपत्र तयार केले नसल्याने मंडळावर असलेले एकूण दायित्व व सदर दायित्व पार पाडण्याची मंडळाची क्षमता याबाबत लेखा परिक्षणास अभिप्राय नोंदविता येत नाही.

DGPAGPM8503 (Ref No : 1, Hmm No : 02)

## *2 अर्थसंकल्पीय तरतूदीपेक्षा कमी /अधिक खर्च केल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 04**

*शिक्षण मंडळ निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 42523482.00/-

***2012-13 मध्ये एकूण 02 बाबींसाठी रु.581020/- तरतूद मंजूर असतांना सदर मंजूर तरतूदीमधुन कोणताही खर्च केलेला नाही. शिक्षण मंडळाने एकूण 4 बाबींवर मंजुर तरतूदीपेक्षा एकूण रु.2831824/- अधिक खर्च केला आहे. व 5 बाबींवर मंजूर तरतूदीपेक्षा एकूण रु.31860639/- कमी खर्च केला आहे. मंडळाने एकूण 7 बाबींवर सुधारित तरतूद नसताना रु. 7173169/- खर्च केलेला आहे. जमेच्या अर्थसंकल्पात सर्व शिक्षा अभियानाचे जमा अनुदान प्रत्यक्ष जमेपेक्षा रु.2833000/- ने कमी नोंदविण्यात आले आहे.***

उल्हासनगर मनपा शिक्षण मंडळाने उपलब्ध करुन दिलेल्या अर्थसंकल्प पुस्तिकाची तपासणी केली असता 2012-13 या वित्तीय वर्षामध्ये काही लेखाशीर्षांतर्गत तरतूद मंजूर केली असतांना त्यामधून कोणताही खर्च केला नसल्याचे दिसून आले तर काही लेखाशीर्षांतर्गत मंजूर तरतूदीपेक्षा कमी किंवा अधिक खर्च झाल्याचे दिसून आले. काही काही लेखाशीर्षांतर्गत अर्थसंकल्पामध्ये तरतूद मंजूर नसताना खर्च केल्याचे दिसून आले. त्यामुळे अर्धसमास ज्ञापन क्र.03 दि.11/05/2015 अन्वये त्या संदर्भात खुलासा करण्याबाबत विनंती करण्यात आली होती. परंतू त्याबाबत शिक्षण मंडळाकडून कोणताही खुलासा प्राप्त झालेला नाही. 2012-13 मध्ये कोणताही खर्च न केलेल्या व कमी किंवा अधिक खर्च केलेल्या खर्चाचा तपशील व त्याबाबतचे अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

1) 2012-13 मध्ये खालील लेखा शीर्षांतर्गत मंजूर तरतूदीमधून कोणताही खर्च केलेला नाही.

(परिशिष्ट 1)

| अ.क्र. | लेखाशीर्ष | मंजूर तरतूद रुपये |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| 1 | कर्मचारी व विद्यार्थ्यांना छत्री व रेनकोट पुरविणे | 50000 |
| 2 | शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी वैद्यकीय अनुदान | 531020 |
| | एकूण | 581020 |

2012-13 मध्ये तरतूद असतांना वरीलप्रमाणे रु.581020/- तरतूदीमधून कोणताही खर्च केलेला नाही. तरतूद मंजूर असतांनाही सदर लेखाशिर्षावर खर्च न केल्याने तरतूद अखर्चित राहिली आहे.

2) 2012-13 मध्ये खालील लेखा शीर्षांतर्गत मंजूर तरतूदीपेक्षा कमी / अधिक खर्च झाल्याचे दिसून येते.

(परिशिष्ट 2)

| अ.क्र. | लेखाशीर्ष | मंजूर तरतूद रुपये | खर्च रुपये | (-)कमी / (+)अधिक खर्च रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | शिक्षके व शिक्षकेतर कर्मचारी वेतन | 112854435 | 113518313 | (+)663878 |
| 2 | दुरध्वनी | 22522 | 6522 | (-)16000 |
| 3 | प्रवास भत्ता | 38305 | 8678 | (-)29627 |
| 4 | आकस्मिक खर्च | 760000 | 200000 | (-)560000 |
| 5 | निवृत्तीवेतन व उपदानावरील खर्च | 98789019 | 69034087 | (-)29755012 |
| 6 | पुस्तक खरेदी वनियतकालीका प्रदर्शन | 37015 | 408250 | (+)371235 |
| 7 | विद्युत खर्च | 76830 | 288921 | (+)182091 |
| 8 | संगणक, चित्रकला, प्रयोगशाळा शिक्षक वेतन खर्च | 815783 | 2430403 | (+)1614620 |
| 9 | शालांसाठी शिपाई व पहारेकरी नेमणे | 6200000 | 4700000 | (-)1500000 |
| | एकूण निव्वळ | | | (-)29028815 |

वरील तपशीलावरुन शिक्षण मंडळाने अ.क्र.1,6,7, व 8 येथील बाबींवर मंजूर तरतूदीपेक्षा एकूण रु.2831824/- अधिक खर्च केला आहे. व उर्वरित बाबींवर मंजूर तरतूदीपेक्षा एकूण रु.31860639/- कमी खर्च केला आहे. मुंबई शाळा मंडळ लेखा सहिता 1953 मधील नियम 5(2) अनुसार तरतूदी

उपलब्ध असल्याशिवाय खर्च करता येत नाही व नियम 5(3)(7) अनुसार मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्च होत असल्यास पुनर्नियोजनास मंजुरी घेवून खर्च करणे आवश्यक आहे. परंतू शिक्षण मंडळाकडून त्याबाबत वरील नियमानुसार कार्यवाही करण्यात आली नाही. तसेच खर्च कमी झाल्याने शिल्लक राहिलेला निधी रक्कम रु.29028815/- समर्पित केला नसल्याने विनावापर पडून राहिल्याने महापालिकेच्या अन्य विकास कामांसाठी त्याचा वापर करता आला नाही.

3) शिक्षण् मंडळाने 2012-13 मध्ये खालील लेखाशीर्षांतर्गत सुधारित तरतूद मंजूर नसतांना खर्च केलेला आहे.

(परिशिष्ट 3)

| अ.क्र. | लेखाशीर्ष | मंजूर तरतूद रु. | सुधारित तरतूद रु. | खर्च रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | प्राथमिक शाळेची मासिक छपाई खर्च निविदा जाहिरात खर्च | 25000 | 0 | 270515 |
| 2 | खेळणी,साहित्य, संगणक, दुरदर्शन खरेदी | 600000 | 0 | 198875 |
| 3 | शिक्षक दिवस खर्च | 50000 | 0 | 40000 |
| 4 | विद्यार्थी पटसंख्या वाढविण्यासाठी जाहिरात | 100000 | 0 | 348118 |
| 5 | विद्यार्थी लेखन साहित्य पुरवणे | 1500000 | 0 | 1545411 |
| 6 | विद्यार्थ्यांना मोफत वहया वाटप वरील खर्च | 2000000 | 0 | 1991068 |
| 7 | मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी गणवेश भत्ता | 3000000 | 0 | 2779182 |
| | एकूण | 7275000 | 0 | 7173169 |

2012-13 मध्ये उपरोक्त 7 बाबींवर मंजूर तरतूद रु.7275000/- होती, परंतु सुधारित तरतूद मंजूर नसतांना वरीलप्रमाणे रु.7173169/- खर्च करण्यात आलेला आहे. मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम 1949 कलम 156 नुसार अर्थसंकल्पात तरतूद नसलेल्या बाबींसाठी शासनाची/महानगरपालिकेची मान्यता घेणे आवश्यक असताना त्याप्रमाणे मंजुरी घेतली नाही.

4) जमेच्या अर्थसंकल्पाबाबत दिलेले अर्धसमास ज्ञापन क्र.17 दि.15/5/2015 मधील मुद्दा क्र.3 चे अनुपालन संयुक्तीक नाही. शिक्षण मंडळाने सर्व शिक्षा अभियान योजनेमधून CRC व BRC च्या RPs वेतनासाठी अंदाजित प्राप्त रकमेसाठी रु. 25 लाख ची तरतूद शिक्षण मंडळाच्या जमेच्या अर्थसंकल्पात केली होती. सर्व शिक्षा अभियान योजनेमधून शिक्षण मंडळ निधीमध्ये रक्कम रु.32,64,000/- प्रमाणक क्र.205 व 206 दि.22/03/2013 अन्वये वर्ग करण्यात आली आहे. त्यामुळे वित्तीय वर्ष 2012-2013 च्या अर्थसंकल्पात प्रत्यक्षात रु.32,64,000/- जमा असतांना रु.4,31,000/- जमा नोंदविली आहे.

त्यामुळे सदरचा अर्थसंकल्प सदोष असून अर्थसंकल्प तयार करतांना यापुढे दक्षता घेण्यात यावी.

आक्षेपाधिन रक्कम

परिशिष्ट 1 प्रमाणे -रु.581020/-

परिशिष्ट 2 प्रमाणे -रु.34692463/-

परिशिष्ट 3 प्रमाणे -रु.7173169/-

एकूण रु.42523482/-

DGPAGPM8503 (Ref No : 2, Hmm No : 03)

### *3 दफ्तर खरेदी प्रक्रियेतील अनियमिततेबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 12**

*प्राथमिक शिक्षण निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2779182.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 568138.00/-

***दफ्तर खरेदीच्या निविदेस योग्य ती प्रसिद्धी देण्यात आल्याचे दिसून येत नाही. दि.30/9/2012 रोजीच्या मा. शिक्षण उपसंचालक यांनी निश्चित केलेल्या सरासरी उपस्थित विद्यार्थी पटसंखेपेक्षा जादा दफ्तरांची मागणी करण्यात आल्याने रु.322/- प्रतिनग याप्रमाणे 1405 नगासाठी पुरवठादारास रु.4,52,410/- एवढे जादा रक्कमेचे प्रदान करण्यात आले आहे. नमुना तपासणी करण्यात आली नाही. तीनही निविदाधारक हे एकाच कुटुंबातील असल्याने दरामध्ये स्पर्धा झाली नाही. 2% व्हट ची रक्कम रु.55,584/- पुरवठादाराकडून वसूल करण्यात आलेली नाही. देयकांतून कपात केलेली रु.61,144/- एवढी आयकराची रक्कम भारतीय आयकर अधिनियम कलम 194(क) अन्वये शासन लेख्यात चलनाने भरणा करण्यात आली नाही.***

विद्यार्थ्यांना मोफत दफ्तर पुरवठा करण्यासाठी अवलंबण्यात आलेल्या निविदा प्रक्रिया नस्तीचे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे निविदा प्रक्रियेचा तपशील आढळून आला.

निविदा जाहिरातीचे वृत्तपत्र = नवा काळ व फ्री प्रेस.

निविदा अर्ज विक्रीचा कालावधी = 27/08/2012 ते 03/09/2012.

प्राप्त निविदा = 06 (दि. 14/10/2012 च्या मान्य टिपणीनुसार)

नस्तीत उपलब्ध निविदा =

3) सेक्युरा कंपनी,- पूजा पार्क, प्लॉट न. 568, खेर सेक्शन अंबरनाथ पूर्व.

4) श्री गणेश ऑफसेट प्रिंटर्स- दुर्गा देवी पाडा, अंबरनाथ पूर्व.

5) युधी एन्टरप्रायजेस- पूजा पार्क, प्लॉट न. 568, खेर सेक्शन अंबरनाथ पूर्व

निविदा मुदतवाढ कालावधी = 04/09/2012 ते 14/09/2012

पुरवठा आदेश = जा. क्र./म.न.प.शि.मं./शिक्षण/७२८/१२ दि.२७/११/२०१२.

शिक्षण मंडळ ठराव क्र. = १३३. दि. ०६/१०/२०१२

अंदाजपत्रकीय तरतूद = रक्कम रु. 30,00,000/-

एकूण खर्च = रक्कम रु. 27,79,182/-

प्रमाणक क्र. = 387. दि. 18/01/2013

न्यूनतम दर = रु. 322/- प्रति नग. युधी इंटरप्राईजेस.

शिक्षण मंडळाकडून लेखा परिक्षणास उपलब्ध केलेल्या विषयांकीत नस्तीतील दि.3/8/2012 च्या टिपणीत नमूद केल्याप्रमाणे मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना दफ्तर पुरवठा करण्यासाठी निविदा मागवून शिक्षण मंडळाच्या ठराव क्र.133 दि.6/10/2012 अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार पुरवठादाराची नियुक्ती करण्यात आल्याचे दिसून येते. पुरवठादाराशी दि.25/10/2012 रोजी करारनामा करुन कार्यादेश क्र.मनपाशिमंउ/शिक्षण/728/12 दि.27/11/2012 अन्वये कार्यादेश देण्यात आला आहे. पुरवठादाराने कार्यादेशाच्या दिनांकापासून 30 दिवसात मालाचा पुरवठा केलेला आहे. सदर बाबीसाठी होणारा खर्च “मनपा शाळांमधील विद्यार्थ्यांना दफ्तर पुरविणे” या लेखाशीर्षाखालील वर्ष 2012-13 साठी मंजूर तरतूद रु.30.00 लक्ष यामधून भागविण्यात आला आहे. प्रमाणक क्र.387 दि.18//01/2013 अन्वये पुरवठादारास रु.27,79,182/- एवढे प्रदान करण्यात आले आहे. याबाबत विभागाकडून प्राप्त नस्ती, खर्चाचे प्रमाणक व पुरवठा चलनाची तपासणी केली असता लेखा परिक्षणास काही बाबींमध्ये त्रुटी दिसून आल्या. सदर त्रृटी बाबत खुलासा करण्याबाबत अर्धसमास पत्र क्र. 24 दि. 29/05/15 अन्वये विनंती करण्यात आली होती.प्रशासन अधिकारी यांचे पत्र दि.04/06/15 नुसार अनुपालन सादर करण्यात आले. तथापी खुलासा संयुक्तिक नसल्याने लेखापरीक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मनपा शाळांतील विद्यार्थ्यांना दफ्तर पुरवठा करणेसाठी पुरवठा करावयाच्या दफ्तरांची बाजारातील दरांची पडताळणी करुन यासाठी लागणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक(estimate cost) तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेवून सदर अंदाजपत्रकाच्या आधारे खरेदीसाठी जाहिर निविदा मागविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न करता अर्थसंकल्पीय तरतूद विचारात घेवून निविदा मागविण्यात आल्या आहे. बाजारभावानुसार खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता न घेता निविदा मागवण्यात आल्या असून स्वीकृत निविदेचे दर बाजारभावानुसार वाजवी असल्याची खात्री केली नाही.

2) उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क.भांखसं-1093/(2635)/उद्योग-6 दि.16 जुलै,1993 एका वस्तूची वार्षीक खरेदी रु.50,000/- किंवा त्यापेक्षा जास्त असेल अशावेळी राजपत्रात निविदा चौकशी प्रसिध्द करुन निविदा मागविणे बंधनकारक आहे. या खेरीज त्या निविदेची जाहिरात मोजक्या शब्दात

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत योग्य त्या वृत्तपत्रात देणे आवश्यक आहे. प्रस्तूत प्रकरणी जाहिर निविदा प्रसिध्दीचा तपशील, जसे निविदा जाहिरात प्रसिध्दीचा मसूदा, ज्या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली त्याची कात्रणे ई.तपशिल नस्तीत उपलबध झाला नसल्याने निविदेस योग्य ती प्रसिद्धी देण्यात आल्याचे दिसून येत नाही. स्थानिक पुरावठादारास लाभ देण्यात आलेला असून योग्य प्रसिद्धीअभावी स्पर्धात्मक दराचा शिक्षण मंडळास लाभ झाला नाही.

3) निविदा कालावधीत टिपणीनुसार 06 निविदा प्राप्त झाल्या, एकूण 03 वैध निविदा नस्तीत आढळल्या असून अवैध ठरवलेल्या निविदा नस्तीत आढळून आल्या नाहीत. कमी अधिक दरांबाबत तुलनात्मक तक्ता, निविदा उघडल्याचा दिनांक, निविदा निवड समितीच्या बैठकीचे इतिवृत्त, लघुत्तम दराची निविदा मंजूरीबाबत निविदा समितीची शिफारस इ.तपशिल पडताळणीसाठी लेखा परिक्षणास उपलब्ध झाला नाही. त्यामुळे दफ्तर पुरवठा करण्यासाठी केलेली निविदा प्रक्रीयेत उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भाखंस-1088/(2512)/उद्योग-6 दि.2 जानेवारी 1992 व शासन निर्णय क्र.भांखस-1094/(2679)/उद्योग-6 दि.30 मार्च 1994 मधील कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात आला नसून निविदा कार्यपद्धती पारदर्शक दिसत नाही.

4) कार्यादेश क्र.मनपाशिमंड/शिक्षण/728/12 दि.27/11/2012 अन्वये पुरवठादारास 8631 एवढया नगांचा पुरवठा करण्यास आदेशित केले होते. तथापि पुरवठा चलन क्र.804 दि.14/12/2012 नुसार दफ्तर पुरवठयाचे परिमाण 8136 एवढे असतांना पुरवठादारास 8631 दफ्तर पुरवठयाचे प्रदान करण्यात आले आहे. यावरुन रु.322/- प्रतिनग याप्रमाणे 495 नगासाठी पुरवठादारास रु.1,59,390/- एवढे जादा रक्कमेचे प्रदान करण्यात आले आहे. सदर जादा प्रदानाची रक्कम वसूलपात्र आहे, तरी पुरवठादाराकडून रु.1,59,390/- वसुल करुन शिक्षण मंडळाकडे भरणा करण्यात यावी.

5) शिक्षण मंडळाकडील दि.30/9/2012 रोजीच्या मा. शिक्षण उपसंचालक यांनी निश्चित केलेल्या सरासरी उपस्थित विद्यार्थी पटसंख्यानुसार दफ्तरांची मागणी करणे आवश्यक होते, तथापि कार्यादेश क्र.मनपाशिमंड/शिक्षण/728/12 दि.27/11/2012 अन्वये पुरवठादारास 8631 एवढया नगांचा पुरवठा करण्यास आदेशित केले होते. शिक्षण मंडळाकडील दि.30/9/2012 रोजीच्या मा. शिक्षण उपसंचालक यांनी निश्चित केलेल्या सरासरी विद्यार्थी संख्येपेक्षा जादा दफ्तरांची मागणी केल्याचे खालील तपशिलावरुन दिसून येते.

| अ. क्र. | साहित्याचा तपशिल | वाटप करावयाचा वर्ग | पुरवठा आदेशानुसार मागणी | दि.30/09/2012 ची सरासरी उपस्थित पटसंख्या | जादा मागणी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | दफ्तर | 1ली ते 7वी | 8631 | 6731 | 1900 |

दि.30/9/2012 रोजी सरासरी उपस्थित विद्यार्थी संख्येपेक्षा जादा दफ्तरांचा पुरवठा करण्यात आल्याने

रु.322/- प्रतिनग याप्रमाणे 1900 नगासाठी पुरवठादारास रु.6,11,800/- एवढी जादा रक्कम विनाउपयोग गुंतून राहिली. त्यामुळे सदर जादा रक्कम रु.6,11,800/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

6) निविदेच्या अटी व शर्ती अन्वये नमुना तपासणीचा अहवाल तांत्रिकदृष्ट्या योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर पुरवठा आदेश निर्गमित करण्याची तरतूद होती, परंतु नमुना तपासणी करण्यात आली नाही व नमुना तपासणी न करताच पुरवठा आदेश निर्गमित केला आहे. त्यामुळे मालाच्या दर्जाबद्दल खात्री न करता पुरवठा आदेश देण्यात आला आहे..

7) मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना दफ्तर पुरवठा करण्यासाठी शिक्षण मंडळ ठराव क्र.133 अन्वये दि.6/10/2012 रोजी मान्यता देण्यात आली, पुरवठादाराशी दि.25/10/2012 रोजी करारनामा करण्यात आला, पुरवठा आदेश दि.27/11/2012 रोजी देण्यात आले, पुरवठादाराने शैक्षणिक वर्षाच्या 2ऱ्या सहामाहित( डिसेंबर महिन्यात ) पुरवठा केला आहे. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस दफ्तर पुरवठा होणे आवश्यक होते. उशिरा दफ्तर पुरवठा झाल्याने 2012 -13 शैक्षणिक वर्षात 67 31 विद्यार्थी डिसेंबरपर्यंत दफ्तराच्या लाभापासून वंचित राहिले.

8) पुरवठादाराने शाळानिहाय वाटप केलेल्या दफ्तरांचा पुरवठाचलनानुसार पडताळणी करण्यासाठी मालसाठा नोंदवही लेखा परिक्षणास पडताळणीसाठी उपलब्ध झाल्या नाहीत. पुरवठादाराने विहीत कालावधीत केलेल्या दफ्तरांच्या पुरवठयाची शिक्षण मंडळाकडील साठा नोंदवही लेखा परिक्षणास पडताळणीसाठी उपलब्ध करण्यात आली नसल्याने प्राप्त साठा, वाटप व शिल्लक साठा याची खात्री करता आली नाही.

9)पुरवठादारांचे नाव व पत्ता यावरून तीनही निविदाधारक हे एकाच कुटुंबातील असून विविध संस्थांच्या नावाने त्यांनी संगनमताने निविदा सादर केलेल्या आहेत. त्यामुळे शिक्षण मंडळास स्पर्धात्मक दर प्राप्त झालेला नाही. तसेच मुंबई वित्तीय नियम 1959 नियम 58 मधील वित्तीय औचित्यांचे पालन झालेले नाही. सदर बाब शासनाकडून क्षमापित करुन घेणे आवश्यक आहे. निविदा प्रक्रियाचा हेतू साध्य झाला नाही. निविदाधारकांचा तपशील खालीलप्रमाणे,

1) युधी इंटरप्राईजेस- वीणा पुरुषोत्तम उगले.

2) सेकुरा कंपनी- युवराज पुरुषोत्तम उगले.

3) गणेश ऑफसेट प्रिंटर्स- पुरुषोत्तम एकनाथ उगले.

10) प्रमाणकासोबत पुरावठादाराचे बील ( TAX INVOICE) जोडण्यात आलेले नाही, त्यामुळे पुरवठादाराने 2% विक्रीकर शासनाकडे भरल्याची खात्री झाली नाही. 2% विक्रीकराची रक्कम रु.55,584/- पुरवठादाराकडून वसूल करून शासन खाती चलनाने भरणा करण्यात यावी.

11) कार्यादेश क्र.मनपाशिमंउ/शिक्षण/728/12 दि.27/11/2012 अन्वये पुरवठादाराने मालाचा पुरवठा उल्हासनगर महानगरपालिकेच्या सर्व 29 शाळांमध्ये करावयाचा होता, प्रत्यक्षात केवळ एकाच शाळेमध्ये सर्व शाळांसाठीच्या दफ्तरांचा पुरवठा केला असताना देयक अदा करण्यात आले आहे. यामुळे पुरवठादाराच्या वाहतूक खर्चात बचत झाली असून शाळा मंडळावर सदर खर्चाचा भार पडलेला आहे. पुरवठादारास अवाजवी

फायदे देण्यात आलेले आहेत.

12) देयकांतून कपात केलेली रु.61,144/- एवढी आयकराची रक्कम भारतीय आयकर अधिनियमचे कलम 194(क) अन्वये शासन लेख्यात चलनाने भरणा करण्यात आली नाही.

वसुलपात्र रक्कम रु.2,14,974/-

आक्षेपाधिन रक्कम रु.27,79,182/-

DGPAGPM8503 (Ref No : 4, Hmm No : 24)

## *4 भविष्य निर्वाह निधी लेख्यातील त्रुटींबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 06**

*लेखा शीर्ष : भ.नि.नि. शिक्षण मंडळ निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम रु. 20109547.00/-

***रोखवहीत महिना अखेरच्या शिल्लक रकमांच्या नोंदी पेन्सिलने नोंदविण्यात आलेल्या आहेत. भविष्य निर्वाह निधी नियम 26 व 29 नुसार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सेवानिवृत्तीपूर्व 3 महिने अगोदर त्याच्याकडून अग्रिम व वर्गणीची वसुली थांबविण्यात आलेली नाही. लेख्यांच्या नोंदीमध्ये खाडाखोड उपरीलेखन व्हाईट इंकचा वापर करुन नोंदींमध्ये बदल करण्यात आले असून सदर बदल / फेरफार केलेल्या नोंदी सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेल्या नाहीत. भ.नि.निधीच्या शिल्लक रकमेचे सुयोग्य नियोजन करुन गुंतवणूक करण्यात आली नसल्याने महिना निहाय सरासरी रु.30.00 लक्ष एवढी रक्कम खात्यात पडून राहिली आहे. ब्रॉडशीटनुसार खात्यांतील रक्कम व प्रत्यक्ष शिल्लक यामध्ये रु.2,01,09,547/- एवढी तफावत असल्याचे दिसून येते.***

उल्हासनगर मनपा शिक्षण मंडळाकडील भविष्य निर्वाह निधी लेख्याची तपासणी करता आढळून आलेल्या त्रुटींबाबत लेखा परिक्षणास खुलासा करण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.26 दि.28/05/2015 अन्वये शिक्षण मंडळास कळविण्यात आले असता याबाबत शिक्षण मंडळाकडील पत्र दि.4/06/2015 अन्वये खुलासा सादर केला आहे. प्राप्त खुलासा पडताळणी केला असता खुलासा परिपुर्ण नाही व आक्षेपानुसार कार्यवाही करुन अनुपालन देण्यात आले नसल्याने त्यानुसार खालील प्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) मुंबई शाळा मंडळ लेखा संहिता 1953 नियम 21(1) नुसार भविष्य निर्वाह निधीची रोखवहीही

सर्वसाधारण निधीच्या रोखवही प्रमाणे नमूना क्रमांक 1 मध्ये ठेवणे आवश्यक असून नियम 21(2) नुसार रोखवहीमध्ये दैनंदिन व्यवहाराच्या नोंदी घेवून प्रत्येक दिवसा अखेरची शिल्लक नोदविणे आवश्यक आहे. परंतू शिक्षण मंडळाकडील भ.नि.निधीची रोखवही उपरोक्त प्रमाणे विहीत नमून्यात ठेवण्यात आलेली नाही.

2) रोखवहीत प्रत्येक महिना अखेरच्या शिल्लक रकमांच्या नोंदी पेन्सिलने नोंदविण्यात आलेल्या आहेत. तसेच सर्वसाधारण निधीच्या रोखवहीप्रमाणे जमा व खर्चाच्या नोंदी प्रशासकीय अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीने प्रमाणित करण्यात आलेल्या नाहीत. त्यानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

3) भविष्य निर्वाह निधी नियम 26 व 29 नुसार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सेवानिवृत्तीपूर्व 3 महिने अगोदर त्याच्याकडून अग्रिम व वर्गणीची वसुली थांबविण्यात येईल. तसेच नियत सेवावधीच्या कमीत कमी एक महिना अगोदर परंतू नियत सेवावधीच्या दिनांकास कर्मचाऱ्यास ती रक्कम मिळेल अशा पध्दतीने भविष्य निर्वाह निधीचा अंतिम प्रदान आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे. परंतू उमपा शिक्षणमंडळाने खालील कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीच्या महिन्यापर्यन्त भ.नि.नि.ची वर्गणी कपात केल्याचे आढळून आले आहे.

| भ.नि.नि. खाते क्र. | वर्गणीदाराचे नाव | सेवानिवृत्तीचा दिनांक | वर्गणी वसुलीचा अखेरचा महिना |
|---|---|---|---|
| 143 | श्रीम.अनिता कुकरेजा | दि.31/7/2012 | जुलै,2012 |
| 306 | श्रीम.सरिता टी धमेजन | दि.31/12/2012 | नोंव्हेबर 2012 |
| 466 | श्रीम.ज्योती पी जेठानी | दि.31/10/2012 | सप्टेंबर 2012 |
| 474 | श्रीम.विजया चौधरी | दि.31/1/2013 | डिसेंबर 2012 |
| 579 | श्रीम.वत्सला सी.पाटील | दि.30/9/2012 | सप्टेंबर 2012 |

तसेच वरील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या भ.नि.नि.चे अंतिम प्रदानाचे आदेश काढण्यात आलेले आढळून आले नाही.

4) 2012-13 च्या भविष्य निर्वाह निधी लेख्यांची खातेवहीची तपासणी करतांना खालील कर्मचाऱ्यांच्या लेख्यांच्या नोंदीमध्ये खाडाखोड, उपरीलेखन, व्हाईट इंकचा वापर करुन नोंदींमध्ये बदल करण्यात आले असून सदर बदल / फेरफार केलेल्या नोंदी सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेल्या नाहीत. त्यामुळे खात्यातील शिल्लक रकमांच्या योग्यतेबाबत लेखापरिक्षणास खात्री झाली नाही.

| खाते क्र. | खातेदाराचे नाव |
|---|---|
| 577 | श्रीम.सुमन झांबरे |
| 611 | श्री.गजानन भारते |
| 696 | श्रीम.मनिषा सुरांजे |
| 703 | श्रीम.जयश्री नेमाडे |

| | |
|---|---|
| 705 | श्रीम.साक्षी कांबळे |

सदर खात्याच्या नोंदीमध्ये केलेल्या दुरुस्त्या, उपरीलेखन करुन केलेले बदल यांची खात्री करुन नोंदीमध्ये केलेले बदल सक्षम प्राधिकाऱ्याच्या स्वाक्षरीने प्रमाणित करण्यात यावी. तसेच वरीलप्रमाणे इतर खातेवहीतील नोंदींमधीलही बदल करण्यात आले असल्यास त्यांची पडताळणी करुन प्रमाणित करण्यात यावेत. त्यानुसार कार्यवाही करुन पुर्तता दर्शविण्यात यावी.

5) भविष्य निर्वाह निधी लेख्याच्या रोखवहीनुसार वर्ष 2012-13 मधील महिना निहाय अखेरच्या शिल्लकेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| महिना | रोखवहीनुसार महिना अखेरची शिल्लक रु. | पासबुकनुसार बँक खात्यात महिना अखेरची शिल्लक रु. | | |
|---|---|---|---|---|
| | | एसबीआयबँक | आयडीबीआयबँक | एकुण |
| एप्रील-2012 | 1670458.22 | 1670458.22 | 39907.00 | 1710365 |
| मे-2012 | 6613187.86 | 6733189.86 | 39907.00 | 6773097 |
| जुन-2012 | 2359085.86 | 2889085.86 | 39907.00 | 2928993 |
| जुलै-2012 | 2774627.86 | 2774627.86 | 39907.00 | 2814535 |
| ऑगस्ट-2012 | 1589034.86 | 1589034.86 | 39907.00 | 1628942 |
| सप्टेंबर-2012 | 2213979.86 | 2463979.86 | 40707.00 | 2504687 |
| ऑक्टोबर-2012 | 4133442.86 | 4133442.86 | 40707.00 | 4174150 |
| नोव्हेंबर-2012 | 2094891.86 | 334489.86 | 40707.00 | 375196.9 |
| डिसेंबर-2012 | 3661526.86 | 3661526.86 | 40707.00 | 3702234 |
| जानेवारी-2013 | 4587201.86 | 4722201.86 | 40707.00 | 4762909 |
| फेब्रुवारी-2013 | 2915174.86 | 2915174.86 | 40707.00 | 2955882 |
| मार्च-2013 | 1510398.86 | 1510398.86 | 41519.00 | 1551918 |
| एकूण सरासरी | 37123002.86 / 12 = 3093583.57 | 35397611.68/12 =2949800.97 | 485296.00/12 =40441.00 | 35882908.00/12 =2990242.00 |
| | 36152012 | | | 2990242 |

वरीलप्रमाणे भविष्य निर्वाह निधी लेख्यात रोखवहीनुसार महिना अखेर सरासरी रु.30,93,583.57 एवढी रक्कम शिल्लक राहीली असल्याचे दिसून येते. तरी लेख्यात महिना निहाय जमा होणाऱ्या रकमा, सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या अंतिम प्रदानाच्या रकमा, इतर कर्मचाऱ्यांच्या मागणीनुसार अदा करावयाच्या अग्रिम रकमांचा वेळोवेळी आढावा घेवून भ.नि.निधीच्या शिल्लक रकमेचे सुयोग्य नियोजन करुन गुंतवणूक न केल्याने महिना निहाय मोठया प्रमाणात खात्यात रक्कम अनावश्यक पडून राहिली आहे. पर्यायाने शिक्षण मंडळास सदर रकमेवरील व्याजाचे नुकसान झाले आहे.

6) भविष्य निर्वाह निधीच्या खातेवहीनुसार असलेल्या शिल्लकेशी बँकतील शिल्लक रक्कम अधिक भ.नि.निधीच्या गुंतवणूकीच्या रकमा यांचेशी पडताळणी केली असता खातेवहीतील शिल्लकेपेक्षा बँकेतील शिल्लक अधिक गुंतवणूक यांची एकूण रक्कम कमी असल्याचे दिसून येते. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | दि.31/3/2013 रोजी भ.नि.नि.च्या शिलकेचा तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| 1 | ब्रॉडशीटनुसार भ.नि.नि.खात्यांमधील एकूण शिल्लक | रु.9,70,33,074/- |
| 2 | अ) गूंतवणूकीच्या मुद्दलाची एकूण रक्कम | रु.7,53,71,610/- |
| 3 | ब) आयडीबीआय बँक खात्यातील शिल्लक | रु.41,519/- |
| 4 | क) एसबीआय बँक खात्यातील शिल्लक | रु.15,10,398/- |
| 5 | एकूण (2+3+4) | रु.7,69,23,527/- |
| | ब्रॉडशीट व रोखवहीतील शिलकेतील तफावत (अ.क्र.1वजा 5) | रु.2,01,09,547/- |

वरीलप्रमाणे भविष्य निर्वाह निधीच्या ब्रॉडशीटनुसार वर्गणीदारांच्या खात्यांमधील दि.31/3/2013 अखेर एकूण रु.9,70,33,074/- एवढी रक्कम शिल्लक आहे. परंतु गुंतवणूकीची रक्कम व रोखवहीची शिल्लक विचारात घेता शिक्षण मंडळाकडे भविष्य निर्वाह निधीच्या खाती शिल्लक एकूण रु.7,69,23,527/- एवढी आहे. त्यानुसार ब्रॉडशीटनुसारच्या रक्कमेपेक्षा प्रत्यक्ष शिल्लक रु.2,01,09,547/-ने कमी आहे. मुंबई शाळा मंडळ लेखा संहिता 1953 मधील नियम 8(1) (2) नुसार सदर तफावतीचा ताळमेळ घेतलेला नसून तफावत दुर केलेली नाही.

वसुलपात्र रक्कम रु.2,01,09547/-

FDSANMM7201 (Ref No : 18, Hmm No : 26)

## *5 विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देण्यासाठीच्या प्रक्रियेतील अनिमितताबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 07**

*प्राथमिक शिक्षण निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***संगणक प्रशिक्षण देण्यासाठीच्या निविदेस योग्य ती प्रसिद्धी देण्यात आल्याचे दिसून येत नाही. सुरक्षा अनामत, निविदा फी व इसारा रक्कमेचा बँकेत भरणा केल्याबाबतचे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध केले नाहीत.***

***केवळ दोनच पात्र निविदा असल्याने शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार भां. ख स १०९४/२६७९/उद्योग-६ दि.30/03/1984 नुसार निविदेस किमान दोन वेळा मुदतवाढ देणे आवश्यक असतांना एकदाही मुदतवाढ न देता केवळ दोनच निविदा उघडयात आल्या आहेत. अंदाजपत्रकीय तरतूद नसताना 2011-12 ची देयके 2012-13 मध्ये अदा करण्यात आलेली आहेत. देयकांतून वेळोवेळी कपात केलेली आयकराची रक्कम भारतीय आयकर अधिनियमचे कलम 194(क) अन्वये शासन लेख्यात चलनाने भरणा करण्यात आली नाही.***

विद्यार्थ्यांना मोफत संगणक प्रशिक्षण देण्यासाठी अवलंबण्यात आलेल्या निविदा प्रक्रिया नस्तीचे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे निविदा प्रक्रियेचा तपशील आढळून आला.

| | |
|---|---|
| अंदाजपत्रिकीय तरतूद | रु.3,00,000/- |
| निविदा मागविण्याचा कालावधी | 14/7/2008 ते 21/7/2008 |
| निविदा फॉर्म फी | रु.500/- |
| प्राप्त निविदा | एकूण 5 (पात्र निविदा अ.क्र.1 व 2) |
| | 1) Pansi Tech. |
| | 2) Spectrum Infotech. |
| | 3) siddharth samajik sanstha. |
| | 4) manav vikas samajik sanstha. |
| | 5) vrunda bahuddeyshiy samajik shikshan sanstha. |

सर्वात कमी दर Pansi Technology या निविदाधारकाचे मोफत संगणक प्रशिक्षण देण्यासाठी रु.5.75 प्रतिविद्यार्थी दरमहा याप्रमाणे असून सदर निविदाधारकास पुरवठा आदेश क्र.शिमंपाशिमंउ/शिक्षण/104/2009 दि.27/10/2009 नुसार आदेश देण्यात आलेले आहेत. सदर नस्तीची व उपलब्ध अभिलेख्यांची तपासणी केली असता निविदा प्रक्रियेत काही त्रूटी आढळून आल्या. याबाबत अर्धसमास पत्र क्र. ३४ अन्वये लेखा परिक्षणासाठी खुलासा करण्यास विनंती केली असता कोणताही खुलासा प्राप्त झाला नाही. त्यानुसार खालीलप्रमाणे लेखापरीक्षणाचे अभिप्राय आहेत.

1) मुंबई प्राथमिक शिक्षण नियम 1949 नियम 55 ते 59 मध्ये नमूद केल्यानुसार शिक्षण मंडळाने जाहिर निविदा मागवून पुरवठादाराची नियुक्ती करणे आवश्यक आहे.उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भांखसं 1093/(2635)/उद्योग-6 दि.16 जुलै,1996 अन्वये रु.50,000/- किंवा त्यापेक्षा अधिक खर्च असेल अशावेळी राजपत्रात निविदा चौकशी प्रसिध्द करुन निविदा मागविणे बंधनकारक आहे. तसेच निविदेची जाहिरात वृत्तपत्रात देणेही आवश्यक आहे. तथापि 2009 साली निविदा प्रक्रियेद्वारे नेमलेल्या संस्थेस 05 वर्षांसाठी मुदतवाढ दिलेली आहे. 2009 साली राबवलेल्या निविदा प्रक्रिया नस्तीची तपासणी केली असता प्रस्तूत प्रकरणी जाहिर निविदा प्रसिध्दीचा तपशील, जसे निविदा जाहिरात

प्रसिध्दीचा मसूदा, ज्या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली त्याची कात्रणे ई.तपशिल नस्तीत उपलबध झाला नसल्याने निविदेस योग्य ती प्रसिद्घी देण्यात आल्याचे दिसून येत नाही. स्थानिक पुरावठादारास लाभ देण्यात आलेला असून योग्य प्रसिद्घीअभावी स्पर्धात्मक दराचा शिक्षण मंडळास लाभ झाला नाही.

2) सुरक्षा अनामत रु. 150 00/-, निविदा फी रु.100/- व इसारा रक्कम रु.3000/- चा बँकेत भरणा केल्याबाबतचे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध केले नसल्यामुळे सदरची रक्कम शिक्षण मंडळ निधीत जमा झाल्याची खात्री करता आली नाही. मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४९ कलम 157(2) अन्वये प्राप्त निधी शिक्षण मंडळ निधीत जमा करणे आवश्यक आहे. रक्कम शिक्षण मंडळ निधीत जमा करण्याची दक्षता घेण्यात आली नाही.

3)प्राप्त निविदा सक्षम प्राधिकाऱ्यासमोर उघडल्याबाबत लिफाफ्यावर त्याची स्वाक्षरी घेणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे निविदा प्रक्रिया सदोष असून निविदेतील स्पर्धा पारदर्शक झाल्याचे दिसत नाही.

4)प्राप्त पाच निविदा मधील तीन निविदा कामाचे अनुभव प्रमाणपत्र नसल्याने अपात्र ठरविण्यात आल्या आहेत. शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार भां. ख स १०९४/२६७९/उद्योग-६ दि.30/03/1984 नुसार दर निश्चितीसाठी किमान तीन पात्र निविदा असणे आवश्यक आहे. केवळ दोनच पात्र निविदा असल्याने शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार भां. ख स १०९४/२६७९/उद्योग-६ दि.30/03/1984 नुसार निविदेस किमान दोन वेळा मुदतवाढ देणे आवश्यक असतांना एकदाही मुदतवाढ न देता केवळ दोनच निविदा उघडण्यात आल्या आहेत. त्यामुळे नियमानुसार कार्यवाही करण्यात आली नाही.

5)प्रमाणकांची तपासणी केली असता असे दिसून आले कि, शाळा मुख्याध्यापकांकडून प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थी संख्यचे प्रमाणपत्र न घेता दरमहा ८००० विद्यार्थी प्रशिक्षणाचे देयक अदा करण्यात आले आहे. शाळा मुख्याध्यापकांकडून प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थी संख्यचे प्रमाणपत्र न घेता पुरवठा आदेशात नमूद 8000 विद्यार्थी संख्येनुसार रक्कम अदा केली आहे.

6) सन 2011-12 ची देयके सन 2012-13 मध्ये अदा करण्यात आलेली आहेत. यासाठी अंदाजपत्रकीय तरतूद केली नाही..

7) वेळोवेळी देयकातून कपात केलेला आयकर शासन खाती चलनाने भरणा केला नसून शासनाचा वसूल केलेला महसूल शासनास भरणा केलेला नाही.

DGPAGPM8503 (Ref No : 5, Hmm No : 34)

## *6 मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना लेखन साहित्य (स्टेशनरी) पुरवठा करणे*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 10**

*शिक्षण मंडळ निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1545411.00/-

***पुरवठा करावयाच्या लेखन साहित्याच्या बाजारातील दरांची पडताळणी करुन यासाठी लागणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेवून सदर अंदाजपत्रकाच्या आधारे अपेक्षित खर्चासाठी जाहिर निविदा न मागविता उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूद विचारात घेवून निविदा मागविण्यात आल्या आहेत. उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूदीपेक्षा पुरवठादारास जादा रकमेचे कार्यादेश देण्यात आले. कार्यादेशातील परिमाणापेक्षा पुरवठादाराने जादा साहित्याचा पुरवठा केला. अर्थसंकल्पीय तरतूदीपेक्षा रु.45,411/- एवढा जादा खर्च झाला. सदर लेखाशीर्षाखाली सुधारित अंदाजपत्रकात "निरक" तरतूद मंजूर पहाता सदर लेखाशीर्षाखाली रु.15,45,411/- एवढा जादा खर्च झाला आहे.***

शिक्षण मंडळाकडून लेखा परिक्षणास उपलब्ध केलेल्या विषयांकीत नस्तीतील दि.3/8/2012 च्या टिपणीत नमूद केल्याप्रमाणे मनपा शाळेतील इ.1ली ते 7वी मधील विद्यार्थ्यांना लेखन साहित्याचा (कपासपेटी, पेन्सिल बॉक्स, कलर बॉक्स, बॉलपेन सेट, चित्रकलावही ) पुरवठा करण्यासाठी निविदा मागवून शिक्षण मंडळाच्या ठराव क्र.133 दि.6/11/2012 अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार मे.सेक्युरा कं. या पुरवठादाराची नियुक्ती करण्यात आल्याचे दिसून येते. पुरवठादाराशी दि.25/10/2012 रोजी करारनामा करुन कार्यादेश क्र.मनपा शिमंउ/ शिक्षण /727/12 दि.27/11/2012 अन्वये कार्यादेश देण्यात आला आहे. पुरवठदाराने कार्यादेशाच्या दिनांकापासून 30 दिवसात मालाचा पुरवठा करणे आवश्यक आहे. सदर बाबीसाठी होणारा खर्च "मनपा शाळांमधील विद्यार्थ्यांना लेखन साहित्य पुरविणे" या लेखाशीर्षाखाली वर्ष 2012-13 साठी मंजूर तरतूद रु.15.00 लक्ष या मधून भागविण्यात आला आहे. प्रमाणक क्र.429 दि.15/2/2013 अन्वये मे.सेक्युरा कं. या पुरवठादारास रु.15,45,411/- एवढे प्रदान करण्यात आले आहे. याबाबत विभागाकडून प्राप्त नस्ती, खर्चाचे प्रमाणक व पुरवठा चलनाची तपासणी केली असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत खुलासा करण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.27 दि.29/05/2015 अन्वये शिक्षण मंडळास कळविण्यात आले असता पत्र क्र.निरंक दि.4/6/2015 अन्वये शिक्षण मंडळाकडून खुलासा सादर करण्यात आला आहे. सदर खुलासा पडताळणी करता खुलासा आक्षेपांशी सुसंगत नाही. तसेच त्यावरुन आक्षेपांची पुर्तता होत नसल्याने खालीलप्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) मनपा शाळांतील विद्यार्थ्यांना लेखन साहित्य पुरवठा करणेसाठी पुरवठा करावयाच्या लेखन साहित्याच्या बाजारातील दरांची पडताळणी करुन यासाठी लागणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेवून सदर अंदाजपत्रकाच्या आधारे अपेक्षित खर्चासाठी जाहिर

निविदा मागविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही न करता अर्थसंकल्पीय तरतूद विचारात घेवून निविदा मागविण्यात आल्या आहे. बाजारभावानुसार खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आलेली नाही.

2) उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क.भांखसं-1093/(2635)/उद्योग-6 दि.16 जुलै,1993 एका वस्तूची वार्षीक खरेदी रु.50,000/- किंवा त्यापेक्षा जास्त असेल अशावेळी राजपत्रात निविदा चौकशी प्रसिध्द करुन निविदा मागविणे बंधनकारक आहे. याखेरीज त्या निविदेची जाहिरात मोजक्या शब्दात माहिती व जनसंपर्क महासंचालनालया मार्फत योग्य त्या वृत्तपत्रात देणे आवश्यक आहे. प्रस्तूत प्रकरणी जाहिर निविदा प्रसिध्दीचा तपशील, जसे निविदा जाहिरात प्रसिध्दीचा मसूदा, ज्या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली त्याची कात्रणे इ.तपशिल नस्तीत उपलबध झाला नाही. त्यामुळे लेखन साहित्याचा पुरवठा करण्यासाठी निविदा प्रक्रीयेस जाहिर प्रसिध्दी देण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.

3) निविदा कालावधीत किती वैध निविदा प्राप्त झाल्या, एकूण प्राप्त वैध निविदांचा तपशिल, कमी अधिक दरांबाबत तुलनात्मक तक्ता, निविदा उघडल्याचा दिनांक, निविदा समितीच्या बैठकीचे इतिवृत्त, लघुत्तम दराची निविदा मंजूरीबाबत निविदा समितीची शिफारस ई. तपशिल पडताळणीसाठी लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही. त्यामुळे लेखन साहित्याचा पुरवठा करण्याच्या निविदा प्रक्रीयेत उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भाखंस-1088/(2512)/उद्योग-6 दि.2 जानेवारी 1992 व शासन निर्णय क्र.भांखस-1094/ (2679)/उद्योग-6 दि.30 मार्च 1994 मधील कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री करता झाली नाही.

4) कार्यादेश क्र.मनपा शिमंड/शिक्षण/727/12 दि.27/11/2012 अन्वये पुरवठादारास रु.15,19,671/- एवढया रकमेचे लेखन साहित्य पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. परंतू सदर बाबीसाठी वर्ष 2012-13 साठी रु.15.00 लक्ष एवढी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर असतांना मंजूर तरतूदीपेक्षा रु.19,671/- एवढया जादा रकमेचा कार्यादेश देण्यात आला आहे.

5) प्रमाणक क्र.429 दि.15/2/2013 अन्वये पुरवठादारास रु.15,45,411/- एवढे प्रदान करण्यात आले आहे. कार्यादेशापेक्षा रु.25,740/- व मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीपेक्षा सदर लेखाशीर्षाखाली रु.45,411/- एवढा जादा खर्च करण्यात आला आहे. कार्यादेशापेक्षा व मंजूर तरतूदीपेक्षा जादा खर्चास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आलेली नाही.

6) शिक्षण मंडळाकडील दि.30/9/2012 रोजी उपस्थित विद्यार्थी पटसंख्यानुसार पुरवठा चलन क्र.401 दि.24/12/2012 अन्वये प्राप्त लेखन साहित्याचा पुरवठयाची पडताळणी करता दि.30/09/2012 रोजीच्या विद्यार्थी संख्येपेक्षा जादा विद्यार्थ्यांसाठी लेखन साहित्याचा पुरवठा केल्याचे खालील तपशिलावरुन दिसून येते.

| अ. क्र. | साहित्याचा तपशिल | वाटप करावयाचा | कार्यादेश व पुरवठा | दि.30/09/2012 ची उपस्थित | जादा वाटपाचे | साहित्याचा दर | जादा वाटपा |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | वर्ग | चलनानुसार परिमाण | पटसंख्या | परिमाण | प्रतीनग रुपये | वरील खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कंपास पेटी | इ.4थी ते 7वी | 5098 | 4133 | 965 | 100 | 96500 |
| 2 | पेन्सिल बॉक्स | 1ली ते 4थी | 4820 | 3565 | 1255 | 53 | 66515 |
| 3 | कलर बॉक्स | 1ली ते 7वी | 8136 | 6731 | 1405 | 52 | 73060 |
| 4 | बॉलपेन सेट | 5वी ते 7वी | 3811 | 3166 | 645 | 17 | 10965 |
| 5 | चित्रकला वही | 1ली ते 2री | 2202 | 1675 | 527 | 30 | 15810 |
| 6 | चित्रकला वही | 3री ते 4थी | 2618 | 1890 | 728 | 30 | 21830 |
| 7 | चित्रकलावही | 5वी ते 7वी | 3811 | 3166 | 645 | 32 | 20640 |
| | एकूण | | | | | | 305320 |

दि.30/9/2012 रोजीच्या उपस्थित विद्यार्थी संख्येपेक्षा जादा लेखन साहित्याचे शाळानिहाय पुरवठा करण्यात आल्यामुळे रु.3,05,320/- एवढा जादा खर्च करण्यात आला आहे. सदर जादा खर्चाची रक्कम रु.3,05,320/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

7) पुरवठा चलन क्र.401 दि.24/12/2012 नुसार 8136 एवढे कलर बॉक्स पुरवठा करण्यात आले असतांना पुरवठादारास 8631 कलर बॉक्सच्या पुरवठयाचे प्रदान करण्यात आले आहे. यावरुन रु.52/- प्रतिनग याप्रमाणे 495 नगासाठी पुरवठादारास रु.25,740/- एवढे जादा प्रदान करण्यात आले आहे. सदर जादा प्रदानाची रक्कम वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

8) मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना लेखन साहित्य पुरवठा करण्यासाठी शिक्षण मंडळ ठराव क्र.133 अन्वये दि.6/10/2012 रोजी मान्यता देण्यात आली, पुरवठादाराशी दि.25/10/2012 रोजी करारनामा करण्यात आला, पुरवठा आदेश दि.27/11/2012 रोजी देण्यात आले, पुरवठादाराने पुरवठा चलन क्र.401 दि.24/12/2012 अन्वये पुरवठा केल्याचे कळविले आहे. यावरुन विद्यार्थ्यांना सदर लेखन साहित्य दि.24/12/2012 रोजी म्हणजेच शैक्षणिक वर्षात 2ऱ्या सहामाही सत्रात पुरवठा करण्यात आले आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत विद्यार्थी लेखन साहित्याच्या लाभापासून वंचित राहिले. सबब सदर योजनाचा हेतू साध्य झालेला नाही.

9) पुरवठादाराने शाळा निहाय वाटप केलेल्या लेखन साहित्याच्या पुरवठा चलनानुसार पडताळणीसाठी लेखन साहित्याची साठा नोंदवही अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही लेखा परिक्षणास पडताळणीसाठी उपलब्ध झाली नाही. त्यामुळे प्रत्यक्षात प्राप्त साठा, विद्यार्थ्यांना केलेले वाटप व शिल्लक साठा याची पडताळणी करुन साहित्य पुरवठा व वाटप योग्यतेची तसेच शिल्लक साठयाची खात्री करता आली नाही.

10) देयकांतून कपात केलेली रु.33,999/- एवढी आयकराची रक्कम शासन लेख्यात भरणा करण्यात आल्याबाबत भरणा चलन लेखा परिक्षणास आढळून आले नाही. त्यामुळे सदर रक्कम शासन लेख्यात भरणा करण्यात आल्याबाबत लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही. भरणा चलनासह पुर्तता दर्शविण्यात यावी. तोवर सदर रक्कम वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम आक्षेप क्र.6 प्रमाणे रु.3,05,320/-
अधिक आक्षेप क्र.07 प्रमाणे रु.25,740/-
अधिक आक्षेप क्र.10 प्रमाणे रु.33,999/-
एकूण रु.3,65,059/-
आक्षेपाधिन रक्कम रु.15,45,411/-
FDSANMM7201 (Ref No : 19, Hmm No : 27)

## *7 बालवाडीमधील विद्यार्थ्यांसाठी खेळणी खरेदी करणेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 05**

*शिक्षण मंडळ निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 499500.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 30990.00/-

***मंजूर अर्थसंल्पिय तरतूद सुधारीत अंदाजपत्रकात कमी करण्यात आली आहे. त्यामुळे सदर लेखाशीर्षाखाली जादा खर्च झाला आहे. यास प्राधिकृत महानगरपालिकेची मान्यता घेण्यात आलेली नाही. निविदा प्रक्रीयेसाठी प्रशासकीय मान्यता दिल्याची नस्ती लेखा परिक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही. त्यामुळे निविदा प्रक्रीयेची पडताळणी करता आली नाही. आयकर व विक्री कराची वसुली करुन शासन जमा करण्यात आल्याबाबत खात्री झाली नाही.साठा नोंदवहया पडताळणीस उपलब्ध करण्यात आल्या नाहीत.***

शिक्षण मंडळाच्या शाळेतील बालवाडीतील विद्यार्थ्यांसाठी खेळणी खरेदीकरणेसाठी प्रत्येक शाळा निहाय रु.24,975/- एवढया रकमेच्या खेळण्यांचा पुरवठा याप्रमाणे एकूण 20 शाळांसाठी रु.4,99,500/- एवढा खर्च करण्यात आल्याचे दिसून येते. कार्यादेश क्र.132 दिनांक-23/2/2013 नुसार मे.ओम मनिष एन्टरप्रायजेस या पुरवठादाराने शाळानिहाय सादर केलेल्या दि.28/2/2013 रोजीच्या पुरवठा चलनांनुसार खेळण्यांच्या पुरवठयासाठी पुरवठादारास प्रमाणक क्र.461दि.12/3/2013 अन्वये रु.4,99,500/- एवढे प्रदान करण्यात आले आहे. यासाठी झालेला खर्च “खेळणी साहित्य,संगणक,दुरदर्शन संच खरेदी ई.”या लेखाशीर्षाखाली मंजूर अर्थसंकल्पीय तरतूद रु.6,00,000/- मधून खर्ची टाकण्यात आला आहे. सदर प्रमाणकाची व पुरवठा चलनांची पडताळणी केली असता आढळून आलेल्या त्रुटींबाबत लेखापरिक्षणास खुलासा करण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.28 दि.02/06/2015 अन्वये शिक्षण मंडळास कळविण्यात आले असता याबाबत विभागाकडून लेखा परिक्षण कालावधीत काहीही खुलासा करण्यात आला नाही. त्यानुसार

खालीलप्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क.भांखसं-1093/(2635)/उद्योग-6 दि.16 जुलै,1993 एका वस्तूची वार्षिक खरेदी रु.50,000/- किंवा त्यापेक्षा जास्त असेल अशावेळी राजपत्रात निविदा चौकशी प्रसिध्द करुन निविदा मागविणे बंधनकारक आहे. त्यानुसार सदर कामासाठी निविदा मागविण्यासाठी प्रशासकीय मान्यतेची नस्ती अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही लेखापरिक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही. त्यामुळे सदर खर्चासाठी निविदा मागवून खेळण्यांची खरेदी करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

2) सदर खर्चास शिक्षण मंडळाच्या मान्यतेचा ठराव, प्राप्त साठा पडताळणीसाठी साठा नोंदवहया लेखा परिक्षणासाठी उपलब्ध झाल्या नाहीत. त्यामुळे पुरवठा चलनानुसार साठा नोंदवहीतील परिमाणाची पडताळणी करुन खात्री करता आली नाही.

3) देयकातून कपात केलेली रु.10,990/- एवढी आयकराची  रक्कम शासन लेख्यात भरणा करण्यात आल्याबाबत भरणा चलन उपलब्ध झाले नाही. तसेच याबाबत खुलासा सादर करतांना भरणा चलनाची प्रत उपलब्ध करण्यात आली नाही. त्यामुळे सदर रक्कम शासन लेख्यात भरणा करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही.

4) देयकाच्या रकमेतून 4 टक्के सेल्स टॅक्स कपात करण्यात आल्याचे तसेच कपात केलेली रक्कम शासन लेख्यात भरणा करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणात आढळून आले नाही. त्यामुळे रु.20,000/- एवढी विक्री कराची रक्कम वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

5) सदर लेखाशीर्षाखाली 2012-13 साठी अर्थसंकल्पीय अंदाजात रु.6,00,000/- एवढी तरतूद मंजूर करण्यात आली होती. परंतू सुधारीत अंदाजात सदर लेखाशीर्षाखाली निरंक तरतूद मंजूर करण्यात आलेली आहे. सुधारित अंदाजात सदर लेखाशीर्षाखाली तरतूद उपलब्ध नसतांना रु.4,99,500/- एवढा खर्च करण्यात आला आहे. सदर जादा खर्चास मुंबई शाळा मंडळ नियम 1949 मधील नियम 156 नुसार प्राधिकृत महानगरपालिकेची मान्यता घेण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणात आढळून आले नाही. त्यामुळे बालवाडीतील विद्यार्थ्यांसाठी खेळणी खरेदी करणेसाठी सदर प्रमाणकांन्वये केलेला खर्च रु.4,99,500/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम रु.30,990/-

आक्षेपाधिन रक्कम रु.4,99,500/-

FDSANMM7201 (Ref No : 20, Hmm No : 28)

## *8 स्कॉलरशीप पुस्तकांची खरेदी / पुरवठा करणे या कामातील अनियमितांबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 06**

*शिक्षण मंडळ निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 371235.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 25311.00/-

***उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क.भांखसं-1093/ (2635)/उद्योग-6 दि.16 जुलै, 1993 नुसार निविदा न मागविता दरपत्रके मागवून पुरवठादार नियुक्त करण्यात आला आहे. प्राप्त पुस्तकांच्या पडताळणीसाठी साठा नोंदवहया लेखा परिक्षणास उपलब्ध करण्यात आल्या नाहीत. आयकर कपातीची रक्कम शासन जमा करण्यात आल्याचे आढळून आले नाही. विक्रीकर कपात करुन शासन खात्यात भरणा करण्यात आलेला नाही. सुधारित अंदाजात मंजूर अर्थसंकल्पीय तरतूद कपात करण्यात आल्यामुळे रु.3,71,250/- एवढा जादा खर्च करण्यात आला आहे.***

शिक्षण मंडळाच्या शाळेतील इ.4थी व इ.7वी मधील विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशीप पुस्तके / प्रश्नसंच खरेदी करण्यासाठी शिक्षण मंडळ ठराव क्र.132 दि.7/9/2012 अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार दरपत्रके मागवून मे.कौसल्या पब्लीकेशन या पुरवठादाराची नियुक्ती करण्यात आली आहे. इ.4थी च्या विद्यार्थ्यांसाठी 476 स्कॉलरशीप पुस्तके व 476 प्रश्नसंच तसेच इ.7वीच्या विद्यार्थ्यांसाठी 600 पुस्तके व 600 प्रश्नसंच पुरविण्यासाठी कार्यादेश क्र.मनपाशिमंउ/शिक्षण/649/12 दि.11/10/2012 अन्वये मे.कौसल्या पब्लीकेशन यांना 12% सवलतीच्या दराने रु.4,63,920/- एवढया रकमेवर रु.55,670/- सवलतीची रक्कम वजा जाता रु.4,08,250/- एवढया रकमेचे पुरवठयाचे आदेश देण्यात आले आहेत. पुरवठादाराने चलन क्र.446 दि.10/11/2012 अन्वये पुस्तकांचा पुरवठा केला असून पुरवठा चलनानुसार पुरवठादारास प्रमाणक क्र.461 दि.12/3/2013 अन्वये रु.4,08,250/- एवढे प्रदान करण्यात आले आहे. यासाठी झालेला खर्च “पुस्तक खरेदी व नियतकालीका प्रदर्शनावरील खर्च” या लेखाशीर्षाखाली मंजूर तरतूद रु.5.00लक्ष मधून खर्ची टाकण्यात आला आहे. सदर प्रमाणकाची व पुरवठा चलनांची पडताळणी केली असता अर्धसमास पत्र क्र.32 दि.03/06/2015 अन्वये खुलासा करण्याबाबत शिक्षण मंडळास कळविण्यात आले असता याबाबत लेखा परिक्षण कालावधीत काहीही खुलासा प्राप्त झाला नाही. त्यानुसार खालीलप्रमाणे लेखापरिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क.भांखसं-1093/ (2635)/उद्योग-6 दि.16 जुलै, 1993 एका वस्तूची वार्षीक खरेदी रु.50,000/- किंवा त्यापेक्षा जास्त असेल अशावेळी राजपत्रात निविदा चौकशी प्रसिध्द करुन निविदा मागविणे बंधनकारक आहे. सदर शासन निर्णयानुसार कार्यवाही न करता सदर कामासाठी नियमबाहयपणे दरपत्रके मागवून पुरवठादाराची नियुक्ती करण्यात आली आहे.

2) स्कॉलरशीप पुस्तकांचा व प्रश्नसंचाचा प्राप्त साठा पडताळणीसाठी साठा नोंदवहया लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करण्यात आल्या नाही. त्यामुळे सदर खर्चाबाबत साठा नोंदवहीची पडताळणी करुन खात्री करता

आली नाही.

3) पुरवठादाराच्या देयकातून रु.8,981/- एवढी आयकराची कपात करण्यात आली आहे. तथापि, सदर रक्कम शासन लेख्यात भरणा करण्यात आल्याबाबत भरणा चलन लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नसल्यामुळे सदर रक्कम शासनास भरणा करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही. त्यामुळे सदर रक्कम वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

4) देयकाच्या रकमेतून 4टक्के सेल्स टॅक्सची रक्कम रु.16,330/- वसुल करण्यात आल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे सदर रक्कम रु.16,330/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

5) स्कॉलरशीप परिक्षेसाठी इ.4थीच्या 446 विद्यार्थी व इ.7वीच्या 600 विद्यार्थ्यांना प्रश्नसंच व पुस्तकांचे वाटप करण्यात आले आहे. तरी सदर विद्यार्थ्यांपैकी किती विद्यार्थी स्कॉलरशीप परिक्षेत यशस्वी झाले व किती विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले याची वर्गनिहाय संख्या लेखापरिक्षणास उपलब्ध करण्याबाबत विभागास कळविण्यात आले असता याबाबतची माहिती उपल्बध करण्यात आली नसल्याने सदर योजनेच्या यशस्वी अंमलबजावणी बाबत लेखा परिक्षणास खात्री करता आली नाही.

6( सुधारित अंदाजपत्रक 2012-13 मध्ये सदर लेखा शीर्षाखाली रु.37,015/- एवढी सुधारित तरतूद मान्य करण्यात आली आहे. सदर लेखाशीर्षाखाली वर्ष अखेर मंजूर तरतूदीपेक्षा रु.3,71,235/- एवढा जादा खर्च झाला आहे. सदर जादा खर्चास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणास खात्री झाली नाही. त्यामुळे रु.3,71,235/- एवढा खर्च आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम आयकर रु.8981/-

अधिक विक्रीकर रु.16330/-

एकूण रु.25,311/-

आक्षेपाधीन रक्कम रु.3,71,235/-

FDSANMM7201 (Ref No : 21, Hmm No : 32)

## *9 प्रमाणके लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नसल्याबाबत व प्रमाणकांमधील उणीवांबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 02**

*शिक्षण मंडळ निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

आक्षेपाधीन रक्कम रु. 2952673.00/-

| ***शालेय पोषण आहार योजना या लेखाशीर्षाखाली निवड महिना सप्टेंबर-2012 मधील खर्चाच्या प्रमाणकांचे*** |
|---|

***रेखांकन करतांना एकूण रु. 2952673 रकमेची 5 प्रमाणके मागणी करूनही लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नाहीत. प्रमाणकांसोबत मुख्याध्यापकांनी सादर केलेली देयके / उपप्रमाणके जोडण्यात आलेली नाहीत. प्रमाणकांना क्रमांक देण्यात आलेला नाही.***

शालेय पोषण आहार योजना राज्यामध्ये 1995-96 पासून कार्यान्वित करण्यात आली. सदर योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना वर्षातून किमान 200 दिवस 300 कॅलरीज व 8 ते 12 ग्रम प्रोटीनयुक्त दुपारचे भोजन द्यावयाचे आहे.उल्हासनगर शिक्षण मंडळास 2012-13 मध्ये शालेय पोषण आहार योजनेसाठी शासनाकडून एकूण रु.1,38,16,007 .00 इतके अनुदान प्राप्त झाले व रु.1,95,26,993.35 इतके अनुदान खर्ची पडले आहे

1) शिक्षण मंडळाकडील शालेय पोषण आहार योजना या लेखाशीर्षाखाली रोखवहीमधील निवड महिना सप्टेंबर-2012 व मार्च-2013 मधील नोंदीप्रमाणे खर्चाच्या प्रमाणकांचे रेखांकन करतांना खालील 5 प्रमाणके उपलब्ध झाली नाहीत.

| अ. क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | धनादेश क्र. | तपशील | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | - | 21/9/2012 | 010931 | Cooking charges | 9528 |
| 2 | - | --,,-- | 010959 | --,,-- | 746410 |
| 3 | - | --,,-- | 010960 | --,,-- | 1268904 |
| 4 | - | --,,-- | 063665 | --,,-- | 259113 |
| 5 | - | --,,-- | 063666 | --,,-- | 668718 |
| | | | | एकूण | 2952673 |

उपरोक्त प्रमाणके उपलब्ध करण्याबाबत अर्धसमासपत्र क्र.6 दि.13/05/2015 अन्वये शिक्षण् मंडळास कळविण्यात आले होते. परंतू याबाबत शिक्षण मंडळाकडून काहीही खुलासा करण्यात आला नाही. वेळोवेळी मागणी करुनही महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियमातील कलम 6 अन्वये लेखा परिक्षकांनी मागणी केलेले अभिलेखे सदर अधिनियमातील कलम 4 नुसार लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी स्थानिक प्राधिकरणाची असतांनाही उपरोक्त प्रमाणके रेखांकनास उपलब्ध झाली नसल्याने रोखवहीत दर्शविलेल्या खर्चाची खात्री करता आली नाही. त्यामुळे सदर रक्कम रु.2952673/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

2)निवड महिना माहे सप्टेंबर-2012 व मार्च-2013 ची प्रमाणके तपासली असता प्रमाणकांसोबत मुख्याध्यापकांनी सादर केलेली देयके/उपप्रमाणके जोडण्यात आली नाहीत. त्यामुळे प्रदान केलेली रक्कम उपस्थित विद्यार्थ्यांनुसार योग्य असल्याबाबत खात्री लेखापरीक्षणात करता आली नाही.

3)मुंबई शिक्षण मंडळ लेखा संहीता 1953 नियम 7(7) नुसार प्रमाणकांना क्रमांक देवून प्रमाणके नस्तीमध्ये अनुक्रमाने लावणे आवश्यक होते. तथापि नियमाप्रमाणे प्रमाणकाना क्रमांक देण्यात आलेला नाही.

आक्षेपाधिन रक्कम रु.2952673/-

## *10 दि.1/11/2005 नंतर नियुक्त कर्मचाऱ्यांना अंशदान निवृत्ती वेतन योजनेऐवजी भविष्य निर्वाह निधी योजनेचा लाभ देण्यात येत असल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 01**

*शिक्षण मंडळ निधी*
*अनियमितता कलम : 9अ*

***शासन निर्णय वित्त विभाग क्र.अनियो-1005/126/सेवा-4 दि.31ऑक्टोबर-2005 अन्वये दि.1 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी नविन "परिभाषित अंशदान निवृत्ती योजना" लागू करण्यात आली असून सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम योजनेच्या तरतूदी दि.1/11/2005 किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना लागू होणार नाहीत. तथापि, उल्हासनगर मनपा शिक्षण मंडळाने दि.1/11/2005 नंतर नियुक्त् कर्मचाऱ्यांच्या वेतनातून भविष्य निर्वाह निधी योजनेंतर्गत वर्गणी वसुल करुन त्यांना नियमबाहयपणे सदर योजनेचा लाभ दिला आहे.***

शासन निर्णय वित्त विभाग क्र.अनियो-1005/126/सेवा-4 दि.31ऑक्टोबर-2005 अन्वये शासन सेवेत 1 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी, सध्या अस्तित्वात असलेल्या निवृत्ती वेतन योजनेएवजी, केंद्र शासनाच्या धर्तीवर, नविन "परिभाषित अंशदान निवृत्ती योजना" लागू करण्यात आली असून सदर कर्मचाऱ्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन) नियम,1982 व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम 1984 आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना यांच्या तरतूदी लागू होणार नाहीत असे शासनाचे आदेश आहेत. तथापि, उल्हासनगर मनपा शिक्षण मंडळाचे 2012-13 या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षण करतांना भविष्य निर्वाह निधी लेख्यांची पडताळणी करता शिक्षण मंडळाने दि.31/10/2005 नंतर नियुक्त झालेल्या खाली नमूद केलेल्या कर्मचाऱ्यांना अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू न करता सदर कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधीचे लेखे उघडण्यात आले असून कर्मचाऱ्याच्या वेतनातून दरमहा भविष्य निर्वाह निधीची वर्गणी वसुल करुन सदर कर्मचाऱ्यांना नियमबाहयपणे सदर योजनेचा लाभ दिला आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | पदनाम | नियुक्तीचा दिनांक | भ.नि.नि.खाते क्र. |
|---|---|---|---|---|
| 1 | सौ.पल्लवी अभिषेक एडके | उ.शि. | 15/06/2006 | 700 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2 | श्रीम.दिपमाला नामदेव केदार | उ.शि. | 3/3/2006 | 699 |
| 3 | सौ.विद्या प्रकाश महाजन | उ.शि. | 5/6/2006 | 709 |
| 4 | सौ.जयश्री योगेश नेमाडे | उ.शि. | 1/6/2006 | 703 |
| 5 | श्री.पंकज मनोहर भंगाळे | उ.शि. | 1/6/2006 | 704 |
| 6 | श्रीम.लिना कोलते | उ.शि. | 28/12/2007 | 712 |
| 7 | श्रीम.सरिता विनोद सुर्यवंशी | उ.शि. | 1/6/2006 | 715 |
| 8 | श्रीम.रुपाली मिनेश कोले | उ.शि. | 8/6/2006 | 717 |
| 9 | श्री.पंकज नारायण पवार | उ.शि. | 1/6/2006 | 721 |
| 10 | श्रीम.निलम चंद्रकांत कदम | लिपिक | 28/10/2009 | 711 |
| 11 | श्री.शंकर रुद्र खरेल | शिपाई | 22/2/2010 | 710 |
| 12 | श्री.हेमंत शेजवल | लिपीक | 14/7/2007 | 694 |
| 13 | श्री.विजय शेळके | उ.शि | 6/11/2009 | -- |
| 14 | श्रीम.गौरी नेहते | उ.शि. | 7/11/2009 | 766 |

उपरोक्त बाबत अर्धसमास पत्र क्र.14 दि.25/5/2015 अन्वये शिक्षण मंडळास खुलासा करण्याबाबत कळविण्यात आले असता शिक्षण मंडळाकडील पत्र दि.4/6/2015 अन्वये लेखा परिक्षणास खुलासा प्राप्त झाला असून उपरोक्त कर्मचाऱ्यांची नियुक्ती दि.31/10/2005 नंतर झाल्यामुळे व नगरपालिकेकडून आदेश प्राप्त झाले नसल्याकारणाने त्यांचे अंशदान निवृत्ती वेतन योजनेचे खाते उघडण्यात आले नाही. मनपाकडून आदेश प्राप्त झाल्यानंतर सदरची कार्यवाही शासन नियमाप्रमाणे करण्यात येईल. असे खुलाश्यात नमूद केले आहे. सदर खुलासा संयुक्तिक नसल्याने खुलासा मान्य करता येत नाही. तरी उपरोक्त शासन तरतूदीनुसार सदर कर्मचाऱ्यांबाबत उचित कार्यवाही करुन आक्षेपाची पुर्तता दर्शविण्यात यावी.

FDSANMM7201 (Ref No : 22, Hmm No : 32)

## *11 31 मार्च अखेरच्या शिल्लक रकमेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 01**

*प्राथमिक शिक्षण निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***31 मार्च अखेरची शिल्लक दि.1 एप्रील रोजी संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई यांना तारेने कळविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.***

ज्या संस्था / मंडळे यांचे लेखा परिक्षण स्थानिक निधी लेखा परिक्षा विभागाकडे आहे. त्या स्थानिक स्वराज्य संस्था / मंडळांनी वित्तीय वर्ष संपल्यानंतर 31 मार्च अखेरची शिल्लक दि.1एप्रील रोजी संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई यांना तारेने कळविणे आवश्यक आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्र.08 दि.16/05/2015 अन्वये विचारणा केली असता असे निदर्शनास आले की उल्हासनगर महानगरपलिका शिक्षण मंडळ, उल्हासनगर यांनी 2012-13 या आर्थिक वर्षात अशी कार्यवाही केलेली नाही.

DATRKJM5901 (Ref No : 8, Hmm No : 08)

## *12 भविष्य निर्वाह निधीची बँक खाती व विनावापर गुंतून राहिलेल्या शिल्लक रकमेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 02**

*प्राथमिक शिक्षण निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

वसूलपात्र रक्कम रु. 3791.00/-

***भविष्य निर्वाह निधीची एसबीआय बँक व आयडीबीआय बँक अशा दोन बँकेत बचत खाती असून आयडीबीआय बँकेच्या खात्यामध्ये मार्च-2012 अखेर रु.39,907/- एवढी रक्कम शिल्लक असून सदर बँक खात्यामध्ये 2012-13 या वित्तीय वर्षात कोणताही आर्थिक व्यवहार झालेला नसल्याने सदर शिल्लक रक्कम विनावापर व विनागुंतवणूक पडून राहीली आहे. तसेच सदर रक्कम भ.नि.निधीच्या गुंतवलेल्या रकमांप्रमाणे मुदत ठेवीत गुंतविण्यात आली नसल्यामुळे सदर रकमेवरील एप्रिल-2012 ते मार्च-2013 या कालावधीच्या व्याजाचे नुकसान झाले आहे.***

उल्हासनगर मनपा भविष्य निर्वाह निधीच्या बँक खात्यांची पडताळणी करता आढळून आलेल्या त्रुटींचा खुलासा करण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.13 दि.25/05/2015 अन्वये कळविण्यात आले असता शिक्षण मंडळाच्या पत्र क्र.निरंक दि.निरंक अन्वये खुलासा सादर केला आहे. सदर खुलासा पडताळणी करता खुलासा आक्षेपाशी सुसंगत नाही. शिल्लक रक्कम विनावापर व गुंतवणूक न करता बँक खात्यात पडून राहिल्याबाबत

काहीही खुलासा करण्यात आलेला नाही. त्यामुळे सदर खुलासा मान्य करता येत नाही. त्यानुसार खालील प्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) उल्हासनगर मनपा शिक्षण मंडळाच्या भविष्य निर्वाह निधीचे आयडीबीआय बँक व स्टेट बँक ऑफ इंडीया अशा दोन बँकेत खाते उघडण्यात आले आहे. एकाच निधीचे दोन वेगवेगळया बँकेत खाते उघडण्यात आले आहे. त्याचे प्रयोजन स्पष्ट झाले नाही.

2) आयडीबीआय बँकेतील बचत खाते क्र.0221104000089292 मध्ये दि.31/3/2012 अखेर रु.39,907/- एवढी रक्कम शिल्लक आहे. सदर बँक खात्यामध्ये दि.31/3/2012 पासून लेखापरिक्षणाच्या दिनांकापर्यन्त कोणताही व्यवहार करण्यात आलेला नाही. त्यामुळे रु.39,907/- एवढी रक्कम विना वापर व विना गुंतवणूक पडून आहे. शिक्षण मंडळाकडून केलेल्या गुंतवणूकी सोबत सदर शिल्लक रक्कम मुदत ठेवीने न गुंतविल्याने द.सा.द.शे.9.5 टक्के दराने सदर रकमेवर शिक्षण मंडळास वर्ष 2012-13 अखेर रु.3791/- एवढे व्याजाचे नुकसान झाले आहे. त्यामुळे सदर रक्कम रु.3791/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

वसुलपात्र रक्कम रु.3791/-

FDSANMM7201 (Ref No : 15, Hmm No : 13)

# कलम ९ ब खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे अथवा गैरवर्तणुकीमुळे जी कोणतीही तुट अथवा जे कोणतेही नुकसान झाले आहे अशा तुटीची किंवा नुकसानीची रक्कम तसेच कंत्राट देण्यात झालेल्या अनियमितता, निर्णयामुळे झालेली महसूल हानी आणि धोरणात्मक निर्णयामुळे झालेले आर्थिक नुकसान

## *13 मनपा शाळांमध्ये सुरक्षा रक्षक व शिपाई पुरवठा करण्याच्या कामामधील अनियमिततांबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 12**

*प्राथमिक शिक्षण निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 4700000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 690121.00/-

***मुंबई प्राथमिक शिक्षण नियम 1949 नियम 55 ते 59 मधील तरतूदीनुसार तसेच उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भांखसं 1093/(2635)/उद्योग-6 दि.16 जुलै,1996 नुसार निविदा न मागविता दरपत्रके मागवून पुरवठादाराची नियुक्ती केली आहे. महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.एसजीए-1506/प्र.क्र.92/काम-15 दि.8 नोव्हेंबर-2006 अन्वये शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाकडूनच सुरक्षा अधिकारी/सुरक्षा रक्षक यांची मागणी न करता खाजगी अभिकरणाकडून सुरक्षा रक्षक यांची मागणी करण्यात आली आहे. सुरक्षा रक्षक व शिपाई यांची हजेरीपत्रक प्राप्त करण्यात आलेली नाहीत.***

उल्हासनगर मनपा शिक्षण मंडळाच्या कार्यक्षेत्रातील मनपा शाळांमध्ये 40 सुरक्षा रक्षक व 11 शिपाई कंत्राटी पध्दतीने पुरविण्यासाठी शिक्षण मंडळ ठराव क्र.65 दि.8/06/2010 अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार जुलै,2010 मध्ये दरपत्रक मागवून लघुत्तम दरपत्रक धारक मे.सेक्युरा कंपनी, खेर सेक्शन, अंबरनाथ या पुरवठादारास प्रति सुरक्षारक्षक / शिपाई रु.8000/- दरमहा या दराने प्रतिवर्ष 10टक्के वाढीने कार्यादेश क्र.मनपा शिमंड /शिक्षण/ 445/ 10 दि. 8/7/2010 अन्वये पुढील 3वर्षासाठी कामाचे आदेश देण्यात आले आहेत. सदर बाबीसाठी पुरवठादारास करावयाच्या प्रदानाचा खर्च " शाळांसाठी शिपाई व पहारेकरी पुरविणे" या लेखाशीर्षाखाली करण्यात आला आहे. मे.सेक्युरा कंपनी या पुरवठादार संस्थेस मार्च 2011 ते जाने 2012 या कालावधीच्या एकूण रु.50,55,721/- एवढया रकमेपैकी वर्ष 2012-13 मध्ये प्रमाणक क्र.314 दि.9/10/2012 अन्वये रु.15,00,000/- प्रमाणक क्र.360 दि.30/11/2012 अन्वये रु.18,00,000/- व प्रमाणक क्र.379 दि.24/12/2012 अन्वये 14,00,000/- असे एकूण रु.47,00,000/- एवढे प्रदान करण्यात आले आहे. याबाबत विभागाकडून उपलब्ध करण्यात आलेली नस्ती व खर्चाची प्रमाणके यांची पडताळणी करता आढळून आलेल्या त्रुटींचा खुलासा करण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.18 दि.26/05/2015 अन्वये शिक्षण मंडळास कळविण्यात आले असता शिक्षण मंडळाच्या पत्र क्र. निरंक दि.4/06/2015 अन्वये

खुलासा सादर करण्यात आला आहे. प्राप्त खुलासा पडताळणी करुन खालीलप्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) विषयांकीत नस्तीची तपासणी करता मुख्याध्यापकांनी वारंवार मागणी केल्यामुळे मनपा शिक्षण मंडळाने ठराव क्र.65 दि.8/6//2010 अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार कंत्राटी पध्दतीने वॉचमन व शिपाई पुरविण्यासाठी दरपत्रक मागविण्यात आल्याचे नस्तीतील टिपणीत नमूद करण्यात आले आहे. तथापि, मुख्याध्यापकांची मागणीपत्रे नस्तीत आढळून आली नाहीत. तसेच 40 सुरक्षारक्षक व 11 शिपाई यांची शाळानिहाय विगतवारी उपलब्ध झाली नाही. मुख्याध्यापकांकडून सुरक्षा रक्षक व शिपाई उपलब्ध करुन देण्याबाबत शाळानिहाय मागणी घेवून त्यानुसार सुरक्षा रक्षक व शिपायांची गरज निश्चित न करता शिक्षण मंडळाकडून पुरवठादारास कार्यादेश दिलेले आहेत. त्यामुळे प्रत्यक्षात उपलब्ध केलेले सुरक्षा रक्षक व शिपाई आवश्यकतेनुसार असल्याची खात्री करता आली नाही.

2) मुंबई प्राथमिक शिक्षण नियम 1949 नियम 55 ते 59 मध्ये नमूद केल्यानुसार शिक्षण मंडळाने जाहिर निविदा मागवून पुरवठादाराची नियुक्ती करणे आवश्यक आहे. तसेच उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भांखसं 1093/(2635)/उद्योग-6 दि.16 जुलै,1996 रु.50,000/- किंवा त्यापेक्षा अधिक खर्च असेल अशावेळी राजपत्रात निविदा चौकशी प्रसिध्द करुन निविदा मागविणे बंधनकारक आहे. निविदेची जाहिरात वृत्तपत्रात देणेही आवश्यक आहे. प्रस्तूत कामासाठी 40 सुरक्षा रक्षक व 11 शिपाई यांच्या पुरवठयासाठी रु.8,000/- प्रतिमहा याप्रमाणे एका वर्षासाठी रु.48,96,000/- एवढा खर्च अपेक्षित असल्याने जाहिर निविदा मागवून पुरवठादाराची नियुक्ती करणे आवश्यक असतांना दरपत्रक मागवून पुरवठादाराची नियुक्ती करण्यात आली आहे. यावरुन निविदा प्रक्रीया टाळण्याच्या हेतूने सदर कार्यवाही करण्यात आल्याचे दिसून येते.

3) सुरक्षा रक्षक व शिपाई यांचा प्रतिमहा रु.8,000/- एवढा दर कशा आधारे निश्चत करण्यात आला आहे. याची उपलब्ध अभिलेख्यावरुन खात्री करता आली नाही.

4) खर्चाच्या प्रमाणकांची तपासणी करता पुरवठादाराकडून प्राप्त झालेली मुळ प्रमाणके (Tax Invoice) देयकासोबत उपलब्ध नसून देयकाच्या छायांकित प्रतीवर पुरवठादारास प्रदान करण्यात आले आहे. तसेच प्रमाणकांवर प्रदानास सक्षम प्राधिकाऱ्याचा प्रदान आदेश नोंदविण्यात आलेला नाही.

5) कार्यादेशातील अट क्र.11 मध्ये सुरक्षा रक्षक व शिपाई हे कर्मचारी मुख्याध्यापकांच्या अधिनस्त कार्यरत असल्याने मुख्याध्यापकांनी दिलेल्या हजर रिपोर्टनुसार सदर कर्मचाऱ्यांचे देयक संस्थेस अदा करण्यात येईल असे नमूद केले आहे. तथापि, संबंधित कर्मचाऱ्याच्या उपस्थितीबाबत मुख्याध्यापकांकडून हजेरी रिपोर्ट प्राप्त करण्यात आल्याचे उपलब्ध अभिलेख्यांवरुन आढळून आले नाही. यावरुन कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीची पडताळणी न करता पुरवठादारास प्रमाणक क्र.314 दि.9/10/2012 अन्वये रु.15,00,000/- प्रमाणक क्र.360 दि.30/11/2012 अन्वये रु.18,00,000/- व प्रमाणक क्र.379 दि.24/12/2012 अन्वये 14,00,000/- असे एकूण रु.47,00,000/- एवढे प्रदान करण्यात आले आहे.

6) मुंबई शाळा मंडळ लेखा संहिता 1953 मधील नियम 7(2) नुसार पुरवठादारास देयकाचे प्रदान

करण्यापूर्वी शिक्षण मंडळ अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर सदस्यांची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रमाणक क्र.314 दि.9/10/2012 अन्वये रु.15,00,000/- प्रमाणक क्र.360 दि.30/11/2012 अन्वये रु.18,00,000/- व प्रमाणक क्र.379 दि.24/12/2012 अन्वये 14,00,000/- असे एकूण रु.47,00,000/- एवढया खर्चाच्या प्रदानास शिक्षण मंडळाच्या मान्यतेचा ठराव उपलब्ध झाला नाही. त्यामुळे उपरोक्त तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

7) मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ च्या कलम ६३ नुसार पुरवठादाराशी विहीत रकमेच्या मुद्रांक पेपर करारनामा करणे आवश्यक आहे. परंतू मे.सेक्युरा कंपनी या पुरवठादार संस्थेसोबत केलेला करारनामा लेखा परिक्षणास उपलब्ध करण्यात आला नाही. त्यामुळे रक्कम रु .4200/- च्या मुद्रांक शुल्का वर करारनामा करण्यात आल्याबाबत लेखा परिक्षणात खात्री करता आली नाही . तरी वरीलप्रमाणे खर्चाची रक्कम रु .50,55,721/- विचारात घेवून मुद्रांक शुल्काची रक्कम रु.4200/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

8) माहे जानेवारी 2012 मध्ये सुरक्षा रक्षक व शिपाई पुरविण्यासाठी रु.2,40,467/- एवढी रक्कम पुरवठादारास प्रदान केलेल्या रकमेत समाविष्ट आहे. परंतू माहे जानेवारी 2012 चे पुरवठादाराकडून प्राप्त झालेले देयक (Tax Invoice) उपरोक्त प्रमाणकांसोबत आढळून आले नाही. पुरवठादाराकडून देयक प्राप्त झालेले नसतांना रु.2,40,467/- एवढी रक्कम उपरोक्त प्रदानात कशा आधारे समाविष्ट करण्यात आली. याबाबत विभागाने सादर केलेल्या खुलाश्यामध्ये सदर रक्कम प्रशासन अधिकारी, सभापती, सदस्यांच्या आदेशान्वये समाविष्ट करण्यात आल्याचे कळविण्यात आले आहे. परंतू पुरवठादाराकडील देयकाशिवाय (Tax Invoice) केलेले प्रदान लेखा परिक्षणास मान्य करता येत नसल्याने सदर रक्कम रु.2,40,467/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

9) पुरवठादारास सदर देयकामध्ये 10.3 टक्के प्रमाणे एकूण रु.4,49,654/- एवढा सेवा आकार (Service Tax) चे प्रदान करण्यात आले आहे. पुरवठादाराने सदर सर्व्हिस टॅक्सची रक्कम शासनाकडे भरणा केल्याबाबत लेखा परिक्षणास साधार पुर्तता दर्शविण्यात आली नसल्याने सदर रक्कम रु.4,49,654/- आक्षेपाधिन दर्शविण्यात येत आहे.

10) मार्च 2011 ते जानेवारी 2012 या कालावधीच्या देयकांचे प्रदान 2011-12 च्या मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतून न करता वर्ष 2012-13 च्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून करण्यात आले आहे. सदर खर्चाच्या प्रदानासाठी वर्ष 2012-13 च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात तरतूद समाविष्ट करण्यात आल्याचे आढळून आले नाही. याबाबत विभागाने सादर केलेल्या खुलाश्यामध्ये वर्ष 2011-12 मध्ये मनपा कडून अनुदान प्राप्त झाले नसल्याने सदर रक्कम 2012-13 च्या मंजूर तरतूदीतून करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. सदर खर्चासाठी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर करण्यात आली नसतांना सदर बाबीवर खर्च करण्यात आला आहे. सदर बाब मुंबई शाळा मंडळ नियम 1959 मधील नियम 156 मधील तरतूदीशी विसंगत आहे.

11) महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.एसजीए-1506/प्र.क्र.92/काम-15 दि.8 नोव्हेंबर-2006 अन्वये खाजगी अभिकरणाकडून सुरक्षा अधिकारी/सुरक्षा रक्षक यांची मागणी न करता शासनाने

स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाकडूनच सुरक्षा अधिकारी/सुरक्षा रक्षक यांची मागणी करावी व त्यातूनच आपल्या आस्थापनांमध्ये सुरक्षा रक्षकांची नेमणुक करावी असे स्पष्ट आदेश असतांना सदर शासन आदेश दुर्लक्षित करुन शिक्षण मंडळाने दरपत्रक मागवून नियमबाहय पध्दतीने खाजगी अभिकरणामार्फत 40 सुरक्षा रक्षकांची नेमणूक केली आहे.

12) उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छद 2 नुसार ज्या संस्था/कार्यालये यापुढे शासनाच्या सुरक्षा रक्षक मंडळाकडून सुरक्षा रक्षक घेणार नाहीत. त्या संस्थांमधील संबंधित जबाबदार अधिकारी हा दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहील अशी तरतूद आहे. उपरोक्त परिस्थितीतही मनपा शिक्षण मंडळ ठराव क्र.74 दि.23/7/2010 अन्वये मे.सेक्युरा कंपनी,खेर सेक्शन,अंबरनाथ या खाजगी संस्थेस आगामी 3 वर्षाचे (2010-11, 2011-12 व 2012-13) सुरक्षा रक्षक पुरविण्याचे काम देण्यात आले आहे. त्यामुळे उपरोक्त आक्षेपांच्या पुर्तते अभावी सदर बाबींवर शिक्षण मंडळाने उपरोक्त प्रमाणकांन्वये केलेला खर्च रु.47,00,000/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

आक्षेपाधिन खर्च रु.47,00,000/-

वसुलपात्र रक्कम आक्षेप क्र.08 प्रमाणे रु.2,40,467/-

अधिक आक्षेप क्र.08 प्रमाणे रु.4,49,654/-

एकूण वसुलपात्र रु.6,90,121/-

FDSANMM7201 (Ref No : 16, Hmm No : 18)

## *14 मनपा शाळांमधील विदयार्थ्यांना मोफत गणवेश वाटपावरील खर्चातील अनियमितता*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 08**

*प्राथ शिक्षण निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 3000000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 60100.00/-

***मनपा शाळांमधील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटपासाठी दि.25/03/2013 या एकाच दिवशी दोन प्रमाणकाद्वारे रु.30 लाख खर्च दर्शविलेला असून असून विक्री कर रु.60,000/- कपात केलेला नाही. मुद्रांक शुल्काची रु.100/- वसुली आवश्यक असून निविदा प्रक्रिया महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-1088/2512/उदयोग-6 दिनांक 02/01/1992 प्रमाणे राबविण्यात आलेली नसून एकाच कुटूंबातील सदस्यांनी निविदा सादर केल्याने स्पर्धात्मक दर प्राप्त झालेला नाही. त्यामुळे वित्तीय औचित्याचा भंग झाला आहे. बयाणा रक्कम रु.50,000/- व जमानत ठेव रु.2,50,000/- अशी एकूण रक्कम रु.3,00,000/-***

***लेख्याबाहेर राहिलेली आहे.***

प्रमाणक क्र. 477 दिनांक 25/3/2013 रक्कम रु.15,00,000
प्रमाणक क्र. 484 दिनांक 25/3/2013 रक्कम रु.15,00,000
एकूण रु.30,00,000/-
टिप्पणीप्रमाणे बिलाची रक्कम एकूण रु.55,36,240 दिसते.
प्रशासकीय व तांत्रिक मान्यता उपलब्ध झाली नाही.
अंदाजपत्रकीय रक्कम रु. 50,00,000/-
इसारा / बयाणा रु. 50,000/- निविदा मूल्य रु. 500/-
निविदा प्रसिध्दी व विक्री कालावधी - वृत्तपत्र अनुपलब्ध दि. 27/10/2012 ते 29/10/2012
प्राप्त निविदा संख्या - तीन
1. सेक्युरा कंपनी, - पूजा पार्क, प्लॉट न. 568, खेर सेक्शन अंबरनाथ पूर्व.
2. श्री गणेश ऑफसेट प्रिंटर्स- दुर्गा देवी पाडा, अंबरनाथ पूर्व.
3. युधी एन्टरप्रायजेस- पूजा पार्क, प्लॉट न. 568, खेर सेक्शन अंबरनाथ पूर्व
पुरवठादाराचे नांव :- मेसर्स सेक्युरा कंपनी, अंबरनाथ
निविदा दर मंजूरी - उल्हासनगर मनपा शिक्षण मंडळ, ठराव क्र. 134 दि.1711/2012
कार्यादेश - जा.क्र.मनपाशिमं/शिक्षण/725/12 दि. 27/11/2012, गणवेश पुरवठा दिनांक 17/1/2013
साठा नोंदवही - उपलब्ध झाली नाही.

उपरोक्त प्रमाणकांद्वारे मे.सेक्युरा कंपनी अंबरनाथ (पूर्व) या पुरवठादारास रु. 30.00 लक्षचे प्रदान केलेले आहे. बिलावर नमूद केल्याप्रमाणे एकूण बिल रु. 55,36,240/- चे असून त्यापैकी रक्कम रुपये 30,00,000/- 2012-13 मध्ये अदा केली आहे. उर्वरित रक्कम रु.25,36,240/- चे प्रदान पुढील 2013-14 या वित्तीय वर्षात कोणत्या दिनांकास व प्रमाणकाद्वारे केले वाढीव रक्कम रु.5,36,240/- मंजूरीला कोणत्या प्राधिकाऱ्याची मान्यता घेतली याबाबत खुलासा मागविला होता. परंतु त्यास प्रतिसाद मिळाला नाही.

लेखापरीक्षणासाठी सादर केलेल्या अभिलेख्याची छाननी करतांना आढळलेल्या त्रुटी / उणीवांबाबत अर्धसमास ज्ञापन क्र. 21 दिनांक 27/5/2015 अन्वये अभिलेख / माहिती मागविलेली होती. परंतु विहीत वेळेत अभिलेख / माहिती सादर न केल्याने खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-1088/2512/उदयोग-6 दिनांक 2/1/1992 मधील परिच्छेद 10.6 नुसार शासनाने 241 वस्तू लघु उदयोगाकडून खरेदी करण्यासाठी आरक्षित ठेवल्या असून त्याबाबतची यादी सदर शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट अकरामध्ये दर्शविलेली आहे. त्यामध्ये अ.क्र. 161 वर रेडिमेड गार्मेंटस ही बाब समाविष्ट असल्याने गणवेश खरेदी लघु उदयोगाकडून करणे अपेक्षित असताना त्याबाबत पत्रव्यवहार न करता किंवा ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त न करताच शिक्षण मंडळाने निविदा मागवून खरेदी केलेली आहे.

2. महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांखस-1088/2512/उदयोग-6 दिनांक02/01/1992 मधील परि.8.3(अ) नुसार निविदा भरण्यासाठी निविदाकाराला किमान तीन आठवडयाचा कालावधी देणे आवश्यक असताना तो फक्त तीन दिवस (दिनांक 27/1/2012 ते 29/10/2012) दिल्याचे अभिलेख्यावरुन दिसते.

उदयोग, उर्जा व कामगार विभाग शा.नि.क्र. भांखस-1093/2635/उदयोग-6 दि. 18/7/1993 परि 1.3 प्रमाणे एका बाबीची वार्षिक खरेदी रु. 50,000/- पेक्षा अधिक असेल अशावेळी राजपत्रात निविदा चौकशी प्रसिध्द करुन स्थानिक व राज्यपातळीवरील वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणे आवश्यक होते. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे शिक्षण मंडळास स्पर्धात्मक दराचा लाभ झाला नाही . लेखापरीक्षणात वृत्तपत्र उपलब्ध न झाल्याने निविदा प्रसिध्दीबाबत खात्री करता आली नाही.

निविदा धारकांच्या तांत्रिक लिफाफ्यामधील मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1948 खालील नमुना ड मधील संस्थेच्या नोंदणी प्रमाणपत्राची छाननी केली असता निविदाकारांच्या धंदयाचे स्वरुप गणवेश विक्रेता असणे आवश्यक असतांना अ .क्र.2 व 3 वरील पुरवठादारांचे धंदयाचे स्वरुप भिन्न /विसंगत आहे. तपशिल खालीलप्रमाणे

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | धंदयाचे स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | मे. सेक्युरा कंपनी अंबरनाथ (पूर्व) | स्कूल् बॅग, स्टेशनरी, गणवेश, रेनकोट विक्रेता | प्रोप्रायटर युवराज पुरुषोत्तम उगले |
| 2 | श्री गणेश ऑफसेट प्रिंटर्स, अंबरनाथ (पूर्व) | छपाई | प्रोप्रायटर पुरुषोत्तम एकनाथ उगले |
| 3 | मे युधी एन्टरप्रायजेस, अंबरनाथ (पूर्व) | ट्रेडिंग (व्यापार) | प्रोप्रायटर वीणा पुरुषोत्तम उगले |

स्पर्धात्मक दरामध्ये जास्तीत जास्त चांगल्या वस्तू उपलब्ध व्हाव्यात यासाठी ख-याखु-या निविदाकारांना जास्तीत जास्त संख्येने निविदांमध्ये सहभागी होण्याची संधी देणे आवश्यक आहे. त्यासाठी स्थानिक, राज्य व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमानपत्रात जाहिरात देउन निविदा मागविण्यासाठी शासनाने विविध शासन निर्णयांद्वारे वेळोवेळी सूचित केलेले आहे.

तथापि, वरील निविदाकारांची नांवे व पत्यांचे अवलोकन केले असता तिन्ही निविदाकार एकाच कुटूंबातील असून विविध संस्थांच्या नावाने त्यांनी निविदा सादर केलेल्या आहेत. त्यामुळे शिक्षण मंडळास स्पर्धात्मक दर प्राप्त झालेला नाही. तसेच मुंबई वित्तीय नियम 1959 नियम 58 मधील वित्तीय औचित्यांचे तत्वांपैकी सर्वसामान्य समंजस व्यक्ती स्वत :चा पैसा खर्च करतांना जी काळजी घेते व जितकी जागरुकता बाळगते तितकीच काळजी व जागरुकता शासकीय रक्कम खर्च करतांना प्रत्येक अधिकाऱ्याने बाळगणे अनिवार्य आहे. या तत्वाचे पालन झालेले नाही.

3. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग परिपत्रक क्र.विकअ/1998प्रक्र43/कराधान-1 दिनांक 5 मे 1999, कार्यकंत्राट कायदयाचे कलम 6(ब) (1) तसेच मुल्यवर्धित कर कायदा 2005 प्रमाणे पुरवठादाराच्या बिलातून 2 टक्के विक्रीकर कपात करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे विक्रीकर कपात न केल्याने शासन महसूलाचे रक्कम रु.60,000/- इतके नुकसान झालेले आहे. विक्रीकराची रक्कम रु.60,000/- संबंधिताकडून वसूल करून शासनखाती योग्य लेखाशीर्षाखाली भरणा करणे आवश्यक आहे.

4. मुंबई प्राथमिक शिक्षण नियम 1949 मधील नियम 51 (2) प्रमाणे जिल्हा शाळा मंडळाच्या वतीने केलेल्या प्रत्येक करारावर सभापती व मंडळाच्या इतर सदस्यांनी स्वाक्षरी करणे गरजेचे असून त्यावर मंडळाची सामाईक मोहोर लावून तो मोहोरबंद करणे आवश्यक आहे. परंतु नियमाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

5. सदरहू खरेदीसाठी प्रशासकिय मान्यता तसेच तांत्रिक मंजूरी घेतल्याबाबतचे आदेश निविदा नस्तीत उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे आवश्यक मंजूरीनंतरच खरेदी प्रक्रिया पार पाडल्याबाबत लेखापरीक्षणाची खात्री पटत नाही . तसेच निविदा स्विकारताना निविदाकारांच्या दरांची तुलना बाजारभावांच्या दरांशी केल्यापुष्टयर्थचा कोणताही अभिलेख / पत्रव्यवहार निविदा नस्तीमध्ये आढळला नाही.

6. साहित्य स्विकारलेल्या प्रमाणक / उपप्रमाणकावर पुरवठा आदेशानुसार साहित्य मिळाल्याचे, साहित्य सुस्थितीत व चांगल्या प्रतीचे असल्याबाबत तसेच सर्व साहित्याची नोंद साठा नोंदवहीत घेतल्याचे प्रमाणपत्र दिलेले नाही. पुरवठादराचे बील विरुप केलेले नाही. तसेच प्रमाणकातील आयकराची रु.33,000/- प्रमाणे दोन प्रमाणकाची रु .66,000/- कपात अनुषंगाने संबंधित कार्यालयाची पोच निविदा नस्तीत जोडलेली नाही.

7. शासन परिपत्रक, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक पीआरई/1089/(9209)/प्रशि दिनांक 15/2/1990 नुसार विदर्यांयाना गणवेश वाटप - 15 ऑगस्टपूर्वी होणे आवश्यक असताना प्रत्यक्षात गणवेश दिनांक 17/1/2013 रोजी शिक्षण मंडळास प्राप्त झालेले आहेत. शालेय वर्षाच्या सुरुवातीला गणवेश किंवा दप्तर, वहया, बूट, लेखन साहित्य वाटप करुन विदयार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी या उद्देशाने कोणतीही योजना राबविण्यात येते. परंतु 2012-13 या वित्तीय वर्षात शालेय वर्षाच्या अखेरीस गणवेशाची खरेदी करुन वाटप केल्याने ज्या उद्देशाने शासन ही योजना राबवित आहे. तो उद्‌देश सफल झाला नाही.

गणवेश प्राप्तीचे अनुषंगाने साठा नोंदवही तसेच वाटप नोंदवही, वाटपाअंती शिल्लक राहिलेल्या गणवेशांची संख्या यासारख्या बाबींची पडताळणी करण्यासाठी लेखा परीक्षणास अर्धसमास ज्ञापन क्र.21 दि.27/05/2015 अन्वये अभिलेख मागणी केली होती . परंतु अभिलेख उपलब्ध झाला नाही. त्यामुळे 5589 विद्‌यार्थ्यांचे व 5824 विद्‌यार्थीनींचे गणवेशाचे वाटप ज्या विदयार्थ्यांना करण्यात आले, त्या लाभार्थीच्या / पालकांच्या पोचपावती अभावी गणवेश वाटपाची सत्यता पडताळता आली नाही. आवश्यक अभिलेख सादर करुन खात्री पटविली नाही.

महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 मधील नियम 169 (5) प्रमाणे निविदेबरोबर मिळालेली इसाऱ्याची रक्कम रोकडवहीत जमा करण्यात येईल. ज्यांच्या निविदा स्विकारल्या नाहीत त्यांना ती परत करण्यात येईल. निविदा स्विकारण्यात आली तर इसारा रक्कम जमानत ठेवीचा भाग म्हणून घेण्यात येईल व ती ठेवीच्या नोंदवहीकडे बदली करणेत येईल.

तसेच नियम 169(4) नुसार कंत्राटदाराकडून घेण्यात येणारे तारण ठोक रकमेच्या किंवा कंत्राटदारास देय असलेल्या बिलामधून वजावटीच्या स्वरुपात असेल.

उपरोक्त खरेदी प्रक्रियेत बयाणा रक्कम रु. 50,000/- तसेच अनामत रक्कम रु. 250000/- रोख स्वरुपात न घेता धनाकर्ष स्वरुपात घेतले असून ते लेख्यात जमा न करता परस्पर दिनांक 8/7/2013 रोजी पुरवठादाराला परत केल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे शिक्षण मंडळास सदर रकमेच्या व्याजापासून वंचित रहावे लागले आहे. याबाबतचा प्राधिकार मागणी करुनही सादर केलेला नाही. तसेच दिनांक 25/03/2013 रोजी एकाच दिवशी क्र.477 व 484 अशा दोन प्रमाणकाद्वारे रु.30,00,000/- खर्ची घातल्याविषयीची कारणमीमांसाही सादर केलेली नाही.

उपरोलिखित अ.क्र.1 ते 8 बाबत समर्पक अनुपालन सादर केले नसल्याने रक्कम रु.30,00,000/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

वसूलपात्र रक्कम -

| | | |
|---|---|---|
| 1. | विक्रीकर रक्कम | रु. 60,000/- |
| 2. | मुद्रांक शुल्क | रु. 100/- |
| | एकूण | रु. 60,100/- |

DATRKJM5901 (Ref No : 27, Hmm No : 21)

## *15 महानगरपालिका शाळा दुरुस्तीवर शिक्षण मंडळाने केलेल्या खर्चाबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 10**

*म.न.पा.निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1562065.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 81300.00/-

***शिक्षण मंडळामार्फत महानगरपालिका शाळांवर खर्च करताना कामाचे तुकडे पाडून दरपत्रकान्वये खर्च केलेला***

***आहे. दुरुस्ती खर्चाच्या लेखापरीक्षणासाठी प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मंजूरीचे आदेश, मोजमाप पुस्तके, प्राथमिक अहवाल या सारखे आवश्यक अभिलेख सादर केलेले नाहीत. तसेच मक्तेदाराच्या प्रदानाच्या बिलामधून विक्रीकर कपात रक्कम रु.62,481/- शासकीय विमा निधीची रक्कम रु.15,619/- वसूल केलेली नाही. करारनामा न केल्याने मुद्रांकशुल्काची रक्कम रु.3200/- वसूलपात्र आहे.***

2012-2013 या वित्तीय वर्षात शिक्षण मंडळाने मनपा शाळांची दुरुस्तीची कामे दरपत्रके मागवून (प्रत्येक काम रु.50,000/- पेक्षा कमी रकमेत सिमीत) केलेली आहेत. खर्च प्रमाणकांच्या नस्तीमध्ये प्रमाणकासोबत दरपत्रक विषयक पत्रव्यवहार जोडलेला आहे.

सदर कामांवरील खर्चाच्या तपासणीसाठी अर्धसमास ज्ञापन क्र. 7 दि.13.05.2015 अन्वये सर्व कामाची यादी, प्रशासकीय व तांत्रिक मंजूरीचे आदेश, जिल्हा स्थानिक मंडळ अभियंत्याचा प्राथमिक अहवाल, दुरुस्तीबाबत संबंधित मुख्याध्यापकांचे अर्ज, मोजमाप पुस्तके, यासारख्या आवश्यक अभिलेखाची मागणी केलेली होती. परंतू, दि.04.06.2015 रोजी सादर केलेल्या उत्तरात दरपत्रकाच्या प्रती व्हाऊचर फाईलमध्ये उपलब्ध असून त्याची तपासणी करण्याविषयीच्या आशयाचे उत्तर देण्यात आले. व्हाऊचर फाईलमधील माहे एप्रिल 2012 या महिन्यातील 32 प्रमाणकांचे लेखापरीक्षण केले असून त्या कामांची यादी सोबतच्या परिशिष्ठ क्र.- 1 मध्ये नमूद केलेली आहे.लेखापरीक्षणात सदर कामांवर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. प्राधिकृत नगरपालिकेच्या क्षेत्रात प्राधिकृत नगरपालिका, त्यांनी चालविलेल्या शाळासाठी नवीन प्राथमिक शाळांच्या इमारती बांधणे व आपल्या विद्यमान प्राथमिक शाळेच्या इमारतीचा विस्तार करणे किंवा त्यात विशेष अथवा मामुली दुरुस्त्या करणे ही कामे करत असते. त्यानुसार उपरोक्त सर्व दुरुस्त्यांच्या कामास महानगरपालिकेने, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेतील नियम 132 प्रमाणे प्रशासकीय मान्यता व नियम 135 प्रमाणे तांत्रिक मान्यता देणे आवश्यक होते. परंतु दोन्ही मान्यता दिल्या नसल्याचे अभिलेखावरून दिसते. त्याबाबतचे अभिलेख लेखा परीक्षणास मागणी अंतीही सादर केलेला नाही.

2. उपरोक्त सर्व कामांची सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रचलित दरसूचीनुसार खर्चाची अंदाजपत्रके तयार करणे आवश्यक होते. शिक्षण मंडळाने कामाची दरपत्रके मागवितांना कामाची किंमत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसूचीनुसार ठरविलेली नाही. त्यामुळे कंत्राटदारास जादा प्रदान झाले असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

3. उपरोक्त कामाची दरपत्रके मागविण्याऐवजी शासन सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदाराकडून वर्गपात्रतेनुसार निविदा मागविणे आवश्यक होते. परंतु सर्व कामे मजूर सहकारी सोसायटयांना दरपत्रके मागवून व तीन पेक्षा जास्त प्रमाणात दिलेली आहे.

4. महाराष्ट्र व्हॅट अधिनियम 2002 मधील तरतूदीनुसार व्हॅट नोंदणी असलेल्या कंत्राटदाराकडून 2% व नोंदणी नसलेल्या कंत्राटदाराकडून 4% कार्यकंत्राट कराची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे. सदरहु

शाळा दुरूस्तीच्या कामांच्या अभिलेखामध्ये मक्तेदाराची विक्रीकर विभागाकडील नोंदणी प्रमाणपत्रे नसल्याने अनोंदणीकृत कंत्राटदाराचा 4% प्रमाणे विक्रीकर रक्कम रु.62,481/- वसूलपात्र आहे. सदर रक्कम संबंधिताकडून वसूल करून शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे.

5. शिक्षण मंडळाने दूरूस्तीच्या कामासाठी वित्तीय वर्षात रु.9633397 इतका खर्च केलेला आहे. सदर खर्च हा एकाच कामाचे अनेक भाग पाडून स्वतंत्रपणे केलेला आहे. कामाचे इमारतनिहाय एकच अंदाजपत्रक बनवून त्यास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेवून जाहीर निविदेद्वारे नोंदणीकृत कंत्राटदारामार्फत काम करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

6. झालेल्या कामांची मोजमाप पुस्तकात नोंदविलेली नोंद तपासणीसाठी तसेच सदरचा खर्च शाखा अभियंता यांनी साक्षांकित केला किंवा कसे हे तपासण्यासाठी मोजमाप पुस्तकाची मागणी केलेली होती परंतु मोजमापपुस्तके मागणी करूनही सादर केलेली नाहीत.

7. सदर कामे करताना सिमेंट व इतर साहित्य किती वापरले याच्या वापराचे विवरणपत्र बिलासोबत जोडलेले नाही. सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.जीआर.34/सा-4/5999 दिनांक08/01/2007 नुसार बांधकाम साहित्य वापरण्यापूर्वी साहित्याचे प्रयोगशाळा अहवाल घेणे आवश्यक आहे. परंतु कामावर वापरलेल्या साहित्याची शासकीय प्रयोगशाळेकडून तपासणी केल्याचे अहवाल घेतलेले नाहीत.

8. शासन निर्णय क्र.गौखनि-10/0206/प्र.क्र.57/ख. दि.15-12-2006 नुसार कामावर वापरलेल्या गौण खनिज स्वामित्वधनाची रक्कम शासन खाती भरणा केल्याची पावती देयकासमवेत जोडलेली नाही. कामावर वापरलेल्या स्वामित्वधनाची रक्कम निश्चित करुन संबंधित लेखाशिर्षाखाली भरणा करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

9. मुदांक शुल्क अधिनियम 1958 परिशिष्ठ ब तसेच महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता नियम 173 नुसार कंत्राटाच्या अटी शर्ती तसेच शास्ती दर्शविणारा करार मुद्रांकित कागदावर करणे आवश्यक असताना मुद्रांकित कागदावर कामांचे करारनामे केलेले नाहीत. त्यामुळे शासन महसुलाचे रक्कम रु.3200/- इतके नुकसान झाले असून सदर रक्कम वसूल करून शासन खाती योग्य लेखाशिर्षाखाली भरणा करणे आवश्यक आहे.

10. महाराष्ट्र विमा संचालनालय यांचे पत्र क्र. प्रविनि 2300/सहविमा/जि प 2 दि.07/01/2014 नुसार अंदाजपत्रकीय रकमेच्या 1 टक्के विमा (कामासाठी व कामगाराच्या सुरक्षेसाठी) शासकीय विमा निधीकडे उतरविणे आवश्यक असताना मक्तेदाराने कामाचा विमा शासकीय विमा निधीकडे विमा उतरविलेला नाही. त्यामुळे अंदाजपत्रकाच्या 1% प्रमाणे रक्कम रु.15619/- शासकीय विमा निधीकडे भरणा करणे आवश्यक आहे.

उपरोक्त आक्षेपांची पूर्तता करेपर्यंत रक्कम रु.15,62,065/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

वसुलपात्र रकमेचा तपशील

1) विक्रीकर कपात रु.62,481/-
2) शासकीय विमा निधी रु.15,619/-

3) मुद्रांक शुल्क रु.3,200/-
एकूण रु.81,300/-

DATRKJM5901 (Ref No : 30, Hmm No : 7)

## *16 सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी रकमेच्या अंतिम प्रदानात जादा प्रदान करण्यात आल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 03**

*शिक्षण मंडळ निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 331754.00/-

***सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यास भविष्य निर्वाह निधीच्या अंतिम प्रदानात देय रकमेपेक्षा जादा रक्कम व व्याजाचे प्रदान करण्यात आले आहे. भविष्य निर्वाह निधी नियम 26 व 29 नुसार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सेवानिवृत्तीपूर्व 3 महिने अगोदर त्याच्याकडून अग्रिम व वर्गणीची वसुली थांबविण्यात आलेली नाही. तसेच सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांबाबत भ.नि.नि. चा अंतिम प्रदान आदेश निर्गमित करण्यात आलेला नाही.***

उल्हासनगर मनपा शिक्षण मंडळाकडील श्री.कुमार संखेजा, उपशिक्षक शाळा क्र.22, उल्हासनगर हे दि.31/5/2012 रोजी सेवानिवृत्त झाले असून सदर कर्मचाऱ्यास सेवानिवृत्तीच्या वेळी भविष्य निर्वाह निधीच्या रु.12,48,429/- एढया रकमेचे अंतिम प्रदान धनादेश क्र.620054 दि.1/6/2012 अन्वये करण्यात आले आहे. सदर भविष्य निर्वाह निधीच्या अंतिम प्रदानाची पडताळणी करता खातेदारास अंतिम प्रदानात रु.3,31,754/- एवढे जादा प्रदान झाल्याचे आढळून आले आहे. याबाबत अर्धसमास पत्र क्र. 25 दि.29/05/2015 अन्वये खुलासा करण्याबाबत शिक्षण मंडळास कळविण्यात आले असता शिक्षण मंडळाने पत्र क्र.निरंक दि.4/06/2015 अन्वये खुलासा सादर केला आहे. सदर खुलासा पडताळणी करुन खालीलप्रमाणे लेखा परिक्षण अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1) श्री.कुमार सुखेजा यांचा भविष्य निर्वाह निधी लेखा क्र.379 मधील 2011-12 या वर्षात दि.31मार्च 2012 अखेरची शिल्लक खालीलप्रमाणे येते.

| | तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| | खाते वहीनुसार 2011-12 ची सुरवातीची शिल्लक | रु.10,48,002/- |

| | | |
|---|---|---|
| अधिक | वर्ष 2011-12 मधील जमा वर्गणी<br>(रु.8000/- प्रतिमाह प्रमाणे 12 महिने) | रु.96,000/- |
| अधिक | 2011-12 मधील जमा व्याज | रु.66,000/- |
| | एकूण | रु.12,10,002/- |
| वजा | मे-2011 मधील नापरतावा अग्रिम | रु.3,00,000/- |
| | 2011-12 अखेरची शिल्लक | रु.9,10,002/- |

वरीलप्रमाणे 2011-12 अखेर भ.नि.नि.लेख्यात रु.9,10,002/- एवढी रक्कम शिल्लक असतांना खातेवहीतील अखेरच्या शिल्लक रकमेत उपरी लेखन करुन रु.12,32,002/- एवढी शिल्लक दर्शविण्यात आली आहे. सदर उपरीलेखन करुन केलेला शिलकेतील बदल कशा आधारे करण्यात आला आहे. याबाबत लेखापरिक्षणास खात्री झाली नाही. तसेच याबाबत लेखापरिक्षणास साधार पुर्तता दर्शविण्यात आली नाही.

2) सदर खातेदार दि.31/5/2012 रोजी सेवानिवृत्त होत असल्याने ज्या महिन्यात अंतिम प्रदान करण्यात येणार आहे. त्या महिन्याच्या अगोदरच्या महिनाअखेर पर्यन्त भ.नि.निधी खात्याच्या शिल्लक रकमेवर व्याज अनुज्ञेय होते. त्यानुसार 2012-13 ची सुरुवातीची शिल्लक रु.9,10,002/- विचारात घेता 2012-13 मध्ये रु.8.8 टक्के दराने रु.6673/- एवढे व्याज जमा करुन रु.9,16,675/- एवढी भ.नि.नि.ची अंतिम शिल्लक खातेदारास अंतिम प्रदानासाठी देय असतांना रु.12,48,429/- एवढी रक्कम प्रदान करण्यात आली असल्याने खातेदारास अंतिम प्रदानात रु.3,31,754/- एवढे जादा प्रदान करण्यात आले आहे. अर्धसमास पत्रातील आक्षेपाबाबत विभागाने सादर केलेल्या खुलाश्यामध्ये जादा प्रदानाची रक्कम रक्कम रु.3,00,000/- उपदानाच्या रकमेतून वसुल करण्यात आल्याचे नमूद केले आहे. परंतू त्याबाबतच्या कागदपत्रांसह साधार पुर्तता दर्शविलेली नाही. तसेच जादा व्याज प्रदानाच्या रकमेची वसुली करण्यात आलेली नाही. त्यामुळे आक्षेपाची पुर्तता होत नसल्याने खुलासा मान्य करता येत नाही. त्यामुळे रक्कम रु.3,31,754/- वसुलपात्र दर्शविण्यात येत आहे.

3) भविष्य निर्वाह निधी नियम 26 व 29 नुसार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्याबाबतीत सेवानिवृत्तीपूर्व 3 महिने अगोदर त्याच्याकडून अग्रिम व वर्गणीची वसुली थांबविण्यात येईल. तसेच नियत सेवावधीच्या कमीकमीत कमी एक महिना अगोदर परंतू नियत सेवावधीच्या दिनांकास कर्मचाऱ्यास ती रक्कम मिळेल अशा पध्दतीने भविष्य निर्वाह निधीचा अंतिम प्रदान आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर खातेदाराची वर्गणीची वसुली माहे मार्च-2012 पासून बंद करणे आवश्यक असतांना वर्गणीची वसुली एप्रील 2012 पासून थांबविण्यात आली आहे. तसेच भ.नि.नि.चा अंतिम प्रदान आदेश निर्गमित करण्यात आलेला नाही. यावरुन शिक्षण मंडळाकडून उपरोक्त नियमातील तरतूदीनुसार अंतिम प्रदान आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही. सदर बाबींची पुनरावृत्ती टाळण्याच्या दृष्टीने उचित कार्यवाही करुन अनुपालन देण्यात यावे.

वसुलपात्र रक्कम रु.3,31,754/-

## *17 वेतन देयकांच्या पडताळणीमध्ये आढळलेल्या त्रुटी / उणीवा*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 03**

*प्राथमिक शिक्षण निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 1345.00/-

***माहे फेब्रुवारी 2013 मधील वेतन प्रमाणकांच्या पडताळणीत 13 कर्मचाऱ्यांच्या व्यवसाय कराची वसुली कमी केली असल्याने रु.1300/- वसुलपात्र आहेत. 4 सहायक शिक्षक पदावरील कर्मचाऱ्यांना व्यवसायकरात सुट दिली आहे. परंतू त्यांचे अपंगत्वाबाबतच्या नोंदी सेवापुस्तकात आढळल्या नाहीत. तसेच मासिक वेतनाचे प्रदानात 22 कर्मचाऱ्यांकडून वेतन प्राप्तीबाबत मुद्रांकीत पोच व 2 कर्मचाऱ्यांकडून वेतन प्राप्तीबाबत पोच घेण्यात आली नसल्याने रु.22/- इतके शासन महसुलाचे नुकसान झाले आहे.***

प्रमाणक क्र. 458, दि.12/03/2013 रक्कम रु.214779/- नॉन टेक्नीकल स्टाफ
प्रमाणक क्र. 459, दि.12/03/2013 रक्कम रु.3891409/- टेक्नीकल स्टाफ
एकूण रु. 4106188/-

उल्हासनगर शिक्षण मंडळाच्या सन 2012-13 च्या लेखा रिक्षणात माहे फेब्रुवारी-2013 पेड इन मार्च 2013 या महिन्याच्या वेतन प्रमाणकांची पडताळणी केली असता खालील प्रमाणे त्रुटी /उणीवा आढळल्या.

1) व्यवसाय कराची कमी वसुली - महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-8 दिनांक 27/6/2009 अन्वये ज्या कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते रु.10,000/- पेक्षा जास्त आहेत. अशा कर्मचाऱ्यांकडून वार्षिक रु.2500/- इतकी व्यवसाय करापोटी रक्कम (माहे मार्च-2012 ते जानेवारी-2013 दरमहा रु.200/- व माहे फेब्रुवारी 2013 रु.300/- वसुल करणे आवश्यक आहे.)

उपरोल्लिखित प्रमाणकांचे तपासणीत व्यवसाय कराची कमी वसुली झाल्याचे आढळल्याने अर्धसमास ज्ञापन क्र.9 व दि.16/05/2015 अन्वये खुलासा मागविला असता माहे जून 2015 च्या देयकातून वसुली प्रस्तावित केली जाईल, असे कळविण्यात आले.

निम्न लिखीत कर्मचाऱ्यांकडून खालीलप्रमाणे व्यवसाय कर कमी वसुल केल्याने रु.1300/- इतके शासन महसुलाचे नुकसान झालेले आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम मनपा शाळा | माहे फेब्रुवारी 2013 | माहे फेब्रुवारी 2013 | तफाव |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | क्र.17 | चा आवश्यक व्यवसाय कर | चा प्रत्यक्षात कपात व्यवसाय कर | |
| 1 | श्री.प.गु.चौधरी, मुख्याध्यापक | 300 | 200 | 100 |
| 2 | सौ.हर्षदा ह.नलावडे,सहा.शिक्षक | 300 | 200 | 100 |
| 3 | श्री.मो.र.नाईक सहा.शिक्षक | 300 | 200 | 100 |
| 4 | सौ.निलिमा सपकाळे, सहा.शिक्षक | 300 | 200 | 100 |
| 5 | सौ.सगिता इंगळे सहा.शिक्षक | 300 | 200 | 100 |
| 6 | सौ.उर्मिला कांबळे सहा.शिक्षक | 300 | 200 | 100 |
| 7 | सौ. अश्विनी कचरे सहा.शिक्षक | 300 | 200 | 100 |
| 8 | सौ.रागिणी लोखंडे सहा.शिक्षक | 300 | 200 | 100 |
| 9 | सो.सुमित्रा जाधव सहा.शिक्षक | 300 | 200 | 100 |
| 10 | सो.मंगला पहाड सहा.शिक्षक | 300 | 200 | 100 |
| 11 | श्री.सतिश बाविस्कर सहा.शिक्षक | 300 | 200 | 100 |
| 12 | सौ.रेणूका गोवर्धन सहा.शिक्षक | 300 | 200 | 100 |
| 13 | श्री.धनाजी पवार सहा.शिक्षक | 300 | 200 | 100 |
| | एकूण | 3900 | 2600 | 1300 |

2) अंध व अस्थिव्यंगाने अधू असलेल्या सेवकांना व्यवसाय कर कायदा कलम 27 (अ) (क) अन्वये व्यवसाय करातून सूट देण्यात आली आहे. तसेच व्यवसाय कर अधिनियमातील कलम 27 (अ) मध्ये केलेल्या सुधारणेनुसार मतिमंद, मूकबधीर व अंधत्व या दोषांमुळे अपंग असलेल्या मुलांचे/पाल्यांचे आई वडिलांना / पालकांना व्यवसाय करातून सूट/माफी देण्यात आली आहे.

अपंग कर्मचाऱ्यांना व्यवसाय करातून सुट अनुषगांने त्यापृष्ठयर्थचे आदेशाची नोंद वैद्यकीय प्रमाणपत्रासह सेवापुस्तकासोबत घेणे आवश्यक आहे. व्यवसाय कर सुट अनुषंगाने खालील कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकांची पडताळणी केली असता अपंगत्वा विषयक नोंदी / कागदपत्रे सेवापुस्तकात आढळली नाहीत. सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव व पदनाम | कपात केलेला व्यवसाय कर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | श्रीमती जया व्ही.माखिजा, स.शि. | निरंक | |
| 2 | श्रीमती करुणा के.नागवंशी ,स.शि. | निरंक | |
| 3 | श्री.भास्कर ल.पवार,स.शि. | निरंक | |
| 4 | श्रीमती उषा आर कुलकर्णी,स.शि. | निरंक | |

अर्धसमास ज्ञापन क्र.15दि.25/5/2015 अन्वये संबंधितास अपंगभत्ता अनुज्ञेय असल्या पृष्ठर्थचे अभिलेखाची मागणी केली असता संयुक्तिक उत्तर दिलेले नाही.

3) मासिक वेतन प्रदानाच्या मुद्रांकीत पोच नसल्याबाबत

उल्हासनगर शिक्षण मंडळाच्या 2012-13 या वित्तीय वर्षाच्या लेखा रिक्षणात माहे फेब्रुवारी पेड इन मार्च 2013 मधील वेतन प्रमाणकांची पडताळणी केली असता खालील कर्मचाऱ्यांना वेतन

अदा करतांना संबंधित कर्मचाऱ्यांना वेतन प्राप्त झाल्याबाबत त्यांची मुद्रांकीत पोच घेण्यात आली नाही. त्यामुळे वेतनाची रक्कम संबंधीत कर्मचाऱ्यास मिळाल्याची खात्री पटत नाही.

मुद्रांक अधिनियम 1899 मधील कलम 30 प्रमाणे रक्कम रु.5000/- व त्यावरील रकमेच्या प्रदानावर महसूल मुद्रांकावर पोच घेणे आवश्यक असतांना अशी पोच घेतलेली नाही.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | देय वेतन रुपये | माहे |
|---|---|---|---|
| 1 | श्रीमती सुभद्रा कोंळबे | 16474 | फेब्रुवारी 2013 चे वेतन |
| 2 | श्रीमती हर्षदा नलावडे | 2693 | फेब्रुवारी 2013 चे वेतन पोच नाही. |
| 3 | श्रीमती रेणूका गोवर्धन | 29450 | फेब्रुवारी 2013 चे वेतन |
| 4 | श्री.विनोद सुर्यवंशी | 23320 | फेब्रुवारी 2013 चे वेतन |
| 5 | श्रीमती सरला रॉय | 20642 | फेब्रुवारी 2013 चे वेतन |
| 6 | श्रीमती इदिरा पमनानी | 27196 | फेब्रुवारी 2013 चे वेतन |
| 7 | श्री.हेमंत शेजवळ | 13815 | फेब्रुवारी 2013 चे वेतन |
| 8 | श्रीमती निलम कदम | 16289 | फेब्रुवारी 2013 चे वेतन |
| 9 | श्रीमती ललिता तरोडे | 7095 | फेब्रुवारी 2013 चे वेतन |
| 10 | श्री.शंकर खरेल | 10886 | फेब्रुवारी 2013 चे वेतन |
| 11 | श्री.विजय जाधव | 15281 | फेब्रुवारी 2013 चे वेतन |
| 12 | सुरेश त्रिभूवन | 9356 | फेब्रुवारी 2013 चे वेतन |
| 13 | माणिक सोंडणकर | 4403 | फेब्रुवारी 2013 चे वेतन |
| 14 | प्रकाश वैराळे | 8643 | फेब्रुवारी 2013 चे वेतन |
| 15 | सुभेदार जाधव | 12317 | फेब्रुवारी 2013 चे वेतन |
| 16 | गुलाब मराठे | 9909 | फेब्रुवारी 2013 चे वेतन |
| 17 | किसन बताले | 19535 | फेब्रुवारी 2013 चे वेतन |
| 18 | परमानंद पुरस्वामी | 14647 | फेब्रुवारी 2013 चे वेतन |
| 19 | सुभाष सुर्यवंशी | 16122 | फेब्रुवारी 2013 चे वेतन |
| 20 | दिपक केदार | 11644 | फेब्रुवारी 2013 चे वेतन |
| 21 | कमलेश दासवानी | 14719 | फेब्रुवारी 2013 चे वेतन |
| 22 | बच्चन पाल | 10811 | फेब्रुवारी 2013 चे वेतन |
| 23 | श्रीमती भिमाबाई पवार | 4361 | फेब्रुवारी 2013 चे वेतन पोच नाही. |
| 24 | श्रीमती भारती गवाण | 14946 | फेब्रुवारी 2013 चे वेतन |

अर्धसमास ज्ञापन क्र.20 दि.27/5/2015 अन्वये सदर बाब शिक्षण मंडळाचे निदर्शनास आणली असता सर्व कर्मचारी वृन्दाचे वेतन बँकेमार्फतच अदा केले जाते. त्यामुळे पोच घेतलेली नाही मात्र यापुढे सर्वांची पोच घेण्यात येईल" अशा आशयाचे उत्तर दिनांक 3/6/2015 रोजी देण्यात आले आहे.

वसुलपात्र रक्कम

व्यवसाय कर- रु.1300/-

महसुल मुद्रांक- रु.22/-
एकूण - रु.1322/-
DATRKJM5901 (Ref No : 26, Hmm No : 20)

## *18 रोखवहीमधील त्रुटींबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 06**

*प्रा.शि.निधी, राज्य शासन व मनपा निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ब*

***रोखवही विहीत नमुन्यात ठेवलेली नसून प्रतिमहा ताळमेळ घेतलेला नाही. रोख रकमेची महिनाअखेरीस तसेच अचानक तपासणी केलेली नसून रोखवहीत पृष्ठ मोजणीचे आवश्यक प्रमाणपत्र अभिलिखित केलेले नाही. रक्कम रु.8/- लेख्याबाहेर राहिली असून ती वसूलपात्र आहे.***

उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळाचे 2012-13 चे लेखापरीक्षणात सर्वसाधारण रोखवहीची छाननी केली असता त्यामध्ये खालीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या आहेत.

1.मुंबई शिक्षण मंडळ लेखासंहिता 1953 चे नियम-4 पोटनियम (1) तसेच नियम 6(1) नुसार नमुना - 1 मध्ये सर्वसाधारण रोखवही ठेवणे आवश्यक असताना ती उल्हासनगर महानगरपालिकेच्या 31(1) नमुना -11 या विसंगत नमुन्यात ठेवलेली आहे.

2.सर्वसाधारण रोखवहीची रक्कम दोन बँकांच्या बचत खात्यामध्ये शिल्लक असून रोखवही व बँक पासबुकमधील दि.31/03/2013 च्या अखेर शिलकेत रु. 9144096.52 ची तफावत असून तफावतीचा मेळ घेण्यात आलेला नाही. त्यामुळे वित्तीय वर्षामधील प्रत्येक महिन्याच्या अखेरीस धनादेशाव्दारे प्रलंबित रकमांची खात्री करता आली नाही.

तफावतीचा तपशील खालीलप्रमाणे

| तपशील | पासबुकनुसार शिल्लक रु. | रोखवहीनुसार शिल्लक रु. | तफावत रु. |
|---|---|---|---|
| सर्वसाधारण रोखवही रोख रक्कम | | 63.00 | |
| बचत खाते क्रमांक<br>भारतीय स्टेट बँक 10931261314 | 18982.24 | 139896.72 | (-)120914.48 |

| | | | |
|---|---|---|---|
| बचत खाते क्रमांक ॲक्सीस बँक 912010027380256 | 11461668.00 | 2196657.00 | 9265011.00 |
| एकूण | 11480650.24 | 2336553.72 | 9144096.52 |

मुंबई शाळा मंडळ लेखा संहिता 1953 चे नियम-8(1)(2) प्रमाणे रोखपुस्तकातील शिल्लक बँक पासबुकामधील शिलकेचा ताळमेळ प्रत्येक महिना अखेरीस घेतलेला नाही.

वास्तविक प्रत्येक महिनाअखेरीस रोखवहीप्रमाणे येणा-या अखेरच्या शिलकेची पडताळणी बँकेच्या पासबुकाच्या त्या महिन्याच्या अखेरच्या शिलकेबरोबर करणे आवश्यक आहे.  तसेच पडताळणीमध्ये आढळून येणा-या फरकाचे बँक ताळमेळ विवरणपत्र तयार करून त्यामधील चुका (धनादेश बँकेच्या पासबुकात जमा न होणे, दुस-या खात्याचा धनादेश या खात्यात खर्ची पडणे, दिलेला धनादेश बँकेत वटविण्यासाठी सादर न होणे, बँकेने आकारलेले चार्जेस,गुंतवणुकीवरील व्याज, बँकेकडून परत आलेले (Dishonoured) धनादेश, चालू / बचत खात्यावरील व्याज इत्यादी) दुरूस्त करण्यासाठी बँकेकडे पाठविणे आवश्यक आहे.

उपरोल्लिखित नियमाप्रमाणे रोखवहीचे मासिक समतोलन व ताळमेळ घेऊन प्रशासन अधिका-यांनी मा.सभापती समोर आढावा व प्रतिस्वाक्षरीसाठी रोखवही ठेवणे आवश्यक होते. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3. मुंबई शाळा मंडळ  लेखासंहिता नियम 7(5) नुसार रोखवही दररोज बंद करून व रोख शिल्लकेचा ताळमेळ घालून प्रशासन अधिका-यांनी शिल्लक रकमेच्या नोंदीवर स्वाक्षरी करणे आवश्यक असताना मकोनि 1968 नियम 98(2)(6)प्रमाणे तसेच दैनंदिन शिल्लक अक्षरी व अंकी लिहीणे अनिवार्य असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4. मुंबई शाळा मंडळ लेखासंहिता नियम 4(3) प्रमाणे रोखवहीमधील पृष्ठ संख्या मोजून रोखवहीच्या प्रथम पृष्ठावर त्या संदर्भातील प्रमाणपत्र नोंदविणे आवश्यक असून प्रत्येक पृष्ठावर छापील क्रमांक व कार्यालयीन रबरी गोल ठसा उमटविणे अनिवार्य असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

5. मुंबई वित्तीय नियम -1959 नियम -55 सेक्शन -16 नुसार रोख रकमेचा अपहार टाळण्यासाठी रोख रकमेची प्रशासकीय अधिकाऱ्यांनी महिन्यातून एक वेळा अचानक पडताळणी करून स्वहस्ताक्षरात पडताळणी शेरा नोंदविणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र कोषागार नियम 1968 नियम 98(2) (4) प्रमाणे प्रत्येक महिन्याच्या अखेरीस/ पुढील महिन्याचे पहिल्या दिवशी व्यवहार सुरू होण्यापूर्वी कार्यालय प्रमुखांनी महिन्याच्या अखेरची शिल्लक तपासणे आवश्यक आहे.

मुंबई वित्तीय नियम 1959 नियम-96 नुसार प्रत्येक महिन्यच्या शेवटी महिन्यातील सर्व जमा व खर्च रकमांचा गोषवारा तयार करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

6. महाराष्ट्र कोषागार नियम-1968 नियम98 (2)(5) नुसार रोखवहीतून जमा व खर्च होणा-या प्रत्येक व्यवहाराचे दिवशी बँकेत पैसे भरले गेले आहेत किंवा नाही याची खातरजमा कार्यालय प्रमुखांनी

/प्रशासन अधिका-यांनी करणे गरजेचे आहे.

तथापि वित्तीय वर्षात जमा झालेल्या रकमांच्या नोंदी पावती पुस्तकावरून रोखवहीबरोबर तपासल्या असता पावती क्र.271 दिनांक 08/08/2012 अन्वये जमा केलेली रक्कम रू.8/- (आठ फक्त) जमा न केल्याने लेख्याबाहेर राहिल्याचे आढळले. सदर बाब गंभीर आहे. तसेच दि.13/09/2012 ते दि.31/03/2013 दरम्यानच्या जमा रक्कम अनुषंगाने पावतीपुस्तक लेखापरीक्षणास मागणी करूनही उपलब्ध न झाल्याने प्रत्यक्ष जमा रक्कम व रोखवहीत नोंदवलेली रक्कम यांचा मेळ घेता आला नाही. मात्र त्यापुढील दोन कोरी जमा पावती पुस्तके संबंधित लिपीकांचे ताब्यात असल्याचे आढळले. याशिवाय धनादेश क्रमांक 063655 दि.26/05/2012 रक्कम रु.2320/- हा बँकेत सादर झालेला नसून दिनांक 15/09/2012 रोजी जमा केलेल्या 90,500/- बाबतची रक्कम केव्हा पासून भरणा करणे प्रलंबित राहिले होते याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.33 दिनांक 03/06/2015 अन्वये मागणी करूनही खुलासा करण्यात आलेला नाही.

रक्कम रू.8/- लेख्याबाहेर राहिल्याने मुंबई शाळा मंडळ लेखासंहिता नियम 6(3) चे उल्लंघन झाले आहे. जबाबदारी निश्चित करून रक्कम वसूल करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. तसेच सदर अनियमितता सक्षम प्राधिका-याकडून क्षमापित केलेली नाही.

वसूलपात्र रक्कम रु.8/-

DATRKJM5901 (Ref No : 7, Hmm No : 33)

## *19 सर्व शिक्षा अभियान योजनेतील जमा व खर्च मधील त्रुटीबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 02**

*केंद्र शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***1) 2011-2012 आर्थिक वर्षाअखेरची रोखपुस्तीकेतील शिल्लक रक्कम रु.136.54 लाख दि.31/03/2012 रोजी शासनास समर्पित करणे आवश्यक असताना प्रत्यक्षात ती दि.30/03/2013 रोजी शासनास समर्पित करण्यात आलेली आहे.2) अनुदानाअभावी योजनेची आर्थिक व भौतिक उद्दिष्टे साध्य झाली नाहीत.***

सर्व शिक्षा अभियान योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून 2001 सालापासून सदर योजनेस प्रारंभ झाला. शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण देवून मुले शिक्षणाच्या हक्कापासून वंचित

राहू नयेत या उद्देशाने सदरची योजना कार्यान्वित करण्यात आली. नवीन शाळा बांधणे, प्राथमिक शाळेचे उच्च प्राथमिक शाळांमध्ये रुपांतर करणे, विशिष्ट वर्गासाठी निवासी शाळा व वसतिगृह बांधणे, फर्निचर, पुस्तके व इतर वस्तू पुरवणे, शाळा व वसतिगृह देखभाल दुरुस्ती पाहणे, मुलांना विद्यावेतन देणे, स्टाफ वेतन, व्यावसायिक व विशिष्ट कौशल्य देणे, वैद्यकीय सुविधा पुरवणे, दुर्गम भागातील मुलांना वाहतूक सुविधा पुरवणे, शाळाबाह्य मुलांना मुख्य प्रवाहात आणणे, मुलांना गणवेश व पुस्तके मोफत देणे, शिकवण्यासाठी आवश्यक साहित्य खरेदी करणे, शिक्षक वेतन दाने, विषयतज्ज्ञ व कला व शारीरीक शिक्षणासाठी निदेशक नेमणे, शिक्षकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे, संगणक प्रशिक्षण देणे, शाळांना मुलभूत सुविधा देणे, मुली, अल्पसंख्याकअनु.जातु-जमातीतील मुले, नागरी भागातील गरीब मुले इ. न शिक्षण देणे. शाळा वर्ग बांधणे इ. उद्दिष्टे,सर्व शिक्षा अभियान योजनेमध्ये अंतर्भूत करण्यात आलेली आहेत. सर्व शिक्षा योजनेची रोखपुस्तिका व उपयोगिता प्रमाणपत्रांची छाननी केली असता खालीलप्रमाणे त्रुटी आढळून आल्या.

1) सर्व शिक्षा अभियान योजनेंतर्गत 2012-2013 मध्ये रक्कम रु. 333.88/- लाख एवढी अंदाजपत्रकीय तरतूद महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडून मंजूर करण्यात आली होती. 2011-2012 अखेरची रोखपुस्तीकेतील शिल्लक रु. 136.54 लाख एवढी होती. वित्तीय वर्ष 2012-2013 मध्ये रु. 144.99 लाख इतके अनुदान सर्व शिक्षा अभियानासाठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडून प्राप्त झाले. शासन निर्णय वित्त विभाग संकीर्ण 10/02/प्र.क्र.128/अर्थोपाय दि. 26/09/2005 अन्वये 2011-2012 मध्ये रोखपुस्तीकेतील अखेरची शिल्लक रु. 136.54 लाख रक्कम दि.31/03/2012 रोजी शासनास समर्पित करणे आवश्यक असताना प्रत्यक्षात ती दि.30/03/2013 रोजी शासनास समर्पित करण्यात आलेली आहे. सदर अनियमिततेबाबत अर्ध समास ज्ञापन क्र. 12 दि. 22/05/2015 अन्वये अनुपालन सादर करण्याबाबत विनंती करण्यात आली होती. तथापि संयुक्तिक अनुपालन सादर करण्यात आले नाही. त्यामुळे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहे.

2) सर्व शिक्षा अभियान योजनेंतर्गत 2012-2013 मध्ये रक्कम रु. 333.88/- लाख एवढी अंदाजपत्रकीय तरतूद महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडून उल्हासनगर शिक्षण मंडळासाठी मंजूर करण्यात आली होती. तथापि वित्तीय वर्ष 2012-2013 मध्ये रु. 144.99 लाख इतकेच अनुदान सर्व शिक्षा अभियानसाठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडून प्राप्त झाले. अर्ध समास ज्ञापन क्र. 12 दि. 22/05/2015 अन्वये कमी प्राप्त अनुदान व संपूर्ण अनुदान प्राप्तीसाठी केलेले प्रयत्न/उपाययोजना याबाबत अनुपालन सादर करण्याबाबत विनंती करण्यात आली होती, परंतु संयुक्तिक खुलासा प्राप्त झाला नाही.पूर्ण निधी प्राप्त करणे ही शिक्षण मंडळाची जबाबदारी असताना त्यासाठी कोणतेही प्रयत्न केले नाहीत. अनुदानाअभावी योजनेची केंद्र शासनाकडील मंजूर अंदाजपत्रकानुसार निर्देशित केलेली आर्थिक व भौतिक उद्दिष्टे साध्य झाली नाहीत.त्यामुळे योजना राबवण्याचे प्रयोजन पूर्णतः साध्य झाले नाही.

DGPAGPM8503 (Ref No : 28, Hmm No : 12)

# कलम ९ क खालील आक्षेप

लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक असतानाही लेख्यात दाखविण्यात आली नसेल अशी रक्कम

**-------------------- निरंक -------------------**

# भाग दोन

# सर्वसाधारण अनियमितता

# कलम ९ ड खालील आक्षेप

खंड अ,ब,क मध्ये नमूद केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर महत्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी

## *20 सहाय्यक शिक्षक श्री सा. सु. पाटील यांच्या सेवानिवृत्ती प्रकरणातील अतिप्रदानाबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 2**

*शि.मं. निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 6110.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 6110.00/-

***1) सहाय्यक शिक्षक श्री. सा. स. पाटील यांच्या उपदानाचे प्रदान करताना रक्कम रु. 6110/- चे अतिप्रदान करण्यात आले आहे.2) नामनिर्देशन पत्रे घेण्यात आली नसुन नामनिर्देशनाची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही.***

सहाय्यक शिक्षक श्री. सांडू एस. पाटील यांच्या सेवानिवृत्ती प्रकरणाच्या माहितीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

जन्मदिनांक = 07/02/1955
सेवेत नियुक्तीचा दिनांक = 25/06/1980
सेवानिवृत्तीचा दिनांक = 28/02/2013
शेवटचे वेतन = 20400 + 4400
निवृत्तीवेतन =12220+8799-4888 =रु.16130
उपदान = 24440*16.5 =रु.403260
अंशराशीकरण रक्कम = 4888*12*8.371 =रु.491009
भ.नि.नी अंतिम प्रदान देयक = रु.1627092
पात्रता सेवा = 32 वर्षे 08 महिने 06 दिवस.

1) सहाय्यक शिक्षक श्री. सांडू एस. पाटील यांची पात्रता सेवा 32 वर्षे 08 महिने 06 दिवस होत असून त्यांचा सेवेतील एकूण सहामाही कालावधी 65 होत आहे. तथापि उपदानाची गणना करताना एकूण 66 सहामाही कालावधी गृहीत धरण्यात आलेले आहेत. त्यामुळे उपदानाची रक्कम रु.6110/- ने जादा गणना करण्यात आलेली आहे.

दिलेले उपदान = 24440 * 6 = 403260/-

देय उपदान = 24440 * 65/4 =397150/-

ज्यादा प्रदान= 4,03,260 – 3,97,150 =6,110/-

सदर त्रृटी बाबत खुलासा करण्याबाबत अर्धसमास पत्र क्र. 19 दि. 27/05/15 अन्वये विनंती करण्यात आली होती. तथापि शिक्षण मंडळाकडून कोणतेही अनुपालन प्राप्त झाले नाही. सहाय्यक शिक्षक श्री. सांडू एस. पाटील यांना अतिप्रदान कलेली उप्दानाची रक्कम रु.6,110/- त्यांच्या निवृत्तिवेतनातून वसूल करण्यात यावी.

2) श्री. सांडू एस. पाटील यांच्याकडून नामनिर्देशन पत्रे घेण्यात आली नसुन नामनिर्देशनाची नोंद सेवापुस्तकात घेण्यात आली नाही.

वसूलपात्र रक्कम- रु. 6110/-

DGPAGPM8503 (Ref No : 23, Hmm No : 19)

## *21 स्वेच्छा सेवानिवृत्ती वेतन प्रकरणांमध्ये उपदानाचे अतिप्रदान झालेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 02**

*प्राथमिक शिक्षण निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 4430.00/-

| |
|---|
| ***निवृत्तीवेतन प्रकरणांच्या छाननीत वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये शिक्षण मंडळामधील कर्मचाऱ्यांपैकी दोन कर्मचाऱ्यांनी स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली आहे. परंतु नोटीसची परिगणना चुकल्याने दोन्ही कर्मचाऱ्यांना नियत दिनांकानंतर विलंबाने कार्यमुक्त केले आहे. तसेच वर्ग-4 मधील कर्मचाऱ्याचे अंशराशीकरणाची परिगणना वय वर्षे 61 ऐवजी वय वर्ष 59 वर्ष पायाभूत धरुन केल्याने रु. 4430/- जादा प्रदान झाले असून सदर रक्कम वसूलपात्र आहे.*** |

उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळाचे 2012-13 चे लेखापरीक्षणात निवडक सेवानिवृत्ती वेतन प्रकरणांची छाननी केली असता निदर्शनास आलेल्या उणीवांबाबत दिलेल्या अर्धसमास पत्रांना प्राप्त झालेल्या उत्तरांची छाननी करुन खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1. विलंबाने सेवानिवृत्ती

श्रीमती अनिता शामलाल कुकरेजा सहा.शिक्षिका न.पा. शाळा क्र. 5 यांनी 20 वर्षापेक्षा जास्त सेवा झाल्याने दिनांक 30/04/2012 रोजी सादर केलेला विनंती अर्ज मंजूर करताना निवृत्तीचा दि.31/07/2012 निश्चित केला आहे. महाराष्ट्र नागरी सेवा नियम (निवृत्तीवेतन) नियम 10(7) प्रमाणे नोटीस कालावधीची सदोष परिगणना केल्याने संबंधित सहा. शिक्षिकेस एक दिवस

विलंबाने कार्यमुक्त केले आहे. त्यामुळे दिनांक 31/07/2012 रोजी प्रदान केलेल्या वेतन व भत्त्याची वसूल करुन त्याऐवजी निवृत्तीवेतन (त्या दिवसाचे रु. 351.41/-) प्रदान करणे आवश्यक आहे. माहे जुलै 2012 चे वेतन देयकाची मागणी करूनही देयक सादर केलेले नाही. अर्धसमास ज्ञापन क्र.11 दिनांक 20/05/2015 अन्वये सदर बाब शिक्षण मंडळाचे निदर्शनास आणली असता शिक्षण मंडळाने दिनांक 03/06/2015 रोजी सादर केलेल्या उत्तरात चूक मान्य करून नियमानुसार येणारी वसूली त्यांच्या निवृत्तीवेतनातून केली जाईल असे कळविले आहे.

श्रीमती माधुरी जयदेव सचदेव सहा.शिक्षिका म.न.पा. शाळा क्र. 10 यांचेही स्वेच्छा सेवानिवृत्ती प्रकरणात त्यांनी दिनांक 9/08/2012 रोजी स्वेच्छा सेवानिवृत्तीसाठी नोटीस दिलेली होती, त्याप्रमाणे त्यांना दिनांक 8/11/2012 रोजी (90 दिवसानंतर) सेवानिवृत्त न करता दिनांक 30/11/2012 रोजी सेवानिवृत्त केल्याने माहे नोव्हेंबर, 2012 मधील 22 दिवसांचे वेतन व भत्ते जादा प्रदान झालेले आहेत. त्याऐवजी निवृत्तवेतनाची रक्कम प्रदान करणे आवश्यक होते. रक्कम निश्चीतीसाठी माहे नोव्हेंबर 2012 च्या वेतन देयकाची मागणी केलेली होती. परंतु देयक सादर केलेले नाही. तसेच सेवेच्या सदोष परिगणनेमुळे त्यांना सेवा उपदानाची रक्कमही (रु. 13,942/-) कमी प्रदान झालेली आहे. अर्धसमास ज्ञापन क्र. 22 दिनाक 28/05/2015 अन्वये सदर बाब शिक्षण मंडळाचे निदर्शनास आणली असता, “सदर कर्मचारी यांना अनावधानाने 22 दिवस उशिराने कार्यमुक्त केले असून याबाबत नियमानुसार येणारी वसूली त्यांचे कमी प्रदान केलेल्या उपदानाचे रक्कमेतून समायोजित करुन उर्वरीत रक्कम त्यांना देण्यात येत आहे. अशा आशयाचे उत्तर दिनांक 3/06/2015 रोजी शिक्षण मंडळाने सादर केलेले आहे.

2. अंशराशीकरणामधील अतिप्रदान

श्री. दत्तू हिरु गायकवाड, शिपाई हे म.न.पा. शाळा क्र. 25 मधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांना अनुज्ञेय असणाया- निवृत्त वेतन रु.5215/- पैकी 40 % प्रमाणे रु. 2086/- या निवृत्तीवेतनाचे त्यांनी अंशराशीकरण केलेले आहे. श्री. गायकवाड वर्ग 4 मधील कर्मचारी असल्याने वयाच्या 60 वर्षानंतर निवृत्त झाले आहेत. त्यांचे अंशराशीकरणाची परिगणना पुढीलप्रमाणे होते. 2086 x 12x 8.194= 205112.20 परंतु त्याऐवजी अंशराशीकरणाचा प्रति रुपयाचा दर 58 वर्षानंतरचा धरल्याने त्यांना रु. 4430/- इतके जादा प्रदान झाले आहे. (2086 x 12 x 8.371= 209542.87). सदरची बाब अर्धसमास ज्ञापन क्र. 23 दिनांक 28/05/2015 अन्वये शिक्षण मंडळाचे निदर्शनास आणली असता दिनांक 4/06/2015 रोजी सादर केलेल्या उत्तरात “अतिरिक्त प्रदानाची रक्कम रु. 4,430/- त्यांच्या माहे जून, 2015 या महिन्यातील निवृत्तीवेतनातून वसूल करण्यात येत आहे अशा आशयाचे उत्तर दिले आहे.

वित्तीय वर्ष 2011-12 च्या लेखापरीक्षणात परिच्छेद क्र. 28 अन्वये निवृत्तीवेतन विषयक नोंदवह्यांबाबत आक्षेप घेतलेला असून यावर्षीही त्यामध्ये सुधारणा झालेली नसल्याने तो कायम ठेवणेत येत आहे.

वसुलपात्र रक्कम रु. 4,430/-

DATRKJM5901 (Ref No : 29, Hmm No : 23)

## *22 चलन पडताळणीबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 01**

*राज्य, मनपा व प्राथमिक शिक्षण निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 62110.00/-

***शासन खाती भरलेल्या रकमांचा कोषागार अभिलेख्यांबरोबर ताळमेळ घेतला नाही.***

रोखप्रमाणक क्र.464, दिनांक 16/03/2013 रक्कम रु. 62,110/-

महाराष्ट्र कोषागार नियम 1968 मधील नियम क्र.98(2)(पांच) नुसार शासकीय रकमांचा भरणा चलनाव्दारे जेव्हा बँकेत करण्यात येईल. तेव्हा कार्यालय प्रमुखाने भरणा संबंधात रकमा खरोखरच शासन खाती जमा करण्यात आल्याबद्दल स्वत:ची खात्री करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने महिना संपल्यानंतर तात्काळ त्या महिन्यामध्ये भरणा केलेल्या सर्व रकमांचे जमा विवरणपत्र पडताळणीसाठी कोषागारात सादर करुन कोषागाराकडून पडताळणी करुन जमा रकमेबाबत कोषागाराकडून प्रमाणपत्र घेतले पाहिजे.

माहे फेब्रुवारी 2013 पेड इन मार्च 2013 च्या वेतन प्रमाणकाचे छाननीत कर्मचा-याचे वेतनातून कपात केलेली व्यवसाय कराची रक्कम रु.62,110/- शासनखाती जमा करण्यात आल्याची खात्री करून घेण्यासाठी प्रशासन अधिका-यांनी कोषागारातून भरणा रक्कम विषयक पावती प्राप्त करून ती रोकडवहीतील नोंदीशी पडताळून पाहिलेली नाही.

नियमाप्रमाणे प्रतिमहा चलन पडताळणी केली नसल्याने अर्धसमास ज्ञापन क्र.5 दि.12/5/2015 च्या पत्रान्वये विचाराणा केली असता शासकीय रकमांचा भरणा चलनाद्वारे (व्यवसायकर व आयकर )कार्यालय प्रमुखांचे सही घेवून बँकेत भरण्यात येते. जोपर्यंत कार्यालय प्रमुखास खात्री पटत नाही तोपर्यंत त्यांची धनादेशावर सही होत नाही. म्हणजे खात्री पटल्यानंतर रकमेचा भरणा करण्यात येतो अशा आशयाचे कार्यालयाने दिलेले उत्तर संयुक्तिक नाही.

प्रस्तूत प्रकरणी 2012-13 या वित्तीय वर्षामध्ये अशा प्रकारे शासन खाती भरणा करण्यात आलेल्या सर्व रकमांची चलन पडताळणी करुन भरणा रकमेबाबत कोषागाराच्या प्रमाणपत्रासह अनुपालन सादर करण्यात यावे. तोपर्यंत रक्कम रु.62,110/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATRKJM5901 (Ref No : 12, Hmm No : 05)

## *23 शालेय पोषण आहार योजनेच्या रोखपुस्तिकेतील अनियमिततेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 04**

*शासन निधी निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***रोखवहीची व बँक पासबुकमधील नोंदीची पडताळणी केली असता असे दिसून आले कि, 2012-13 मधील न वटलेल्या धनादेशांची संख्या ०६ असताना वार्षिक बँक ताळमेळमध्ये केवळ ०२ धनादेशांचा (uncashed cheque list) समावेश करण्यात आला आहे. मुंबई शिक्षण मंडळ लेखा संहिता १९५३ नियम ८ अनुसार रोखपुस्तीकेतील जमा व खर्च बरोबर असल्याची खात्री करून लेखा दररोज बंद करणे आवश्यक आहे, परंतु सदरप्रमाणे कार्यवाही झाली नाही.केवळ वर्षाअखेरीस हिशोब बंद करण्याची कार्यवाही करण्यात आली आहेप्रत्येक महिन्यास जमा व खर्च गोषवारा काढण्याची कार्यवाही करण्यात आली नाही.***

शिक्षण मंडळाच्या 2012-13 मधील शालेय पोषण आहार योजनेच्या रोखपुस्तीकेतील नोंदींची तपासणी केली असता त्यामध्ये खालील त्रृटी आढळून आल्या. सदर त्रृटी बाबत खुलासा करण्याबाबत अर्धसमास पत्र क्र. १० दि. 19/05/15 अन्वये विनंती करण्यात आली होती. प्रशासन अधिकारी यांचे पत्र दि.04/06/15 नुसार अनुपालन सदर करण्यात आले. त्याप्रमाणे लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) 2011-12 मधील रोखपुस्तीकेमधील नोंदी कच्च्या स्वरुपात शिसपेन्सिलने घेण्यात आल्याने 2011-12 या वित्तीय वर्षातील रोखनोंदवहीतील अखेरची शिल्लक रु.64,63,907.05/- च्या योग्यतेबद्दल खात्री होत नाही. रोखवहीची व बँक पासबुकमधील नोंदीची पडताळणी केली असता असे दिसून आले कि, 2012-13 मधील न वटलेल्या धनादेशांची संख्या ०६ असताना वार्षिक बँक ताळमेळमध्ये केवळ ०२ धनादेशांचा (uncashed cheque list) समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे सदरचा बँक ताळमेळ सदोष असून मुंबई शिक्षण मंडळ लेखा संहिता १९५३ नियम ८(१) नुसार बँक ताळमेळ दरमहा घेणे आवश्यक असताना ताळमेळ दरमहा न घेता तो फक्त मार्च अखेरीस घेण्यात आलेला आहे.

2) मुंबई शिक्षण मंडळ लेखा संहिता १९५३ नियम ८ अनुसार रोखपुस्तीकेतील जमा व खर्च बरोबर असल्याची खात्री करून लेखा दररोज बंद करणे आवश्यक आहे. व नियम 7(5) नुसार प्रशासन अधिकाऱ्यांनी दिवसाअखेर ते तपासून स्वाक्षरी करणे आवश्यक आहे, परंतु सदरप्रमाणे कार्यवाही झाली नाही.

3) मुंबई वित्तीय नियम १९५९ मधील नियम क्र. ११ नुसार महिनाअखेरीस हिशोब बंद करून तो प्रशासन अधिका-यानी साक्षांकित करणे आवश्यक आहे. केवळ वर्षाअखेरीस हिशोब बंद करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

4) मुंबई वित्तीय नियम १९५९ मधील नियम क्र. ९६ नुसार 2012-13 मधील प्रत्येक महिन्यास जमा व खर्च गोषवारा काढण्याची कार्यवाही करण्यात आली नाही.

DGPAGPM8503 (Ref No : 3, Hmm No : 10)

## *24 जात प्रमाणपत्र वैधता पडताळणी समितीकडून तपासून घेतल्याचे प्रमाणपत्र घेण्यात आले नसल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 01**

*प्राथमिक शिक्षण निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***अनुसुचित जाती, जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे लाभ घेणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता पडताळणी समितीकडून तपासून घेतली नाही.***

महाराष्ट्र अनुसुचीत जाती, अनुसुचीत जमाती विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागणवर्ग विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व पडताळणीचे विनियमन) अधिनियम 2000 च्या कलम 3 अन्वये अनुसूचीत जमातींसाठी असलेले लाभ व सवलतीचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या / फायदा घेत असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस नियुक्तीनंतर लवकरात लवकर जात प्रमाणपत्राची वैधता जात पडताळणी समितीकडून तपासून तसे प्रमाणपत्र कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे. तपासणी समित्यांच्या रचना कामाचे स्वरुप व अधिकाराबाबतचे विवेचन महाराष्ट्र शासन विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागास वर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, शासन निर्णय क्र.सीबीडी-12-2000/252/प्र.क्र.1/इमाव-5 दि.25/1/2000 मध्ये केलेले आहे.

लेखा परिक्षणात निवडक सेवापुस्तकांचे पडताळणीत असे निदर्शनास आले की, खालील अधिकारी / कर्मचाऱ्यांची जात प्रमाणपत्राची वैधता पडताळणी समितीकडून पडताळणी करुन घेतलेली नाही.

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव व पदनाम | नियुक्तीचा दिनांक | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|
| 1 | कु.निलम चंद्रकांत कदम,लिपिक | 28/102009 | हिंदू गोंधळी |
| 2 | श्रीमती स्नेहलता बा.बागडे, उपशिक्षीका | 11/10/1993 | हिंदू चांभार |

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | श्री.राजकुमार रामदिन शर्मा, प्राथ.शिक्षक | 4/1/1995 | हिंदू न्हावी |
| 4 | सौ. उर्मिला रविंद्र कांबळे, उपशिक्षीका | 29/07/1992 | हिंदू चांभार |
| 5 | सौ.नलिनी परमानंद निकुंभ सहायक शिक्षीका | 30/07/1984 | हिंदू महार |
| 6 | सौ.अश्विनी अशोक काचरे, उपशिक्षीका | 31/07/1992 | हिंदू मल्हार कोळी |
| 7 | श्रीमती करुणा कन्हैयालाल नागवंशी,सहायक शिक्षीका | 13/07/1984 | हिंदू कातिया |
| 8 | कु.रागिनी रामनाथ बागूल, सहायक शिक्षीका | 16/07/1882 | हिंदू धनगर |

प्रस्तूत प्रकरणी उपरोक्त कर्मचाऱ्यांचे तसेच अशा प्रकारे जात प्रमाणपत्र वैधता पडताळणी न झालेल्या इतर सर्व कर्मचाऱ्यांचे प्रकरणांचा( सेवापुस्तकाप्रमाणे) सखोल आढावा घेवून जात प्रमाणपत्राच्या वैधता पडताळणीबाबत शिक्षण मंडळा मार्फत पुढील आवश्यक कार्यवाही करुन जात प्रमाणपत्र वैधता पडताळणी करुन घेवून तसे सप्रमाण अनुपालन लेखा परिक्षणास सादर करावे. तसेच जात प्रमाणपत्राची वैधता पडताळणी समितीचे प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्याअनुषंगाने लाभ देण्यात येवू नयेत.

DATRKJM5901 (Ref No : 11, Hmm No : 30)

## *25 एतदर्थ मंडळाची परिक्षा उत्तीर्ण नसतांना / उत्तीर्ण होण्यास सुट नसतांना वार्षीक वेतनवाढी मंजूर केल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 01**

*प्राथमिक शिक्षण निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

***एतदर्थ मंडळाची मराठी / हिन्दी भाषा परिक्षा उत्तीर्ण नसलेल्या किंवा तशी सूट न घेतलेल्या कर्मचाऱ्यांना वार्षीक वेतनवाढी मंजुर केलेल्या आहेत.***

महाराष्ट्र शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.मभाप - 1084/2701/20दि.11/9/1976 तसेच शासन अधिसुचना सामान्य प्रशासन विभाग क्र.मभाप-127/14/सीआर-2/87/0दि.30/12/1987 अन्वये वर्ग -3 व त्यावरील कर्मचारी / अधिकारी वर्गाला एतदर्थ मंडळाची मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे किंवा उत्तीर्ण होण्यापासून सुट मिळवणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.हिंभाप/1083/1448/20 दि.1/12/1984 अन्वये एतदर्थ मंडळाची हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे किंवा तशी सूट मिळविणे आवश्यक आहे. तसेच जे कर्मचारी नियुक्तीनंतर अशा परीक्षा उत्तीर्ण होणार नाहीत किंवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळवणार नाहीत त्यांची वेतनवाढ रोखणे आवश्यक आहे.

परंतू शिक्षण मंडळाकडील निवडक सेवापुस्तकांची छाननी करता असे आढळून आले की, शिक्षण मंडळांतर्गत वर्ग 3 व त्यावरील कार्यरत कोणत्याही कर्मचाऱ्याचे सेवा पुस्तकात उपरोल्लिखित परीक्षा उत्तीर्ण झाल्याची किंवा सूट मिळविल्या विषयी नोंद आढळून आली नाही. परंतु संबंधितांच्या वार्षिक वेतनवाढी न रोखता नियमितपणे काढलेल्या आहेत . याबाबत अर्धसमास पत्र क्र.29 दि.2/6/2015 अन्वये खुलासा मागविला होता. परंतु विहीत वेळेत उत्तर मिळाले नाही.
उदाहरणा दाखल काही कर्मचाऱ्यांचा तपशील खाली नमूद केला आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव व पदनाम | नियुक्तीचा दिनांक |
|---|---|---|
| 1 | कु.निलम चंद्रकांत कदम,लिपिक | 28/10/2009 |
| 2 | श्रीमती दिपमाला नामदेव केदार, प्राथमिक शिक्षक | 23/6/2010 |
| 3 | श्री.राजेंद्र मुलचंद सोनवणे,सहायक शिक्षक | 30/07/1984 |
| 4 | श्रीमती स्नेहलता बा.बागडे, उपशिक्षीका | 11/10/1993 |
| 5 | श्री.राजकुमार रामदिन शर्मा, प्राथ.शिक्षक | 04/01/1995 |
| 6 | सौ. उर्मिला रविंद्र कांबळे, उपशिक्षीका | 29/07/1992 |
| 7 | सौ.नलिनी परमानंद निकुंभ सहायक शिक्षीका | 30/07/1984 |
| 8 | सौ.अश्विनी अशोक काचरे, उपशिक्षीका | 31/07/1992 |
| 9 | श्रीमती करुणा कन्हैयालाल नागवंशी, सहायक शिक्षीका | 13/07/1984 |
| 10 | कु.रागिनी रामनाथ बागूल, सहायक शिक्षीका | 16/07/1882 |

शिक्षण मंडळाकडील कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू असल्याने उपरोक्त परीक्षा उत्तीर्ण होणे किंवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविणे बंधनकारक आहे. अन्यथा नियुक्तीनंतर संबंधितांची येणारी पुढील वेतनवाढ रोखणे आवश्यक असतांना शिक्षण मंडळांतर्गत कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंदाबाबत नियमाप्रमाणे आवश्यक कार्यवाही केलेली नाही.

प्रस्तूत प्रकरणी अशा प्रकारच्या उर्वरित सर्व कर्मचारी वृंदाचा आढावा घेवून नियमाप्रमाणे उचित कार्यवाही करुन तसे अनुपालन सादर करावे.

DATRKJM5901 (Ref No : 10, Hmm No : 29)

## *26 मागील लेखा परिक्षण अहवालातील प्रलंबीत परिच्छेदांबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 01**

*प्राथमिक शिक्षण निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***परिच्छेदांचे निपटाऱ्याबाबत शिक्षण मंडळामार्फत कोणतीही कार्यवाही न केल्याने 1976-77 आर्थिक वर्षापासूनचे परिच्छेद प्रलंबित असून प्रलंबित परिच्छेदांची संख्या दरवर्षी वाढत आहे.***

मुंबई प्राथमिक शिक्षण नियम-1949 नियम 61(4)(क) प्रमाणे लेखा परिक्षणात घेतलेल्या आक्षेपांची उत्तरे देण्याची जबाबदारी प्रशासन अधिकारी यांची आहे.

उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळाचे 2012-13 चे लेखा परिक्षणात प्रलंबित आक्षेपांचा आढावा घेतला असता खालीलप्रमाणे 1976-77 पासून परिच्छेदांचा निपटारा करण्यासाठी आवश्यक कार्यवाही केली नसल्याने 871 परिच्छेद प्रलंबित आहेत.

| अ.क्र. | वित्तीय वर्ष | प्रलंबित परिच्छेद | निकाली काढलेले परिच्छेद | शिल्लक प्रलंबित परिच्छेद |
|---|---|---|---|---|
| 1 | 1976-77 | 15 | -- | 15 |
| 2 | 1977-78 | 25 | -- | 25 |
| 3 | 1978-79 | 31 | -- | 31 |
| 4 | 1979-80 | 28 | -- | 28 |
| 5 | 1981-82 | 29 | -- | 29 |
| 6 | 1982-83 | 23 | -- | 23 |
| 7 | 1984-85 | 30 | -- | 30 |
| 8 | 1984-85 | 50 | | 50 |
| 9 | 1986-87 | 35 | -- | 35 |
| 10 | 1987-88 | 46 | -- | 46 |
| 11 | 1988-95 | 25 | -- | 25 |
| 12 | 1995-98 | 121 | -- | 121 |
| 13 | 1996-97 | 57 | -- | 57 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 14 | 1998-02 | 56 | -- | 56 |
| 15 | 2002-2003 | 36 | -- | 36 |
| 16 | 2003-2004 | 31 | -- | 31 |
| 17 | 2004-2005 | 27 | | 27 |
| 18 | 2005-2006 | 22 | | 22 |
| 19 | 2006-2009 | 30 | | 30 |
| 20 | 2009-2010 | 78 | | 78 |
| 21 | 2010-2011 | 44 | | 44 |
| 22 | 2011-2012 | 32 | | 32 |
| | एकूण | 871 | --- | 871 |

सन 1976-77 ते 2011-12 पर्यन्त 871 परिच्छेद प्रलंबित असून यापुर्वीही स्थानिक निधी लेखा परिक्षा विभागामार्फत प्रलंबित परिच्छेदांबाबत कार्यवाही न केल्याविषयी परिच्छेद घेण्यात आले आहेत. याबाबत अर्धसमास पत्र क्र.16 दिनांक 25/5/2015 अन्वये परिच्छेद निपटारा करणेसाठी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मागणी केलेला होता. त्यास दिनांक 3/6/2015 रोजी सादर केलेल्या उत्तरात प्रलंबीत मुद्दयांबाबत कार्यवाही प्रस्तावित असल्याचे कळविले आहेत. यावरुन परिच्छेद निकाली काढण्यासाठी प्रशासन अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नसल्याने परिच्छेद प्रलंबित दिसतात. ही बाब गंभीर आहे.

प्रस्तुत प्रकरणी परिच्छेद निपटाऱ्यावर लक्ष ठेवण्यासाठी नोंदवही ठेवावी तसेच प्रलंबित परिच्छेदांच्या निपटाऱ्यासाठी ठोस व नियोजनबध्द कार्यक्रमाची आखणी करुन जास्तीत जास्त परिच्छेद निकाली काढण्यासाठी प्रयत्न करुन त्याबाबतची अनुपालने स्थानिक निधी लेखा परिक्षा संचालनालयास सादर करुन निकाली काढणे कामी उचित कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अनुपालन अहवाल सादर करावा.

DATRKJM5901 (Ref No : 9, Hmm No : 16)

## *27 सभासद मानधन व पालक प्रात्साहन भत्ता अदायगीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 03**

*प्राथमिक शिक्षण निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 375000.00/-

| |
|---|
| ***सभापती व सदस्य मानधन दर ज्या प्राधिकर पत्रान्वये निश्चीत करण्यात आला तो प्राधिकार लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाला नाही. प्रशासन अधिकारी यांनी विद्यार्थ्यांची उपस्थिती पडताळणीसाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद ठाणे यांचे पत्र जा. क्र. ठाजीप/ शिक्षण/ प्राथमिक/ नियो 4/712-33/ दि.13/07/2012 नुसार शाळा तपासणी करणे आवश्यक होते. विद्यार्थी वाटप यादी व उपयोगिता प्रमाणपत्र मुख्याध्यापकांकडून घेण्यात आली नाही.*** |

2012-2013 आर्थिक वर्षामध्ये प्रमाणके तपासली असता सभापती व सदस्य मानधनावर रु.3,75,000/- एवढा निधी खर्ची पडला आहे. दरमहा रक्कम रु.7500/- प्रति सदस्य याप्रमाणे मानधन अदा करण्यात आले आहे.

शासन निर्णय क्र. पीआरई - १०९१/(९६१४)/प्रशि-१ मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०००३२ दि.१०/०१/१९९२ नुसार प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रीकरण करण्याबाबतच्या धोरणानुसार प्राथमिकशाळेत जाणार्या मुलांचे गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी व उपस्थितीचे प्रमाण वाढवण्यासाठी मुलांच्या पालकांना उपस्थिती भत्ता देण्यासाठी सदरची योजना दि.३/१/१९९२ पासून सुरु करण्यात आली. विद्यार्थ्यांना त्यांची मासिक उपस्थिती किमान 75% असल्यास त्यांच्या पालकांना उपस्थिती भत्ता सदर योजनेनुसार अनुदेय होतो. पालक प्रोत्साहन भत्त्यासाठी उल्हासनगर मनपा शिक्षण मंडळास 2012-2013 या आर्थिक वर्षासाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद ठाणे यांचे पत्र जा. क्र. ठाजीप/शिक्षण/प्राथमिक/नियो 4/712-33/दि.13/07/2012 नुसार रक्कम रु. 2,55,468/- एवढा निधी उपलब्ध करून देण्यात आला. प्रमाणक क्र. 476 दि. 16/03/2013 नुसार सदरचा निधी प्रति विद्यार्थी रु. 122/- याप्रमाणे 2094 विद्यार्थ्यांसाठी खर्ची पडला असून याबाबत अर्धसमास पत्र क्र.36 दि.03/06/2015 अन्वये खुलासा करण्यास विनंती केली असता कोणताही खुलासा प्राप्त झाला नाही. लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) सभापती व सदस्य मानधन दर ज्या प्राधिकार पत्रान्वये निश्चीत करण्यात आला तो प्राधिकार लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाला नाही. त्यामुळे सभापती व सदस्य यांना अदा केलेल्या मानधन दराच्या योग्यतेबाबत खात्री करता आली नाही. त्यामुळे सदरचा खर्च रक्कम रु. 3,75,000/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

2) पालक प्रात्साहन भत्ता अदायगीसाठी उपस्थित विद्यार्थी पटसंख्या पडताळणीसाठी प्रशासन अधिकारी यांनी शाळा तपासणी करणे आवश्यक होते. परंतु शाळा तपासणी करण्यात आलेली नाही.

3) विद्यार्थी वाटप यादी व उपयोगिता प्रमाणपत्र मुख्याध्यापकांकडून घेण्यात आली नाही. शिक्षणाधिकारी

(प्राथमिक) जिल्हा परिषद ठाणे यांचे पत्र जा. क्र. ठाजीप/शिक्षण/प्राथमिक/नियो 4/ 712-33/दि.13/07/2012 नुसार मुख्याध्यापकांकडून प्राप्त उपस्थित विद्यार्थी पटसंख्यानुसार भत्ता वाटप करणे आवश्यक हाते.

DGPAGPM8503 (Ref No : 24, Hmm No : 36)

## 28 शिक्षण मंडळाच्या कर्मचारी/ अधिकाऱ्यांकडून प्रतिभूती न घेतल्याबाबत

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 01**

*प्राथमिक शिक्षण निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***प्रशासन अधिकारी तसेच कर्मचारी वृंदाकडून प्रतिभूती घेतलेली नसून विहीत नमुन्यात नोंदवही ठेवलेली नाही.***

मुंबई प्राथमिक शिक्षण नियम 1949 मधील नियम 65 नुसार शासनाने नियुक्त केलेल्या प्रशासन अधिकाऱ्याने परिशिष्ट फ नुसार राज्यपालांच्या नांवे रु.2000/- रकमेच्या जात मुचलक्याचा नमुना राज्यपालांच्या नांवे भरुन देणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम 1965 मधील कलम 80 (अ) अन्वये रोखपाल, भांडारपाल, उपभांडारपाल, मुद्रांक लिपिक तसेच ज्यांच्याकडे स्वायत्त संस्थेच्या वतीने रकमा जमा करणे ताब्यात ठेवणे हे काम सोपविण्यात आले आहे. असे कर्मचारी किंवा ज्यांच्याकडे स्वायत्त संस्थेच्या मालकीची मालमत्ता सोपविली आहे. त्यांनी परिस्थितीप्रमाणे नियमीत केलेल्या व सक्षम प्राधिकाऱ्याने मंजूर केलेल्या नमुन्यात जमानत किंवा प्रतिभूती देणे आवश्यक आहे. कामावर हजर झाल्यापासून ३० दिवसांचे आत प्रतिभूती घेवून त्याबाबतची नोंदवही महाराष्ट्र नगरपलिका लेखा संहिता 1971 मधील नियम 138 प्रमाणे विहीत नमूना 106 मध्ये ठेवणे आवश्यक आहे.

शिक्षण मंडळाचे अधिनस्त 28 शाळा आहेत. शाळांमधील मुख्याध्यापकांचे / कर्मचाऱ्यांचे तसेच प्रशासन अधिकाऱ्याचे प्रतिभूती कागदपत्र व नोंदवहीबाबत अर्धसमास पत्र क्र.8 दि.16/5/2015 अन्वये मागणी केली असता उत्तर अप्राप्त आहे. त्यावरुन असे निदर्शनास येते की, शिक्षणमंडळांतर्गत प्रशासन अधिकारी पदावर कार्यरत असणाऱ्या अधिकारी तसेच लेखापाल, रोखपाल, भांडारपाल व मुद्रांक लिपीक तसेच 28 शाळामधील मुख्याध्यापक व रोखपाल या कर्मचारी वृन्दांकडून प्रतिभूती घेतलेली नाही. नियमबाहयतेबाबत साधार खुलासा करुन झालेली अनियमितता शासनाकडून क्षमापित करुन घेणे आवश्यक आहे. प्रस्तूत प्रकरणी संबंधित कर्मचारी वृन्दांच्या प्रतिभूतीची रक्कम निश्चित करून तात्काळ

प्रतिभूती /तारणपत्रे घ्यावीत त्याबाबतची नोंद नोंदवही नमुना 106 मध्ये घेवून तसे अनुपालन देण्यात यावे.

DATRKJM5901 (Ref No : 13, Hmm No : 08)

## *29 स्थावर व जंगम मालमत्तेच्या वार्षिक पडताळणी बाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**

**No. of Irregularities: 01**

*प्राथमिक शिक्षण निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***स्थावर व जंगम मालमत्तेच्या वार्षिक तसेच नियतकालीक पडताळणी न केल्याबाबत***

मुंबई शिक्षण मंडळ लेखा संहिता, 1953 मधील नियम 29 प्रमाणे शिक्षण मंडळाची स्थावर व जंगम मालमत्तेची प्रशासन अधिकाऱ्यांनी दरवर्षी पडताळणी केली पाहिजे.

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 च्या नियम 156 प्रमाणे जडवस्तू संग्रह पुस्तकातील जंगम मालमत्तेची तसेच स्थावर मालमत्तेची कार्यालय प्रमुखांनी दरवर्षी पडताळणी केली पाहिजे. पडताळणीच्या वेळी नोंदवहीमधील नोंदवहीसमोर अद्याक्षरी करुन त्याविषयीचे निष्कर्ष दर्शविणारे प्रमाणपत्रही देणे अनिवार्य आहे. याशिवाय महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य व नगरविकास, मुंबई यांचा शासन निर्णय क्र.व्ही.ओ.एस/059/बी दि.3/10/1961 अन्वये पडताळणीचे प्रमाणपत्र संबंधित नोंदवहीत अभिलिखीत करणे आवश्यक आहे. जर पडताळणीत कोणतीही गंभीर विसंगती आढळल्यास त्याविषयीचा अहवाल मा.सभापती शिक्षण मंडळ यांना तात्काळ दिला पाहिजे. महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम 98 प्रमाणेही वार्षिक तपासणीचे प्रमाणपत्र विभाग प्रमुखाला सादर करण्याविषयी सुचित केलेले आहे.

उल्हासनगर शिक्षण मंडळाच्या सन 2012-13 च्या लेखा परिक्षणात जडवस्तू संग्रह तसेच संग्रह पुस्तकात नमूद केलेल्या स्थावर व जंगम मालमत्तेच्या पडताळणीची प्रमाणपत्रे तसेच नोंदवहयांची मागणी अर्धसमास ज्ञापन क्र.8 दि.16/5/2015 अन्वये केलेली होती. परंतू अशी नियतकालिक पडताळणी करण्यात आली नाही.

DATRKJM5901 (Ref No : 14, Hmm No : 08)

## *30 उप-प्रमाणके रद्द / विरुप न करणेबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2012-2013**
**No. of Irregularities: 01**

*प्रा.शि.निधी - राज्य शासन व मनपा निधी निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***एखादया प्रमाणकाचा जाणून बुजून / लबाडीने दुस-यांदा वापर टाळण्याच्या दृष्टीने अशी प्रमाणके / उप-प्रमाणके रद्द / विरुप करणे आवश्यक आहे. परंतु नियमाप्रमाणे त्याबाबतच्या कार्यपध्दतीचे पालन झालेले नाही.***

मुंबई शाळा मंडळ लेखासंहिता 1953 मधील नियम 7 (5), महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता 1971 मधील नियम 42 (3), महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम 1965 मधील नियम 55 तसेच महाराष्ट्र कोषागार नियम 1968 मधील नियम 291 प्रमाणे उप-प्रमाणकांचा लबाडीने वापर करण्यास प्रतिबंध करण्यासाठी ज्या खर्चाची अदागयी झाली आहे, असे प्रत्येक उप-प्रमाणक रबरी शिक्क्याच्या साहाय्याने किंवा लाल शाईने पृष्ठांकन करुन रीतसर रद्द करणे (विरुप) आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येक महिन्याच्या शेवटी प्राधिकृत अधिका-याने (प्रशासन अधिकारी) "आस्थापना खर्चाच्या बिलाखेरीज महिन्यातील सर्व बिले तपासून खर्च योग्य त-हेने प्रमाणित करण्यात आला असून उप-प्रमाणके दुस-या कोणत्याही मागणी पृष्ठयर्थ वापरता येणार नाहीत अशा प्रकारे विरुप करण्यात आली आहेत कि त्याचा वापर पुन्हा करता येणार नाही" याबद्दल खात्री केली पाहिजे.

उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या लेखापरीक्षणात माहे मार्च, 2013 चे रेखांकनात व उर्वरित महिन्यांचे लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, शिक्षण मंडळामधील कोणतीही उप-प्रमाणके विरुप केलेली नाहीत.

याबाबत अर्धसमास ज्ञापन क्र.4, दिनांक 12/05/2015 अन्वये साधार खुलासा मागविला होता. परंतु शिक्षण मंडळामार्फत सदरहू अर्धसमासास उत्तर देण्यात आलेले नाही. कोणत्याही बिलाची / बीजकाची रक्कम संबंधितांना अदा झाल्यानंतर त्याचे प्रमाणकात रुपांतर होते. असे प्रमाणक / उप-प्रमाणक पाच वर्षाचा कालावधी / लेखापरीक्षण होईपर्यंत अथवा त्यासंबंधी काही विशेष आदेश असल्यास तोपर्यंत नष्ट करता येत नाही. त्यामुळे 2012-2013 मधील सर्व प्रमाणक / उप-प्रमाणकांचा आढावा घेऊन ती विरुप / रद्द करावीत व तसा अनुपालन अहवाल स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयास सादर करावा.

DATRKJM5901 (Ref No : 6, Hmm No : 04)

**आक्षेप विवरणपत्राबाबत** :- लेखापरिक्षण अहवालामधील समाविष्ट सर्व परिच्छेदांबाबत लेखापरिक्षण चालू असताना अर्धसमास पत्रे निर्गमीत करण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त उत्तरे व अनुपालने तपासून सर्वसामान्य स्वरुपाच्या आक्षेपांची पूर्तता करुन घेण्यात आलेली असल्याने स्वतंत्र आक्षेप विवरणपत्रक निर्गमित करण्यात आलेले नाही.

**विवरणपत्रके** :- विवरणपत्र क्र.1 ते 9 आणि दि. 31/03/2013 अखेर शिल्लक असलेल्या मुदत ठेवींचे व ठेवींवरील प्राप्त झालेल्या व्याजाचे विवरणपत्र अहवालासोबत जोडण्यात आलेले आहे. मत्ता व दायित्व विवरणपत्र, अनामत ठेव रक्कम विवरणपत्र व अपूर्ण कामाची यादी लेखापरीक्षणास सादर करण्यात आली नाही.

**अनुपालन**:- महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम कलमाच्या 10(1) मधील तरतुदीनुसार सदरचा अहवाल प्राप्त झाल्यापासून चार महिन्याचे आत या लेखापरिक्षण अहवालातील आक्षेपांवरील अनुपालन अहवाल ( तीन प्रती) शिक्षण मंडळाच्या ठरावाच्या प्रतीसह प्रशासकीय अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका, शिक्षण मंडळ उल्हासनगर यांच्या स्वाक्षरीने पाठविण्यात यावा.

**पोहोच** :- सदर लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्याचा दिनांक नमूद करुन पोहोच देण्यात यावी.

(सिताराम काळे)
उपसंचालक (म.न.पा.ले.प.)
उपविभाग-2,
स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई

प्रत :-

1. मा.प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-1 101 महर्षि कर्वे मार्ग मुंबई
2. मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई 32
3. मा. सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई 32
4. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
5. मा. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, कोंकण भवन, नवी मुंबई
6. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे
7. सह संचालक (मनपालेप), स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, रायगड भवन, नवी मुंबई
8. पुनर्विलोकन अहवाल शाखा, रायगड भवन, नवी मुंबई

(सिताराम काळे)
उपसंचालक (म.न.पा.ले.प.)
उपविभाग-2,
स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई

## *लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र*

| नाव | परिच्छेद क्रमांक |
|---|---|
| अभिजित गणपतराव पिसाळ , सहाय्यक संचालक | 1, 2, 3, 5, 9, 19, 20, 23, 27 |
| रमेश कृष्णा जाधव, लेखापरिक्षा अधिकारी | 11, 14, 15, 17, 18, 21, 22, 24, 25, 26, 28, 29, 30 |
| अनिल नामदेव माळी, सहाय्यक लेखापरिक्षा अधिकारी | 4, 6, 7, 8, 10, 12, 13, 16 |

## विवरणपत्रे व जोडपत्रे

| अ.क्र. | परिच्छेद क्र. | आक्षेपाधीन रक्कम | वसूलपात्र रक्कम | तात्पुरती अमान्य रक्कम | अंतिम अमान्य रक्कम | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 42523482.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 2 | 3 | 2779182.00 | 568138.00 | ---- | ---- | ---- |
| 3 | 4 | ---- | 20109547.00 | ---- | ---- | ---- |
| 4 | 6 | 1545411.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 5 | 7 | 499500.00 | 30990.00 | ---- | ---- | ---- |
| 6 | 8 | 371235.00 | 25311.00 | ---- | ---- | ---- |
| 7 | 9 | 2952673.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 8 | 12 | ---- | 3791.00 | ---- | ---- | ---- |
| 9 | 13 | 4700000.00 | 690121.00 | ---- | ---- | ---- |
| 10 | 14 | 3000000.00 | 60100.00 | ---- | ---- | ---- |
| 11 | 15 | 1562065.00 | 81300.00 | ---- | ---- | ---- |
| 12 | 16 | ---- | 331754.00 | ---- | ---- | ---- |
| 13 | 17 | ---- | 1345.00 | ---- | ---- | ---- |
| 14 | 20 | ---- | 6110.00 | ---- | 6110.00 | ---- |
| 15 | 21 | ---- | 4430.00 | ---- | ---- | ---- |
| 16 | 22 | 62110.00 | ---- | ---- | ---- | ---- |
| 17 | 27 | 375000.00 | ---- | ---- | ---- | ---- |

# उल्हासनगर महानगर पालिका शिक्षणमंडळ उल्हासनगर

सन २०१२-१३ विवरण पत्र क्र.-१

करांची मागणी वसुली व थकबाकी दर्शविणारे विवरणपत्र

| अ.क्र. | कराचे नांव | सन २०११-१२ अखेरची थकबाकी | सन २०१२-१३ ची मागणी | एकुण मागणी | चालु वसुली २०१२-१३ | मागील वसुली २०११-१२ | एकुण वसुली | थकबाकी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सर्वसाधारण कर | | | | | | | |
| २ | शिक्षण कर | | | | | | | |
| ३ | विशेष स्वच्छता कर | | | | | | | |
| ४ | वृक्ष कर | | | | | | | |
| ५ | रस्ता कर | | | | | | | |
| ६ | मोकळया जागेवरील कर | | | | | | | |
| ७ | शिक्षण उपकर | | | | | | | |
| ८ | रोजगार हमी उपकर | | | | | | | |
| ९ | बिगर रेसिडेन्शियल सेस | | | | | | | |
| १० | जलनिसारण कर | | | | | | | |
| ११ | जल लाभ कर | | | | | | | |
| १२ | मलनिसारण कर | | | | | | | |
| १३ | मलनिसारण लाभ कर | | | | | | | |
| | एकुण रक्कम | | | | | | | |

ACCOUNTANT
MUNICIPAL CORPORATION SCHOOL BOARD
ULHASNAGAR-421003

प्रशासनाधिकारी
महानगरपालिका शिक्षण मंडळ
उल्हासनगर -४२१००३

3



# उल्हासनगर महानगर पालिका शिक्षणमंडळ उल्हासनगर

**सन २०१२-१३ विवरण पत्र क्र.२**

**जकात स्थानिक संस्था कर विभागाकडील वसुल परतावायोग्य अनामतीचा तपशिल**

| अ.क्र. | वित्तीय वर्ष | मागील प्रलंबीत परतावायोग्य अनामत | चालु वर्षात वसुल परतावायोग्य अनामत | एकुण अनामत रक्कम | चालु वर्षात परत केलेली अनामत | प्रलंबित अनामत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०१२-२०१३ | | निरंक | | | |
| एकुण | | | | | | |

ACCOUNTANT
MUNICIPAL CORPORATION SCHOOL BOARD
ULHASNAGAR-421003.

प्रशासनाधिकारी
महानगरपालिका शिक्षण मंडळ
उल्हासनगर - ४२१००३.

# उल्हासनगर महानगर पालिका शिक्षणमंडळ उल्हासनगर

सन २०१२-१३ विवरण पत्र क्र.-३

| उत्पन्न | | | खर्च | | |
|---|---|---|---|---|---|
| उत्पन्नाचे शिर्ष | अर्थसंकल्पीय अंदाज | प्रत्यक्ष रक्कम | खर्चाचे शिर्ष | अर्थसंकल्पीय अंदाज | प्रत्यक्ष रक्कम |
| अ) महानगरपालिका दर व कर | | | अ) सामान्य प्रशासन व वसुलीचा खर्च | | |
| ब) विशेष अधिनियमाखालील वसुली | | | ब) सार्वजनिक सुरक्षितता | | |
| क) महापालिकेची मालमत्ता व सेवा उपयोगिता | | | क) आरोग्य व सोयी | | |
| ड) अनुदाने व अंशदाने | | | ड) लोक शिक्षण | | |
| इ) संकीर्ण | | | इ) संस्थांना देण्या | | |
| एकुण अ अंदाजपत्रक जमा | | | फ) संकीर्ण | | |
| | | | एकुण महसुली खर्च | | |
| | | | एकुण भांडवली खर्च | | |
| | | | एकुण अ अंदाजपत्रक खर्च | | |
| क अंदाजपत्रक जमा | | | क अंदाजपत्रक खर्च | | |
| पाणीपुरवठा विभाग जमा | | | पाणीपुरवठा विभाग खर्च | | |
| मलनिसारण विभाग जमा | | | मलनि:सारण विभाग खर्च | | |
| अनुदाने व कर्जे | | | एकुण क मसुली खर्च | | |
| एकुण क अंदाजपत्रक जमा | | | एकुण पाणीपुरवठा भांडवली खर्च | | |
| | | | एकुण मलनि:सारण भांडवली खर्च | | |
| | | | एकुन क भांडवली खर्च | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | एकुण अंदाजपत्रक खर्च | | |
| एकुण जमा अ क | | | एकुण खर्च अ क | | |
| ह) केंद्र व राज्य शासन पुरस्कृत योजनांतर्गत | | | केंद्र व राज्य शासन पुरस्कृत योजनांतर्गत खर्च | | |
| य) महापालिका हिस्स कार्जाद्वारे | | | | | |
| एकुण केंद्र व राज्य शासन पुरस्कृत योजनांतर्गत | | | केंद्र व राज्य शासन पुरस्कृत योजनांतर्गत खर्चा | | |
| केंद्र व राज्य शासन पुरस्कृत योजनांतर्गत | | | असाधार व निलंबन शिर्ष खर्च | | |
| असाधारण व निलंबन शिर्ष जमा | | | अखेरची शिल्लक | | |
| प्रारंभिक शिलकेसह एकुण जमा | | | अकेरच्या शिलकेसह एकुन खर्च | | |
| | | | | | |

ACCOUNTANT
MUNICIPAL CORPORATION SCHOOL BO...
ULHASNAGAR-421003

प्रशासनाधिकारी
महानगरपालिका शिक्षण मंडळ

## उल्हासनगर महानगर पालिका शिक्षणमंडळ उल्हासनगर

२०१२–२०१३ विवरण पत्र क्र.४

जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुतीन अभियान

विनियोग प्रमाणपत्र आवश्यक असणारी अनुदाने

| अ.क्र. | योजनेचे नाव | केंद्र शासन हिस्सा | राज्य शासन हिस्सा | एकुण रक्कम | शासन निर्णय क्र. | प्रत्यक्षाम निधी प्राप्त झाल्याचा दिनांक | उपयोगिता प्रमाणपत्र दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | निरंक | | | | |
| ४ | | | | | | | |
| ५ | | | | | | | |
| ६ | | | | | | | |

ACCOUNTANT
...NICIPAL CORPORATION SCHOOL BOA...
ULHASNAGAR-421003.

प्रशासनाधिकारी
महानगरपालिका शिक्षण मंडळ
उल्हासनगर - ४२१००३

# उल्हासनगर महानगर पालिका शिक्षणमंडळ उल्हासनगर

## २०१२–२०१३ विवरण पत्र क्र.४ अ

## शासन अनुदान प्राप्त माहीती व विनियोग प्रमाणपत्र.

| अ.क्र. | योजनेचे नाव | निधी वितरणाचा शासन निर्णय क्र. | प्राप्त निधी | एकुण प्राप्त निधी | खर्च झालेल्या रकमेचे विनियोग प्रमाणपत्र दिले असल्यास | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | रक्कम | दिनांक | |
| १ | निर्मल भारत योजना | | | | | | |
| २ | अल्पसंख्याक बहुल क्षेत्र विकास निधी | | | | | | |
| ३ | रस्ता अनुदान | | | | | | |
| ४ | आमदार निधी | | | | | | |
| ५ | नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजना | | | | | | |
| ६ | सौर ऊर्जा अनुदान | | | | | | |
| ७ | प्रदुषण अनुदान | | | | | | |
| ८ | सर्व शिक्षा अनुदान | | | | | | |
| ९ | खासदार निधी | | | | | | |
| १० | अग्निशमन व आणिबाणी सेवा बळकटीकरण | | | | | | |
| ११ | राजीव आवास योजना | | | | | | |
| १२ | १३ वा वित्त आयोग | | | | | | |
| १३ | सुवर्णजंयती शहरी रोजगार योजना | | | | | | |

ACCOUNTANT
MUNICIPAL CORPORATION SCHOOL BOARD
ULHASNAGAR-421003.

प्रशासनाधिकारी
महानगरपालिका शिक्षण मंडळ
उल्हासनगर - ४२१००३

1

# उल्हासनगर महानगरपालिका शिक्षणमंडळ, उल्हासनगर

२०१२–१३ विवरणपत्र क ४ ब

विनियोग प्रमाणपत्र आवश्यक नसणारी शासन अनुदाने

अंक लाखात

| अ.क | योजनेचे नांव | निधी वितरणाचा शासन निर्णय क | प्राप्त निधी | एकूण प्राप्त निधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | करमणूक कर | | | | |
| २ | मुद्रांक शुल्क अनुदान | | | | |
| ३ | वेतन व पेन्शन | | ९३६ | ९३६ | |
| ४ | शालेय पोषण आहार योजना | | १३४ | १३४ | |

ACCOUNTANT
MUNICIPAL CORPORATION SCHOOL BOARD
ULHASNAGAR-421003.

प्रशासनाधिकारी
महानगरपालिका शिक्षणमंडळ
उल्हासनगर

प्रशासनाधिकारी
महानगरपालिका शिक्षणमंडळ
उल्हासनगर - ४२१००३.

# उल्हासनगर महानगर पालिका शिक्षणमंडळ उल्हासनगर

२०१२—२०१३ विवरण पत्र क्र.५

कर्जाबाबत विवरणपत्र १/४/२०१२ ते ३१/३/२०१३२ पर्यंत वर्षातील परतफेड व ३१/३/२०१३ अखेर शिल्लक कर्जाचा तपशिल.

| अ.क्र. | कर्जाचा तपशिल | कर्ज रक्कम | वर्ष | व्याजदर | १/४/२०१२ रोजी शिल्लक कर्ज | या वर्षात प्राप्त झालेले कर्जाचे हप्ते व मोरेटोरीयम कालावधीचे व्याज धरुन. | वर्षातील परतफेड १/४/२०१२ ते ३१/३/२०१३ | | | | कर्जाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | मुद्दल | व्याज | एकुण | शिल्लक | |
| १ | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | निरंक | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | |

ACCOUNTANT
.NICIPAL CORPORATION SCHOOL BOA..
ULHASNAGAR-421003.

प्रशासनाधिकारी
महानगरपालिका शिक्षण मंडळ
उल्हासनगर - ४२१००३

९

२१

# उल्हासनगर महानगर पालिका शिक्षणमंडळ उल्हासनगर

२०१२—२०१३ विवरण पत्र क्र.६

वितरीत केलेली विविध अग्रिमे व त्याच्या प्रलंबीत रकमा.

| अ.क्र. | अग्रिमाचा तपशिल. | निधी वितरणाचा शासन निर्णय क्रमांक | प्राप्त निधी | एकुण प्राप्त निधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | अधिकारी/कर्मचाऱ्यांना दिलेली ( विभागीय ) | | | | |
| २ | संगणक अग्रिम | | | | |
| ३ | उत्सव अग्रिम | | | | |
| ४ | घरबांधणी अग्रिम | | निरंक | | |
| ५ | वाहन अग्रिम | | | | |
| ६ | कंत्राटदारास दिलेले अग्रिम | | | | |
| ७ | इतर | | | | |

ACCOUNTANT
MUNICIPAL CORPORATION SCHOOL BOARD
ULHASNAGAR-421003.

प्रशासनाधिकारी
महानगरपालिका शिक्षण मंडळ
उल्हासनगर - ४२१००३

१०

## उल्हासनगर महानगर पालिका शिक्षणमंडळ उल्हासनगर

२०१२–२०१३ विवरण पत्र क्र.७

अनामत रकमांची माहिती.

| अ.क्र. | तपशिल. | प्रलंबित परतावा रक्कम | चालु वर्षातील जमा | चालु वर्षातील जमा | वर्षाअखेरीस शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाणी पुरवठा अनामत | | | | |
| २ | इसारा अनामत | | निरंक | | |
| ३ | सुरक्षा अनामत | | | | |
| ४ | इतर | | | | |

ACCOUNTANT
MUNICIPAL CORPORATION SCHOOL BOARD
ULHASNAGAR-421003.

प्रशासनाधिकारी
महानगरपालिका शिक्षण मंडळ
उल्हासनगर - ४२१००३.

ULHASNAGAR MUNCIPAL CORPORATION SCHOOL BOARD

FDR LIST 2012-13 YEAR ENDING 31-3-2013

| SR.NO | NAME OF BANK | FD A/C NO. | PRINCIPAL AMT. | RATE OF INTEREST | INTEREST AMT. | DATE OF DEPOSITE | DATE OF MATURITY | PERIOD IN MONTH | MATURITY AMT. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **UBI UNR 3** | 450620 | 3400084 | 9.15 | 671479 | 09/08/2011 | 09/08/2013 | 24 | **4071563** |
| 2 | **UBI UNR 1** | 512777 | 8860724 | 9.25 | 1302732 | 19/05/2012 | 19/11/2013 | 18 | **10163456** |
| 3 | **CORPORATION UNR-3** | 285899 | 1507200 | 9.25 | 144326 | 30/04/2012 | 30/04/2013 | 12 | **1651526** |
| 4 | **VIJAYA UNR -3** | 741145 | 1533390 | 9.3 | 226734 | 20/07/2012 | 20/01/2014 | 18 | **1760124** |
| 5 | **VIJAYA UNR -3** | 741144 | 1519683 | 9.3 | 224707 | 20/07/2012 | 20/01/2014 | 18 | **1744390** |
| 6 | **CORPORATION UNR-3** | 285900 | 2988403 | 9.25 | 286163 | 08/05/2012 | 08/05/2013 | 12 | **3274566** |
| 7 | **CORPORATION UNR-3** | 285898 | 3018821 | 9.25 | 289076 | 08/05/2012 | 08/05/2013 | 12 | **3307897** |
| 8 | **CANARA UNR -4** | 532599 | 3871353 | 9 | 552926 | 05/09/2012 | 05/03/2014 | 18 | **4424279** |
| 9 | **CANARA UNR -4** | 892484 | 2679727 | 9 | 382733 | 05/09/2012 | 05/03/2014 | 18 | **3062460** |
| 10 | **CANARA UNR -4** | 836916 | 12235083 | 9.25 | 1798839 | 27/08/2012 | 07/02/2014 | 18 | **14033922** |
| 11 | **IDBI UNR -3** | 2928103 | 3410356 | 9.25 | 453681 | 18/09/2012 | 29/01/2014 | 16 | **3864037** |
| 12 | **CANARA UNR -4** | 892289 | 16058020 | 9.25 | 1591816 | 11/03/2013 | 10/03/2014 | 12 | **17649836** |
| 13 | **CANARA UNR -4** | 837181 | 6854487 | 9.25 | 1007760 | 16/08/2012 | 16/02/2014 | 18 | **7862247** |
| 14 | **UBI UNR 3** | 880498 | 3434309 | 9.15 | 1074768 | 03/11/2011 | 15/03/2014 | 36 | **4509077** |
| 15 | **VIJAYA UNR -3** | 170496 | 4000000 | 9.5 | 604935 | 24/05/2012 | 24/11/2013 | 18 | **4604935** |
| | | **TOTAL** | **75371640** | | **10612675** | | | | **85984315** |

ACCOUNTANT
MUNICIPAL CORPORATION SCHOOL BO
ULHASNAGAR-421003.

प्रशासनाधिकारी
महानगरपालिका शिक्षण मंडळ

12

# उल्हासनगर महानगर पालिका शिक्षणमंडळ उल्हासनगर

## २०१२–२०१३ विवरण पत्र क्र.१४

### सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना.

| गुतवणूकीचा दिनांक | गुतविलेली रक्कम | मुदतठेव संपल्यानंतर व्याजासह जमा रक्कम त्रैमासिक व्याज. | मुदतठेव संपल्याची तारीख | मुदतठेव पत्र क्रमांक | बॅंकेचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

ACCOUNTANT
MUNICIPAL CORPORATION SCHOOL BOARD
ULHASNAGAR-421003.

प्रशासनाधिकारी
महानगरपालिका शिक्षण मंडळ
उल्हासनगर - ४२१००३

# उल्हासनगर महानगरपालिका शिक्षणमंडळ, उल्हासनगर

विवरणपत्र क्र. ९.

२००५ पासुन नियुक्त केलेले शिक्षक /शिक्षकेतर कर्मचारी

| अ.क | शिक्षकाचे नांव | पदनाम | नियुक्ती दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | निरंक | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |
| ८ | | | | |
| ९ | | | | |
| १० | | | | |
| ११ | | | | |

ACCOUNTANT
MUNICIPAL CORPORATION SCHOOL BOARD
ULHASNAGAR-421003

प्रशासनाधिकारी
महानगरपालिका शिक्षणमंडळ
उल्हासनगर

प्रशासनाधिकारी
महानगरपालिका शिक्षण मंडळ
उल्हासनगर - ४२१००३

E:\raskar\AUDIT\vivaran13